भारतीय संस्कृती आणि इतिहास यांचा
वैज्ञानिक दृष्टिकोनातून केलेला अभ्यास

शोध अज्ञाताचा

मागोवा - शोध - आणि चिंतन



अरुण निगुडकर

शोध अज्ञाताचा

अरूण निगुडकर

मनोरमा
प्रकाशन

प्रकाशक
अनिल रघुनाथ फडके
१०२ / सी, माधववाडी, पहिला मजला
दादर पूर्व, स्टेशनसमोर दादर,
मुंबई ४०० ०१४. फोन : २४१४८२९९

❖

लेखक - अरूण निगुडकर
गीतांजली, फ्लॅट ६, रोड ८
अहोबिल मठाजवळ, चेंबूर, मुंबई - ७१

❖

© अरूण निगुडकर

❖

प्रकाशन : दत्त जयंती ६/१२/२०१४

❖

मुखपृष्ठ : संतोष बेलाटीकर

❖

अक्षर जुळणी :
निधी कॉम्प्युटर्स,
‘ उषा ’ ५४५/३अ, कुंभार प्लॉट,
निलेश बॅटरीच्यामागे, १०० फूटी रोड,
सांगली. ४१६ ४१६

❖

मुद्रण :
जोतिर्लिंग ऑफसेट,
कोल्हापूर

❖

अनुक्रमणिका

१.	रात्रीच्या प्रकाशवाटा	७
२.	औरंगजेबाचे पाताळयंत्र	९
३.	चकवा	११
४.	प्राचीन गंध व अत्तरे	१४
५.	मृत सम्राटाचा पुनर्जन्म !	१५
६.	जगातले पहिले प्रेमपत्र	१७
७.	फ्रेंच खजिना कुठे लपलाय ?	१८
८.	हायन्रिश श्लीमनचे ट्रॉय	२०
९.	चाच्यांचे ओक आयलंड	२३
१०.	काळाने जपलेले सुगंध आणि ठसे	२५
११.	थडग्यातल्या प्राचीन वस्तूंचे रहस्य	२७
१२.	प्राचीन हिंदुस्थानचा उपग्रह शोध	३०
१३.	भारतवर्षाचे विज्ञानपर्व	३२
१४.	आर्यभूमीचे समाज शिक्षण	३४
१५.	सरस्वती-सिंधू संस्कृतीची बोधचिन्हे	३६
१६.	प्लॅनेटेरिअम सॉफ्टवेअर	३८
१७.	सुजलाम् सुफलाम्	४०
१८.	राम-रावण युद्धाचे आधुनिक संकलन	४२
१९.	प्राचीन भूगोलतज्ज्ञ सौती	४४
२०.	काळाआड गेलेली आश्चर्ये	४६
२१.	रामराज्यातील प्रशासन	४८
२२.	भगवद्‌गीतेचा विज्ञानबोध	४९
२३.	द्रोणपर्वाचे गूढ	५१
२४.	वैदिक संस्कृतीची परंपरा	५३
२५.	रामसेतू व लोणार	५४
२६.	राजबंदी सीता व पेटलेली लंका	५६
२७.	पुनश्च रामसेतू	५८
२८.	महाभारतकालीन द्वारकेहून मोठी नगरी	६०
२९.	इतिहासाचा भूगोल	६२
३०.	मोहेंजोदारोचा ‘ अणुस्फोट ! ’	६४

३१. पाणिनी ६६
३२. पर्वतकाची विषकन्या ६८
३३. शून्यातून शुन्याकडे ७०
३४. न गंजणारे लोहस्तंभ ७१
३५. हिंदुस्थानी दंतकथा व शल्यचिकित्सा ७३
३६. झेलमचा ‘ चिखल कुवा ’ ७५
३७. भूगोलाने सांगितलेला इतिहास ७७
३८. प्राचीन युद्धाचे स्मृतिविशेष ७९
३९. चंद्रगुप्ताचा ग्रीक घरोबा ८२
४०. घोड्याची निपज ८४
४१. पुरूचे नेतृत्व ८६
४२. जगज्जेता...? ८९
४३. हिंदुस्थानी संगीत ९१
४४. अजंठ्यातली विज्ञाने ९२
४५. समुद्रगुप्ताची हार्प ९८
४६. कालिदासाचे विमान १०१
४७. मृत्यूच्या दाढेतून परत ! १०३
४८. ताजमहाल वाचविण्यासाठी... १०५
४९. स्यमंतक ऊर्फ कोहिनूर १०७
५०. ताजमहाल १०९
५१. ताजची मृत्युघंटा १११
५२. ताजचं आता काही खरं नाही ११४
५३. राणा दिल ! ११६
५४. सम्राज्ञीचे दफन ११८
५५. ब्रिटिशांचा हिंदुस्थानातील चंचूप्रवेश १२०
५६. तिमुररूबीचा झटका १२२
५७. परकीयांनी पाहिलेले शिवाजीमहाराज १२४
५८. आखरी खत १२६
५९. नादिरशाहची शोकांतिका १२८
६०. दोन राष्ट्रगीतांचा जनक ! १३०
६१. युनियन जॅकचे अधोवदन १३१
६२. स्वातंत्र्याच्या सीमेवर १३२
६३. धारवाडी लुगडी १३३

६४.	रणगाड्यांचे कब्रस्तान	१३४
६५.	वाघा सीमा	१३६
६६.	दौलतबेग ओल्डी	१३८
६७.	पाकिस्तानचे पाणी बंद करा	१३९
६८.	पाकिस्तानचे पाणी थांबवा !	१४१

रात्रीच्या प्रकाशवाटा

अमाप जंगलतोड ज्यावेळी झाली नव्हती म्हणजे ३५० वर्षांपूर्वी भारताच्या डोंगर-दऱ्या व जंगलातून प्रकाश देणाऱ्या वेली, झाडे व भूछत्रे उगवत. (Nature Enclopedia) त्यांचा उपयोग रात्री-अपरात्री जंगलात वावरणाऱ्या रहिवाशांना होत असे. पावसाळ्यात जंगलात झाडांच्या फांद्या वा तळाशी भूछत्राच्या गोल छत्र्या कुजलेल्या वनस्पती, झाडाच्या मृत फांद्यावर उगवत (The ghost fungus - Omphalotus nidiformis) त्या हिरव्या, भगव्या वा पांढऱ्या रंगाचा प्रकाश बाहेर फेकीत. विषारी वनस्पती या प्रकारात मोडणाऱ्या या वनस्पती पावसा ्यात पलिते, मशाली, कंदिल यांची उणिव भरून काढीत. या वाटा स ज्जासहजी दिसत नसत. कारण गच्च जंगलात श्वापदांचा वावर, मुख्यत : रात्री असल्याने शिकाऱ्यांखेरीज सर्वसामान्य माणसे जंगलात जाणे टा त आली आहेत.

छत्रपती शिवाजीमहाराज सिद्दी जोहरच्या पन्हाळगड वेढ्यातून पसार झाले. (१६ जुलै १६६०) त्यांना या वनस्पतींचा फार उपयोग झाला असा समज आहे. पन्हाळगड ते विशाळगड (७५ कि. मी.) हे अंतर रात्रीच्या चिडीचिप अंधारात, सिद्दी जोहरचे चौक्या, गस्तीचे पहारे चुकवून बाहेर पडायचं ते देखील धुवाँधार पाऊस, धबधबे, निसरड्या वाटा, अनवाणी पायांनी चिखल तुडवत, पलिते पेटवायचे नाहीत, चिलीम-विडी ओढायची नाही, पावसात ओली झालेली वस्त्रे बदलण्यासाठी कुठेही थांबायचं नाही. नियतीनं काय वाढून ठेवलंय कोण सांगणार ? कुटुंबाच्या भवितव्यावर पेटता निखारा ठेवून निघालेले ६०० मावळे. एवढे अंतर पायी जंगलातून धावत गाठायचं आणि विशाळगड गाठण्यासाठी परत लढाई करायची २ वेळा काय जडणघडण झाली असेल या मावळ्यांची ?

पन्हाळगडाहून खाली उतरताना विजांचा कडकडाट आणि ढगांचा गडगडाट, वरून पावसाची संततधार. वीज चमकली की वाट दिसे. परंतु अशावेळी मावळे बाजूच्या अंधाऱ्या जंगलाचा आश्रय घेत. खालच्या शत्रूच्या मोर्च्यातून पन्हाळ्याच्या बुरूज, कडे-कपारीवर सतत २४ तास नजर ठेवणारी चिवट हबशी माणसे सिद्दी जोहरजवळ होती, याची महाराजांना खात्री होती. यावर महाराजांनी उद्याच ते सिद्दीच्या स्वाधीन

होणार अशी आवई त्याच्या अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचेल अशी व्यवस्था स्वत:चे दूत पाठवून केली होती. त्याचा अपेक्षित परिणाम म्हणून मोर्चे, चौक्यांवरचे सैनिक भरपेट मदिरापान आणि जेवण करून कधी आडवे होतात याचा अंदाज घेऊन महाराजांनी पलायनाचा मुहूर्त ठरविला.

कित्येक पहारे, चौक्या जवळ आल्या गेल्या. सर्व जमत गेलं आणि अचानक अंधारात काही तरी चकाकलं. दोन मानवी आकृत्यांनी त्यांना पाहिलं अशी शंका त्यांना आली. एव्हाना तीन तास होऊन गेले होते. हुबेहुब महाराजांसारखा दिसणारा शिवा काशीद बरोबर घेतलेल्या पालखीत बसला. त्याच्याबरोबर २५ मावळे आधी ठरल्याप्रमाणे मळल्या वाटेने निघाले. बाकी फौज जंगलात शिरली. आता तासाभरात सिद्दीला कळणार व त्याचे सैनिक आणि घोडदळ काही तासात आपल्याला गाठणार हे निश्चित झालं. घोडखिंड (पावनखिंड) अजूनही दोन तासावर होती. सर्वत्र चिखलाचे साम्राज्य. झपझप वेगाने अनवाणी धावणारे मावळे उरात प्राण ओतून कसेबसे खिंडीच्या तोंडावर पोहोचले आणि सिद्दी जोहरच्या घोडदळाचे आवाज आणि सैनिकांचा आरडाओरडा ऐकू येऊ लागला. बाजीप्रभू देशपांडे म्हणाला, महाराज आपण निघा. मी ३०० मावळे घेऊन खिंड अडवतो. आपण आमचा विचार करू नका. फक्त विशाळगड गाठल्यावर तोफांचे तीन आवाज करा. विचार करायला वेळ कुठे होता. परत भेट होणार नव्हती याची दोघांनाही खात्री होती. जड अंत:करणाने महाराज बाजीप्रभूंना आलिंगन देऊन निघाले. महाराजांनी सुर्वे, शृंगारपुरे या विजापुरी सरदारांचा पराभव करून विशाळगड गाठला व तोफांना बत्ती दिली. बाजीप्रभू, त्यांचे ३०० मावळे आणि पकडला गेलेला शिवा काशीद आणि त्याचे २५ सहकारी आणि महाराजांबरोबरचे ३०० मावळे यांचे आत्मसमर्पण पाहिलेल्या बाजीप्रभूचे स्मारक आज त्यांची आठवण जागवित तिथे उभे आहे. आजही निसर्ग तोच आहे. पन्हाळगड-विशाळगड या वाटेवरच्या दऱ्या-खोऱ्यात प्रकाश देणाऱ्या वेली व भूछत्रे मात्र आज कुणाला ठाऊकही नाहीत. शिवा काशिदचे घर पन्हाळ्याच्या पायथ्याशी आहे.

***

औरंगजेबाचे पाताळयंत्र

निकोलस (निकोलाओ) मनुची हा इटालियन शहाजहानच्या काळात आग्र्याला आला. दारा शुकोह, औरंगजेब, राजा जयसिंग, छत्रपती शिवाजीमहाराज, दिलेरखान अशी अनेक व्यक्तिमत्वे त्याने जवळून पाहिली. सडसडीत उंचापुरा, त्याच्या लाघवी स्वभावाने त्याच्या विविध भाषांवरच्या प्रभुत्वाने मुघल दरबारात लोकप्रिय झाला. (१६३९ - १७१७) पुरी ६० वर्षे सर्व प्रकारच्या उच्च वर्गात, दरबारी लोकांची सलगी साधून मनुचीने अनेक उचापत्या व लावालाव्या केल्या. पाँडेचरीचा फ्रेंच गव्हर्नर मार्टीन याने त्याला पाँडेचरीत एक प्रॉपटी दिली व त्याचे लग्न लावून दिले. तिथे त्याने स्टोरी ऑफ मुघल्स या नावाचे आत्मकथन लिहिले ते बव्हंशी मुघल दरबाराचे वास्तव चित्रण आहे.

त्यांचा ढिसाळ कारभार, प्रशासन दिरंगाई, सैन्यातली अंदाधुंदी, अविश्वास, खूनखराबे, कटकारस्थाने यांचा त्याच्या एवढा अनुभव इतर कुठल्याही परकीयाला आला नसावा. औरंगजेबाचा मनुचीवर पहिल्यापासून विश्वास नव्हता. मनुचीनं औरंगजेबाची खासियत आपल्या प्रवास वर्णनात केली आहे. कुणावरही विश्वास न ठेवता स्वत:ला डोईजड होऊ शकेल अशा स्वपक्षांतील लोकांचा घात करण्यात औरंगजेब मागेपुढे पाहात नसे. शत्रू पक्षाच्या व्यक्तीचा काटा काढण्याचा त्याचा उद्योग आणि वेळापत्रक ठरलेले असे. त्याचं वागणं हे एक कोडं होतं. तो कधी काय करील याची कल्पना कुणालाही येत नसे. सतत दुसऱ्याला आपल्या दडपणाखाली ठेवण्याच्या वृत्तीमुळे मुघली अधिकारी कुठलाही निर्णय घेण्याचे टाळत. औरंगजेबाचे साम्राज्य इतर कुठल्याही मुघली बादशहापेक्षा मोठे होते. परंतु दफ्तर दिरंगाई, भ्रष्टाचाराने पोखरले होते. मनुचीनं लिहिलंय, कुठल्याही वसाहती राष्ट्राजवळ जर ३०,००० कवायती फौज त्यावेळी भारतात असती तर त्याच्या काळातही औरंगजेब सत्ता गमावून बसला असता. त्याच्या कपट कारस्थानामुळे त्याचे साम्राज्य त्याच्या पश्चात लवकरच रसातळाला गेले.

दाराचा पराभव झाला. त्याच्या पक्षातील ४० अधिकारी व दाराचे आप्त औरंगजेबाच्या हाती पडले. भर दरबारात त्यांना औरंगजेबासमोर

आणले गेले. औरंगजेब त्याच्या तीक्ष्ण हिरवट पिवळसर डोळ्यांनी (Hazel Eyes) काही क्षण त्यांच्याकडे बघत बसला. ती दृष्टी मनुचीचे हृदय चिरत गेली. मनुची स्वत:ही दाराचा तोफखाना अधिकारी म्हणून त्या गोतावळ्यात अडकला होता. सुटकेची अंधुकशीही आशा दिसत नव्हती. असाच काही वेळ गेला, आणि मनुची सोडून इतर सर्वांना औरंगजेबाने मृत्युदंडाची शिक्षा दिली. आपण का सुटलो हे मनुचीला कळेना.

औरंगजेबाने काही काळानंतर छत्रपती शिवाजी महाराजांविरूद्ध दक्षिण मोहीम जाहीर केली. राजा जयसिंग व दिलेरखान हे एकमेकाला पाण्यात पाहात. नजरेतून उतरलेल्या मनुचीला त्यांच्या सोबत त्याने पुरंदरकडे रवाना केले. वस्तुत: यापैकी कुणीही एकमेकाचे भलं इच्छिणारे नव्हते. परंतु दुसरे दोघे आपल्या बरोबर या मोहिमेत नकोत, हे औरंगजेबाला त्याना सांगता आलं नाही. औरंगजेबानं तिघांची मोट अशी वळली की कुणीही त्याच्या विरूद्ध कसलंही कारस्थान करू शकला नसता. औरंगजेबाने बहुधा त्या दोघांवर व छत्रपती शिवाजी महाराजांवर नजर ठेवण्याची कामगिरी मनुचीवर सोपवली. त्यांच्या हालचाली मनुचीतर्फे स्वत:ला कळत जातील अशी योजना त्याने केली असावी. यापैकी राजा जयसिंग व छत्रपती शिवाजी एकत्र येऊन त्याला धोका निर्माण करू शकतील याची त्याला दाट शंका होती. मनुचीला दिलेल्या जीवदानाची किंमत कपटी औरंगजेबाने अशी वसूल केली.

या तिघांपैकी कुणीही (एकमेकांपैकी) परस्पर अडकले व बळी गेले असते तरी त्याला चालले असते वा आवडले असते. औरंगजेब हा असा होता. आग्र्याला छत्रपतींना बोलावून व जयसिंगाला दिलेरखानासोबत दक्षिणेत अडकवून पाताळयंत्री औरंगजेबाने काय साधले हा प्रश्न मनुचीला पडला. या कारस्थानाची परिणती स्वत: औरंगजेबाला दक्षिणेस स्वत:च्या आयुष्याची शेवटची २५ वर्षे काहीही फायदा न होता लढून स्वत:चा विनाश व मृत्यू उघड्या डोळ्यांनी पाहाण्यात झाली. औरंगजेब १७०७ साली अहमदनगर येथे अत्यंत हलाखीत मृत्यू पावला. तेव्हा त्याच्या बिछान्याजवळ नियामतअली हा एकच नोकर उरला होता. त्याच्यासाठी रडणारा कुणीही नव्हता.

***

चकवा

रणरणते ऊन. वेळ असेल १-१.३० ची. मालवणहून जीपने आम्ही आमच्या गावाकडे परतलो होतो. एका दुकानातून आमचे आप्त आप्पा पाध्ये यांनी स्वत:साठी तलम धोतरजोडी खरेदी केली. आमचं चहापाणी झालं. त्यांची स्वत:ची जीप असल्याने कुठे जायचं, काय बघायचं त्यानीच ठरवलं होतं. दोघांचही गाव बुधवळं. घरी पोहोचल्यावर मस्तपैकी जेवायचं आणि ताणून द्यायची. दुसऱ्या दिवशी मुंबई गाठायची, मुक्काम त्यांच्याकडे, असा बेत ठरला होता.

येताना माळ लागला. अर्धा कातळ, बाकीची तांबडी माती. भर दुपारच्या फुफाट्यात घामाच्या धारा लागल्या. कुठेच झाड दृष्टीला पडत नव्हतं. मध्येच एक आंब्याचे झाडं दिसलं; सावली देण्याएवढीही उंची नसलेलं. पण पानं मात्र तुकतुकीत हिरवी-काळी. चार पायवाटा तिथे फुटल्या होत्या. जीपचा ड्रायव्हर नवखा होता; आप्पा बुधवळ्याचे रहिवासी "कुठे घेऊ" त्यानं विचारलं. आप्पा म्हणाले, "घे उजवीकडे" त्यानं गाडी वळवली. आम्ही आपापसात गप्पा मारत गाडीबरोबर ठेचकाळत चाललो होतो. एव्हाना सर्वांनाच भुका लागल्या होत्या. कधी घर गाठतो असं झालं होतं. धुरळा उडवत चाललेली जीप अचानक थांबली. ड्रायव्हरचे डोळे विस्फारले होते. "काय रे थांबलास का ?" "मघाचंच झाड आणि त्याच वाटा. परत इथेच आलो की" तो बोलला.

जणू काहीच झालं नाही असं भासवीत आप्पा म्हणाले, "अरे मी तुला उजवीकडे वळायला सांगितलं होतं. कुठे वळवलीस तू गाडी ?" "उजवीकडे" तो म्हणाला. "मी उजवीकडेच गाडी वळवली." त्याच्या स्वरातला त्रासिकपणा सर्वांना जाणवला.

"आता नीट समोर घे बघू" आप्पा उत्तरले. त्यांचा चेहरा गोंधळलेला दिसला. ते तिथलेच रहिवासी. सतत जीप नाहीतर फटफटीवरून विजयदुर्ग, देवगड, नांदगाव, फोंडा, कणकवली करणाऱ्या आप्पाना छेडावं असं मला वाटेना. ड्रायव्हरने रिव्हर्स घेऊन जरा गुश्श्यातच गाडी स्टार्ट केली व समोरच्या दिशेनं गाडी हाणली. अशीच वीस एक मिनिटं गेली असतील. करकचून ब्रेक दाबल्यामुळे आम्ही एकमेकांवर

आदळलो. आता काय झालं ? परत तेच झाड आणि त्याच चार वाटा समोर. आता मात्र आम्ही हबकलो.

तरी एक गोष्ट मला समजेना. आम्ही तर बाहेरचे, पण आप्पा इथले. मग त्याना आपलं घर कुठेय हे का समजू नये ? आप्पांकडे बघितलं. घामानं नखशिखांत भिजलेल्या त्यांच्या चेहऱ्यावरचे अपराधी भाव कळले तरी आम्ही तसेच मख्ख बसलो. कुणीच काही बोलत नाही याची जाणीव असह्य झाल्याने आप्पा उठले. फ्रंटला बसलेले आप्पा दार उघडून त्या झाडासमोर येऊन उभे राहिले.. उत्सुकता, आश्चर्य, भीती अशा मिश्र भावनेपोटी आम्हीही उतरलो. तासभर नुसत्याच चकरा आणि हाडंही खिळखिळी झाली. भर उन्हात, पोटात कावळे कोकलत असता हे झाड वारंवार समोर येऊन आम्हाला वाकुल्या दाखवतंय याचा रागही आला होता.

अचानक आप्पांनी हात जोडले. ते म्हणाले, " देवा महाराजा (कोकणात हा शब्द सर्वत्र ऐकू येतो.) अरे बाबा का छळतोस आम्हाला? काय चूक झाली असेल तर पोटात घे, तुला धोतरजोडी देईन. " त्यांचे डोळे मिटले होते. आम्हीही हात जोडून आमचे डोळे मिटले. त्या अवस्थेत तसेच काही क्षण गेले असावेत. बैलगाडी आणि घुंगरांचा आवाज कानावर आला. आमच्या डाव्या बाजूने एक बैलांचा कासरा धरलेला गाडीवान आणि दोन पुष्ट बैलांची जोडी कसा कुठून आला कळेना.

" काय ओ आप्पानु इथं काय करताहां ? " " अरे बाबा काय सांगू तुका. महाराजानं वाट अडवलीय बुधवळ्याची रस्तोच कळत नाही कुठलो तो ? "

" हात्तीच्या मी ह्यो रस्त्यानं इलोय, नाकासमोर चल्ला मिर्लेश्वराचो देऊळ आणि तळी ते बघा समोर खाली जावा पाच मिनिटात बुधवळ्याक पोचाल. जावा निवांत " असं म्हणून तो गेलासुद्धा.

आम्ही पटापट जीपमध्ये बसलो. आप्पानी सीटवर ठेवलेली कोरी करकरीत धोतरजोडी त्या झाडापाशी ठेवली. " अहो करताय काय सकाळीच ती तुम्ही स्वत:साठी खरीदलीय. " माझ्या ओठावर आलेले शब्द बाहेर मात्र पडले नाहीत. मिर्लेश्वर आणि त्याची तळी इतक्या जवळ असून मघापासून आम्हा चौघांपैकी कुणालाच कशी दिसली नाही ?

गाडी सुरू केली तेव्हा उन्हं कलतीला लागली होती. वाऱ्याच्या झुळूकाही अंगाला चाटून जात होत्या. पाच मिनिटंसुद्धा लागली नसतील घरी पोहोचायला. " कोण होता हो तो गाडीवान ? " मी आप्पाना

विचारलं. ते आपल्याच तंद्रीत दिसले म्हणाले, " आठवत नाही. " उतरताक्षणी हात-पाय धुतल्यावर आप्पा बाहेर आलेल्या सौभाग्यवतीला म्हणाले, झटपट पानं घे बघू आणि एक पान समोरच्या आंब्याच्या झाडाजवळ ठेव. पत्नी म्हणाली, जेवण केव्हाचं तयार आहे. ते खट्याळ झाड आजही माझ्या डोळ्यासमोर येतं. हाच खेळ ते परत परत करीत असेल काय ?

***

प्राचीन गंध व अत्तरे

कैरो म्युझियममध्ये प्राचीन गंध व अत्तरे यांच्या विविध आकारांच्या कुप्या बरण्या (Jars) पर्यटकांना दाखवितात. आता काळी पडलेली ही अत्तरे वा सुवासिक तेले सुकून घट्ट दगडाप्रमाणे व्हॅली ऑफ द किंग्ज व निरनिराळ्या पिरॅमिडस्मध्ये उत्खननाच्या वेळी सापडली आहेत. सर्वात जुनी अत्तरकुपी खुफू वा चिऑप्स या इ. स. पू. ४५०० वर्षांपूर्वीच्या सम्राटाच्या ग्रेट पिरॅमिडमध्ये सापडली आहे. तिच्यावर चित्रलिपीत त्याचे नाव आहे. चिऑप्सचा दारू पिण्याचा एक सुवर्णप्याला हे दोन्ही स्मृतिविशेष एवढीच खुफूची ओळख आज म्युझियमने जपली आहे.

अत्तरे व मद्य यांनी फार पूर्वीपासून जगाचे कानेकोपरे व्यापले. रावण आणि खुफू हे समकालीन सम्राट होऊन गेले. रावणाने जहाज निर्मिती व व्यापार याबरोबरच अर्कशास्त्र म्हणजे मद्यनिर्मितीला सर्वप्रथम सुरूवात केली. तो स्वत: एक स्थापत्यशास्त्रज्ञही होता. श्रीलंकेतून इजिप्तकडे मद्य, सोने, हस्तिदंत, चंदनाची निर्यात होत असे. लांब धाग्याचा कापूस इजिप्तमधून हिंदुस्थान व लंकेकडे निर्यात होई. इजिप्तशियन सम्राट व सम्राज्ञी त्वचेचा मुलायमपणा व सौंदर्यासाठी अत्तरे व तेल वापरीत. मृत्यूपश्चातही अशी शेकडो प्रकारची तेले व अत्तरे त्यांच्या थडग्यात मिळाली आहेत. आस्वान धरणाजवळ इजिप्तची अशी एक प्रयोगशाळा आहे. जिथे सम्राज्ञींच्या थडग्यात मिळालेल्या मद्य व अत्तर कुप्या सापडणारी सुकी भुकटी रासायनिक विश्लेषण करून त्या त्या मद्य व अत्तरांचे घटक ठरवत जातात. परिणाम, रंग यांचे निश्चित स्वरूप शोधले जाते. ज्या सम्राज्ञीच्या थडग्यात ती कुपी वा बरणी असेल तिचे नाव त्या त्या अत्तर, तेल व मद्याला दिले जाते.

क्लिओपात्रा, नेफरटिटी, हाटरोप्सूट, नेफरटारी किंवा त्या राण्यांची नावे आणि त्या वापरीत असलेल्या मद्यांच्या चवी व त्याचे खास सुगंध. राबी नावाचा जो म्युझियम गाइड आम्हाला म्युझियम दाखवीत होता तो म्हणाला, आम्ही त्या त्या राण्यांच्या आवडीच्या मद्य वा अत्तराप्रमाणे ते मद्य वा सुगंध आजही बनवतो. त्यांची प्रत, रंग, रूची, गंध हे त्या त्या सम्राटाच्या काळातले आहे आणि आमच्या संस्कृतीची हीच ओळख आहे.

***

मृत सम्राटाचा पुनर्जन्म !

रॅमसेस् द सेकंड इ. स. पू. १२१२ मध्ये जन्मला व इ. स. पू. १२७९ मध्ये मृत्यू पावला. व्हॅली ऑफ द किंग्ज या ठिकाणी या सम्राटाचे दफन झाल्यावर कित्येक शतकांनी चोरांनी त्याचा लपवलेला खजिना लुटला. त्याच्या ममी भोवतालची लिननची वस्त्रे, दागदागिने, त्याच्या नावाची प्लेट ओरबाडून काढली व सोनं, नाणं, जवाहर जे जे किमती मिळेल त्यासह ते पसार झाले. फ्रेंच पुरातत्वज्ञ गास्टन मास्पेरो (Gaston Maspero) यानं खूप कष्ट घेऊन रॅमसेसला शोधून काढले. चोरांनी त्याची व इतर ममींची खूप नासधूस केली होती. १९१२ साली एक्स-रे परीक्षणात शास्त्रज्ञांना सम्राटाच्या शरीरावरची त्वचा रोगग्रस्त होऊन सडत चालल्याचे लक्षात आले. उपचार झाले नाहीत तर काही महिन्यात सम्राटाचे शरीर नामशेष झाले असते. रोगाचे निदान, उपचार मृत शरीरावर करून ते नव्यासारखे करणे यासाठी सर्वात योग्य ठिकाण, उच्च तंत्रज्ञान व तंत्रज्ञ यांचा जगभरात शोध घेतला गेला. १०२ शास्त्रज्ञांची टीम बनवली गेली. फ्रान्सच्या ग्रेनोबल या ठिकाणी एक सर्वोत्कृष्ट लॅबॉरेटरी नव्याने उभी केली.

एक विचित्र फंगस हळूहळू पण निश्चितपणे सम्राटाचे मृत शरीर गेली ३००० वर्षे उघड्यावर पडलेल्या अवस्थेत आतून पोखरत होती. डॉ. स्वाकींनी फंगस, गळलेले केस यांचे गामा रेडिएशन व कोबाल्ट ६० या तंत्रज्ञानाचा उपयोग करून रोगाची कारणमीमांसा केली. सम्राटाला वयाच्या ६५ वर्षी मृत्यू आला. त्याला गुडगुडीत (हुक्का) वापरल्या जाणाऱ्या तंबाखूमुळे घशाचा कर्करोग झाला. त्याच्या मृत्यूचे महत्त्वाचे कारण ठरवताना डॉक्टर स्वाकींच्या टीमने सम्राटाला शेवटचे काही दिवस खाताना घशातून गिळता येत नसल्याने खूप त्रास होत होता. मृत्युसमयी त्याला जो त्रास झाला त्याच्या वक्ररेषांनी त्याची चेहरेपट्टी आक्रसल्याचे निदान केले.

फंगसचे उच्चाटन, शरीर व चेहऱ्याच्या आक्रसलेल्या त्वचेला नव्याने ट्रीट करून ती मऊ व रेषांविरहित करण्यावर भर दिला गेला. रेडिऑलॉजी एण्डोस्कोपी, क्रोमॉडेसिटोग्राफी, बॅक्टेरिऑलॉजी, पॅलेनॉलॉजी, पॅलाओबॉटनी अशा सर्व शास्त्रांतील १०२ तज्ज्ञांचा उपयोग वेळोवेळी करून सुमारे तीन वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत त्याच्या झीज

होत जाणाऱ्या अवयवांची चित्रफीत काढली जाई व उपचार केले जात. इजिप्तमध्ये ३२८० वर्षांपूर्वी मृत झालेल्या त्या सम्राटाला फ्रान्समधल्या संपूर्ण वातानुकूलित प्रयोगशाळेत तीन वर्षे नग्नावस्थेत काढावी लागतील असे कधीतरी कळले असते का ? मृत्यूनंतर इतक्या दीर्घकाळांनी डॉक्टरांचा शेवटचा रिपोर्ट आला त्यात लिहिलं होतं.

डॉ. रॅमसेस् द सेकंड ६५ वर्षांचे जीवन जगला तेवढ्या काळाचे त्याचे आयुष्य आधुनिक तंत्रज्ञानाचे आज नव्याने त्याला प्राप्त झाले आहे. यापुढे तो अमरच राहील.

आज कैरो म्युझियममध्ये रॅमसेस् द सेकंड पहिल्या दालनात शांतपणे झोपलेला आहे. जिवंतपणी पलंगावर झोपत असे तसाच, पण ३८०० वर्षांनीही तसाच.

***

जगातले पहिले प्रेमपत्र

'शेवटचा दिवस !' हे पॉम्पी या शहरावरील प्रदर्शन गेली तीन वर्षे जगात फिरवले जात आहे. इ. स. ७९ मध्ये नेपल्सच्या (इटली) समुद्रधुनीजवळ असलेला व्हेसुव्हियस या पर्वतावरील ज्वालामुखी अचानक जागा झाला व त्याच्या पायथ्याशी असलेले पॉम्पी हे व्यापारी शहर संपूर्णपणे धूळ, धूर आणि माती यांचा तिहेरी उद्रेक होऊन जमिनीखाली गेले. समुद्राच्या खवळलेल्या लाटांचा मारा होऊन जो चिखल त्यावेळी झाला त्यात तिथल्या इमारती, रस्ते, माणसे सारे काही क्षणात जसेच्या जसे गिळंकृत झाले. त्या सर्व क्षणांचे उत्खनन, छायाचित्रण, कॉम्प्युटर संकलन, अंतराळ इमेजरी विश्लेषण केले गेले. चित्रफिती झाल्या. या सर्व छायाचित्रांत 'जगातले पहिले प्रेमपत्र' हे एका गुळगुळीत टाइलवर काढलेले चित्र एकूण २८० पॅनेल्समधले नंबर १ चे चित्र म्हणून गणले गेले आहे. काय आहे ते ? कुणी एक १७-१८ वर्षांची तरूणी स्वत:शीच विचार करीत निवांत बसली. काळ, वेळ तिच्यासाठी स्तब्ध झाले. त्या युवतीच्या हातात एक वही व हातात टाक आहे. तिच्या विचारमग्न अवस्थेवरून ती बहुधा आपल्या प्रियकराला पत्र लिहिणार असावी. मार्बल टाइलवरचे तांबूस मातट, हिरवा, पिवळसर अशा छटा दर्शविणारे हे एक मार्बल वॉल पेंटिंग आहे. चित्रकार व केमिकल ॲनलायझरकडून या रंगाचे विश्लेषण झाले. बॉटल ग्रीन, पिवळा, तपकिरी व काळा या रंगांचे बेमालूम मिश्रण त्या प्रसंगाला उठाव देते. ते अचूकपणे उतरविण्याचे शास्त्र रोमनकाळात कसे प्रगत झाले हे सांगणारा हा एकमेव अवशेष आहे. परंतु ही कष्टसाध्य किमया मार्बल टाइलवर उतरवण्याची तंत्रविद्या निश्चित करता आली नाही. त्या तरूणीचे बोलके विचारमग्न डोळे, ओठाखाली टेकलेला टाक व पुस्तक सारे कसे प्रमाणबद्ध जसे असावे तितकेच. कॅमिओ नावाची रंगमिश्रण काच व वरील टाइलवरील मंद रंगमिश्रण कलावैशिष्ट्ये दाखविणारे फक्त दोनच अवशेष आज जगात उरले आहेत.

***

फ्रेंच खजिना कुठे लपलाय ?

मेरी अ‍ॅन्टायनेट ही ऑस्ट्रियन जर्मन आणि हंगेरियन राजवंशातील सुंदर राजकन्या होती. युरोपात ही तीनही राष्ट्रे फ्रान्सची शत्रुराष्ट्रे होती. त्याकाळी फ्रान्स हे एक संपन्न बलाढ्य राष्ट्र होते. सतत युद्धे होत. पण ज्यावेळी लग्नासाठी उपवर वधू शोधण्याचा प्रसंग येई तेव्हा हीच राष्ट्रे अशावेळी शत्रूच्या घरात आपली मुलगी देण्याघेण्यास कचरत नसत. लग्नानंतर वैर संपले असं मात्र कधी झालं नाही. इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, जर्मनी (प्रशिया), ऑस्ट्रिया, हंगेरी यांचे या अगोदर नातेसंबंध झाले. तितकीच युद्धेही. मेरी ही एक नाजूक फुलपरी अशीच १६ व्या लुईची वधू म्हणून राजवाड्यात एखाद्या हळुवार गुलाबाच्या टवटवीत कळीप्रमाणे आली आणि इतक्या सहजपणे त्या राजेशाही सुगंधाचा अंश बनून गेली की फ्रेंच जनतेला ती ऑस्ट्रियन वाटलीच नाही. फ्रेंच नसूनही ती उत्कृष्ट फ्रेंच बोले. प्रशियन आणि जर्मन या तिच्या माहेरच्या भाषा तिला बालपणापासून संस्कार आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्व देऊन गेल्या. तिची जी पदके, पोर्ट्रेटस् उपलब्ध आहेत त्यावरून तिच्या लाघवी व्यक्तिमत्त्वाची कल्पना येते.

प्रत्येक क्रांतिलढ्यात प्रस्थापित राज्य शासन उलथण्यासाठी बंडखोर अशीच पावले उचलतात. खऱ्याखोट्या नोंदीनंतर इतिहास घडवतात जो खरा असतो असं नाही. राजेशाही उलथून टाकण्याच्या प्रयत्नात १६ वा लुई व अ‍ॅन्टायनेट यांच्या हातून काही दुष्कृत्ये घडली. त्यांनी रयतेवर जुलूम, अन्याय केला असं प्रत्यक्षात आढळलेलं नाही तरीही अनेक युद्धात सहभागी झालेले फ्रान्स आर्थिकदृष्ट्या डबघाईला आलं होतं. १४ व्या लुईसारखा महत्त्वाकांक्षी धाडसी स्वभाव नसल्याने त्याच्या गादीवर बसलेल्या १६ व्या लुईला राष्ट्राचे नेतृत्व करता आले नाही व उपद्व्यापी राजकारण्यांनी बंडखोरांना हाताशी धरून त्याची कोंडी केली.

फ्रेंच दफ्तरात १६ व्या लुईला वंशपरंपरेने मिळालेल्या अफाट खजिन्यातील वस्तूंची संपूर्ण नोंद आहे. पण आज त्याचा ठावठिकाणा लागत नाही. कुणी डल्ला मारला म्हणावं तर तसा एकही प्रसंग नोंदलेला नाही. प्रत्येक देशाच्या स्वत:च्या अशा धनदौलत लपविण्याच्या जागा असत. पण त्याची नोंद कुठेही ठेवली जात नसे. त्यामुळे फ्रेंच सरकार अशी

कुठलीही वाच्यता करणार नाही. दुसऱ्या कुणी आपल्या खजिन्याचा शोध घ्यावा, असं कुठल्याही राष्ट्राला वाटत नसतं. ब्रिटिशांनी हिंदुस्थानावर कब्जा मिळविल्यानंतर असे कित्येक घटनासंदर्भ स्थाने यांचा शोध घेतला, परंतु हिंदुस्थानींना त्यांनी अशा संशोधनात सहभागी केले नाही.

***

हायन्रिश श्लीमनचे ट्रॉय

अतिंद्रिय शक्ती नावाची काही अनाकलनीय शक्ती अस्तित्वात आहे किंवा नाही यावर खात्रीपूर्वक काही सांगता येणार नाही. परंतु इतिहासात अशा काही घटना घडल्याची नोंद आहे. अशा नोंदीच्या आधारे कित्येक कथा-कादंबऱ्या-चित्रपट निघालेले आहेत. हायन्रिश श्लीमन एक जर्मन पुरातत्वज्ञ आणि सोफिया श्लीमन ही ग्रीक युवती त्याची सहकारी त्याच्या पुढील आयुष्यात त्याची पत्नी झाली. दोघेही ट्रॉय या प्राचीन सुवर्णनगरीचा शोध घेत होते. हायन्रिशच्या जीवनावर ३० वर्षांपूर्वी एक चित्रपट काढण्यात आला. त्याचे कथानक अतिंद्रिय शक्तीवरच आधारित आहे.

जगात तीन सुवर्णनगरींची नोंद आहे. त्यांची वर्णने आहेत. दक्षिण अमेरिकेत ॲमेझॉन नदीच्या घनदाट जंगलात एल डोरॅडो (EL DORADO) आफ्रिकेत सालोमन नगरी व तुर्कस्तानात बुनारबसी (म्हणजे पूर्वीचे ट्रॉय) या तीन सुवर्णनगरी म्हणून इतिहासात नोंदल्या गेल्या. याचं प्रमुख कारण म्हणजे ॲमेझॉन, कांगो, सहारा, तुर्कस्तान, इजिप्तमधील समुद्रकिनारे, जंगले, वाळवंटे, दुर्गम पर्वतातली खोरी, कडेकपारीतून जाणारे आडमार्ग, नद्या, पाऊलवाटा यात ठिकठिकाणी स्पॅनिश पोर्तुगीज वा अगम्य भाषेतल्या डायऱ्या, पादत्राणे, दारूच्या रिकाम्या बाटल्या, मानवी सांगाडे, कुठेकुठे सापडले आहेत. डायऱ्यातल्या नोंदीवरून ही माणसे कुठल्या ना कुठल्या सुवर्णनगरी वा खजिन्यांच्या शोधार्थ बाहेर पडली होती. अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर काहींना अशा नगरीचा पत्ता लागला. काहींनी त्याचे नकाशे काढले. दिसलेल्या मंदिरे-मूर्तींची चित्रे काढली. टिपणे तयार केली. परंतु परतीच्या वाटेवर अन्न-पाण्याअभावी त्यांचा मृत्यू झाला. जगातल्या अनेक वस्तुसंग्रहालयात काही पाने वा डायऱ्या ठेवलेल्या आढळतात. पण पुढे काही निष्पन्न झाले असे म्हणता येत नाही.

हायन्रिश व सोफिया हे जोडपे मात्र ट्रॉय शहर शोधण्यात यशस्वी झाले. सोफियाचे ट्रॉय शहरात मिळालेले काही दागिने अंगावर घातल्याचे छायाचित्र उपलब्ध आहे. ट्रॉय शहर शोधण्याचा ध्यास हायन्रिशला वयाच्या सातव्या वर्षी त्याच्या पित्याने दिलेल्या पुस्तकामुळे लागला. हायन्रिश

तरूण वयात व्यापारी झाला. खूप पैसे मिळवूनही, एक सुंदर सहकारी पत्नी मिळूनही ट्रॉय शोधण्याच्या नादात सारा जमीनजुमला विकून पुढील १७ वर्षे ट्रॉय शोधण्याच्या दुर्दम्य इच्छेपोटी ठिकठिकाणी भटकत राहिला. असं म्हणतात की, त्याच्या या छंदापायी त्याला वेळोवेळी अगम्य संदेश मिळत गेले. जे त्याच्या वस्तुसंग्रहालयात भिंतीवर जर्मन वा लॅटीन भाषेत आपोआप उमटत. त्यात त्याने कुठे काय शोधावे, याच्या सूचना असत. कधी कधी काही वस्तू, खांब, मूर्तीची चित्रे आणि रेखाचित्रे असत. त्या नोंदीचीच पुढे एक डायरी तयार झाली व त्यावरून एक चित्रपटही तयार झाला.

त्याचं थोडक्यात कथानक असं आहे. हेलन या त्या काळातील सर्वात सुंदर स्त्रीचं लग्न एका राजपुत्राशी झालं असताही ट्रॉय शहराचा राजा प्रियाम याचा पुत्र पॅरिसनं तिला एका समारंभात तिच्या संमतीने पळवून तो स्वत:च्या ट्रॉय शहरी गेला. स्पार्टा हे ग्रीक राज्य होतं. ग्रीक वीरांनी ट्रॉयवर हल्ला करून पॅरिससह सर्व ट्रॉयवासीयांची कत्तल करून बदला घेतला. २००० वर्षांपूर्वीची ट्रॉयनगरी ओस पडली व विस्मृतीत गेली. ती एक ‘ सुवर्णनगरी ’ होती हे मात्र इतिहासात कायम राहालंय. हायन्रिश त्या नादानं झपाटला गेला. त्याची डायरी भरली पण ट्रॉयचा शोध कुठे, कसा घ्यायचा काही निश्चित ठरेना. त्यानं ती डायरी अनेकवेळा वाचून काढली. एशिया मायनरच्या किनाऱ्याला एवढ्या माहितीवरून त्याने पत्नी सोफियासह कूच केलं. त्याला वाटलं त्या त्या ठिकाणी त्याने उत्खनन केलं. हॉटेल, मजुरांचे पगार यापायी प्रचंड खर्च झाला. पूर्ण कफल्लक असलेल्या हायन्रिश श्लीमनला संशोधन चालू ठेवणे शक्य झाले नाही आणि नशिबाला दोष देत त्यानं आपलं बिस्तर आवरून परत मायदेशी जाण्याचा निर्णय घेतला. तो ज्या हॉटेलमध्ये उतरला होता ते तिसऱ्या मजल्यावर होतं. अत्यंत दु:खी झालेल्या श्लीमनला रात्री अचानक जाग आली. ‘ चल ऊठ, माझ्या मागे चल ’ असा संदेश वारंवार येत असूनही थकलेल्या हायन्रिशला उठवेना आणि काही वेळानंतर पाहतो तो त्याचे पाय ओले झाले होते. समुद्राच्या लाटा त्याच्या पायाला स्पर्श करीत होत्या. हायन्रिश ताडकन उठून त्या लाटांपाठोपाठ चालत बुनारबसीच्या समुद्रकिनारी येऊन पोहोचला. तिथे एक उंच पुरूष उभा होता. तो म्हणाला, ‘ मी राजा प्रियाम ’ (त्याचं भूत) तुला मदत करण्यासाठी आलो आहे. इथे खोदाई चालू कर. एका खाली एक अशी सात शहरं तुला मिळतील. त्यातलं सहावं शहर सुवर्णनगरी आहे. हायन्रिशनं नव्या उत्साहानं खोदाई

सुरू केली. ट्रॉय शहर लवकरच सापडलं.

हायन्रिशला संदेश कुठून कसे येत यावर शोध चालू झाला. त्रिशूळासारखी तीन सुवर्णाची अत्यंत पातळ पाने असलेली फांदी तिथे सापडली. ती पाने आपोआप कंपायमान होत तेव्हाच हायन्रिशला काही संदेश मिळे. पण ही प्रक्रिया फक्त त्याच्याच बाबतीत होत होती. इतरांना त्याचा अनुभव येत नव्हता. का, हे कधी कळलं नाही. परंतु त्यामुळे सुवर्णनगरी ट्रॉयचा शोध लागू शकला, हे एक न उलगडलेलं कोडं आहे हे मात्र आश्चर्य आहे.

***

चाच्यांचे ओक आयलंड

सुमारे २०० वर्षांपासून जगात खजिने, त्यांचे गूढ अस्तित्व, त्यावरचे नकाशे, नोंदी शोध घेणाऱ्यांचे बळी यावर मोहिमा, संशोधने सुरू झाली.

कॅनडाच्या नोव्हा स्कॉटिया प्रदेशात काही चाच्यांची बेटे आहेत. १७ व्या शतकात चाचे भरसमुद्रात व्यापारी जहाजे लुटत. त्यातल्या सर्व खलाशांना ठार मारीत व लुटलेली संपत्ती स्वत:च्या बेटावर आणून पुरत. या बेटांवर त्यांचा २४ तास पहारा असे. त्यामुळे जलमार्गावरील सर्व देशांची जहाजे चाच्यांचे बेट समूह टाळीत. नोव्हा स्कॉटियातील छोट्या बंदरातील मच्छीमार जीव मुठीत ठेवून मासेमारीला बाहेर पडत.

फ्रेंच खजिन्याच्या गायब होण्याशी या चाच्यांचा संबंध असण्याची नोंद कॅनडा, इंग्लंड व फ्रान्सच्या दरबारात आहे. पण ती फक्त नोंद आहे. त्याची सत्यासत्यता पडताळून पाहण्यात आलेली नाही. ती नोंद एवढेच म्हणते की, १६ वा लुई व अन्टायनेट यांचा वध झाल्यानंतर नोव्हा स्कॉटियातील मच्छीमारांनी एक जहाज ओक आयलंडकडे जाताना पाहिले. त्या जहाजात बरेच बंदूकधारी इसम (बहुधा फ्रेंच सैनिक) होते.

ओक बेटावर फार पूर्वी चाचे लुटीचा माल पुरत. चाच्यांची सद्दी संपल्यावर इथे संशोधक येऊ लागले. या बेटावरील उंच टेकडीवर पूर्वी एकच झाड होते. ते ओकचे असल्याने त्याचं नाव ओक आयलंड झालं. त्या झाडाच्या विशिष्ट फांदीवर बसल्यावर खाली रानपृष्ठावर आपोआप एक वर्तुळ दिसू लागे. त्या ठिकाणी (मनी पिट) अनेक कंपन्या व संशोधकांनी उत्खनन केले. अगदी २० फूट खोल ड्रिलिंग केल्यावर त्यांना सिमेंटसारख्या जाड आवरण थर उभे-आडवे ड्रिलिंग मशीनला घासू लागले. ७ x ७ फूट अशी ती खोली होती. २०० फूट खोल ड्रिलिंग झाल्यावर खणणाऱ्यांच्या हाती फक्त काही सिमेंटचे तुकडे आले. त्या अगोदर बैलगाडी वा जहाजाच्या रचनेत वापरली जाणारी फळकुटे, वंगण, कानात घालण्याच्या सोनेरी इअरिंगपैकी एक नग, तुटलेल्या गळ्यातल्या चेनचा एक तुकडा, चामड्यावर कोरलेली गूढ लिपीतील अक्षरे, नारळाचा काथ्या... बस २०० वर्षांत मिळालं ते एवढंच.

समुद्राच्या बाजूने एखादं भुयार त्या खोलीकडे जात असावं या कल्पनेपायी तसाही शोध घेतला गेला. एक होडी जाऊ शकेल असे एक भुयार आढळलेही, परंतु आतल्या बाजूने ते कुठेतरी सिमेंटने लिंपलेले दिसले. परंतु आसपास कुणीतरी आधीच सुरूंग लावून तोडफोड करून ठेवली होती. पुढल्या मार्गात अशा तोडफोडीने आत शिरण्याचा मार्ग बंद झाला होता. १९६५ साली शेवटचे ड्रिलिंग झाले. त्यानंतर त्या जागेच्या मालकाने कोर्टात मनाई हुकूम मिळवून संशोधकांना इथं खोदकाम करण्यास बंदी आणली. इथं फ्रेंच खजिना लपविला गेला की अन्यत्र कुठे याचा शोध लागणे आता कठीणच आहे.

***

काळाने जपलेले सुगंध आणि ठसे

हॉवर्ड कार्टर आणि लॉर्ड कॉर्नरव्हान या पुरातत्त्वज्ञांनी १९२२ साली व्हॅली ऑफ द डेड या इजिप्तमधील प्राचीन राजांच्या कबरस्तानात तूतनखामून या राजाची ममी शोधून काढली व त्याचा मौल्यवान खजिनाही. तिथे त्यांना दोन आश्चर्यकारक गोष्टींचा शोधही लागला.

पांढऱ्या रंगाच्या काही बरण्या (Jars) मूळ ठिकाणापासून घरंगळत गेल्या होत्या. काही वरून खाली पडल्यानं फुटल्या होत्या. त्यातून जो द्रवपदार्थ सांडत वाहात गेला होता तो नंतर सुकला होता व त्यावर माणसांच्या निरनिराळ्या पायांच्या आकारांचे ठसे उमटले होते. ३५०० वर्षांनंतर ते ठसे स्पष्टपणे काळाने जपले होते. ती पावले हे सांगत होती की, त्यांच्या पळण्याची दिशा खोलीबाहेर घाईघाईने झालेल्या पाठलागासारखी वाटत होती. हॉवर्ड कार्टरला त्यांच्या अगोदर तिथे चोर येऊन गेल्याचा स्पष्ट संकेत मिळाला. त्या दिशेने पाहणी करताना तो एका खड्ड्यापाशी (Pit ५५) पोहोचला. त्या खड्ड्यात नंतरच्या संशोधनात एक पागोटे आणि त्यात दडवलेली अंगठी सापडली. कार्टरला तूतनखामूनला तिथे शवपेटीत बंदिस्त केल्यानंतर व गुप्तपणे ती सुरक्षितपणे लपविल्यानंतर लगेचच झालेली पहिली चोरी होती हे कळले व त्या प्रयत्नात चोरांच्या हाती जास्त काही पडले नसावे हे कळले. कदाचित तिथल्या पहारेकऱ्यांना चोर आल्याचा सुगावा लागला असावा. झटापट झाली असावी असं मधल्या लॉबीमध्ये पडलेल्या काठ्या व शहामृगाच्या पिसांचा वारा घेण्याचा उंची पंखा सांगत होता. दरवाजाची सिले उचकटल्याचं दिसत होतं. त्या पॅसेजला पांढरा रंग ज्याकाळी लावला तिथे दरवाजालगत डाव्या तळहाताचा एक ठसाही त्यांना आढळून आला. तो कदाचित त्या चोरांच्या सहकाऱ्याचा असावा. बाहेरून कुणी आत येतंय का यावर तो चोर पाळत ठेवून असावा. हे चोर पकडले गेले वा पळण्यात यशस्वी झाले हे मात्र कधी कळले नाही.

इजिप्तमध्ये पिरॅमिडस् व राजेराण्यांच्या थडग्यात काळसर, पिवळसर, तांबूस रंगाचे गोळे (टेनिस बॉलच्या आकाराचे) वेळोवेळी मिळत गेले. आमसुलाची मुठेलं जशी उष्ण केल्यावर वितळतात तसे हे

गोळे वितळत व त्यावेळी उग्र दर्प व निरनिराळे सुगंध व धूर बाहेर पडे. रासायनिक विश्लेषणात ते ॲम्बर ग्रीझ या नावाचे मेण आहे हे कळलं. त्यातून सुगंध का पैदा होई व त्याचा काय उपयोग होई, ते कुठे सापडे याचा शोध घेतला गेला. Ambergris - Ambragrisa हे प्राणीजन्य मेण व्हेल नावाच्या माशाच्या पोटात हळूहळू तयार होतं. अशा साठलेल्या मेणामुळे व्हेल माशाला काही काळानंतर दुखू लागल्याची भावना होते व समुद्रतळाशी जाऊन व्हेल ते ओकून टाकतो. ही मुठेलं अधूनमधून समुद्राच्या पृष्ठभागावर येत. इजिप्तचे राजे-राण्या त्याचा अनेक प्रकारे उपयोग करीत. त्यात वेगवेगळी तेले व सुगंधी घटक मिसळून ते स्नानाच्या वेळी, काया मुलायम व्हावी म्हणून, राजासमवेत मदिरापान करताना अशा स्वरूपात त्याचा वापर होई. त्या मूळ उग्र दर्पात निद्राधीन करण्याचा गुणही आढळला.

कैरो म्युझियममध्ये ॲम्बरग्रीस सुगंधाचे गोल व चौकोनी गोळे पर्यटकांना दाखवले जातात. ३५०० वर्षांपूर्वीचा सुगंध किती दीर्घकाळ टिकू शकला याचं आश्चर्यही वाटतं. गंध आणि प्राचीन मद्याचा चव व रंग यावर आस्वान धरणाच्या पायथ्याशी असलेल्या प्रयोगशाळेत सतत संशोधन होते. ज्या राजा वा राणीच्या थडग्यात अशी मद्ये सुकलेल्या स्वरूपात (भुकटी) मिळते त्याचे रासायनिक पृथ्थ:करण होते व त्यावरून जी चव व रंग आणि इतर घटक मिळतात त्यावरून नवे मद्य वा अत्तर बनविले जाते व त्याला त्या राणीचे वा राजाचे नाव दिले जाते.

***

थडग्यातल्या प्राचीन वस्तूंचे रहस्य (१)

इतिहासाच्या संकलन क्षेत्रात आता तिथे सापडणाऱ्या छोट्या मोठ्या वस्तूंना महत्त्व आलं आहे. अशा वस्तूंचे तिथे असलेले अस्तित्व हेच एक मोठे रहस्य समजले जाते. काही ठिकाणी चित्रलिपीत नोंद झालेली सील्स, चहाच्या कपासारखे कप्स, प्राचीन दारूचे नमुने, बाटल्या, बरण्या, सुरया, अत्तराच्या कुप्या सर्रास आढळतात.

अशा वस्तूंचे रासायनिक विश्लेषण, नकाशे असले तर त्यांचे तज्ज्ञांकडून अधिक संशोधन होते. ठिकठिकाणी दारूच्या बाटल्या, रिकामे बुधले, दारू साठवण्याचे लाकडी खोके त्यात सुस्थितीत राहिलेल्या कुंभ, कुप्या, सुरया मिळतात. वाळवंटातील उंटांच्या काफिल्यांचे हजारो मैलाचे मार्ग कितीही वादळे आली गेली तरी अशा अनेक वस्तू, दागिने, पदके, नाणी, बूट, डायऱ्या, नकाशे, गळ्यातल्या साखळ्या, नानाविध वस्तू कशा जपून ठेवतात हे एक आश्चर्य आहे.

काही बाटल्यात अर्धवट ओलसर, सुकून मधेच गठ्ठे झालेली द्रावणे मिळतात. पण जर कॉर्क मुळात घट्ट बसला असेल तरच आतल्या द्रव्याचे मूळ ओलेपण (आद्रता) काही प्रमाणात टिकून राह्यल्याचे शास्त्रज्ञांना आढळले आहे. अशा काही बाटल्या शास्त्रज्ञांनी न उघडता तशाच ठेवून दिल्या आहेत. एकदा का बूच उघडले की शिल्लक द्रावण वा पूड स्वरूपात उरलेल्या त्या द्रव्यावर हवेचा परिणाम होईल व त्यांच्या मूळ घटकांवर विपरीत परिणाम झाल्यास विश्लेषण व त्या अनुषंगाने होणारे संकलन कंप्यूटर विश्लेषण यात तफावत पडेल अशी भीती त्यांना भेडसावत असते.

तूतनखामून (तुतनखामन) या इजिप्तशियन सम्राटाच्या थडग्यात त्याला आवडणाऱ्या विविध दारूंचे जार्स एकाला लागून एक अशा स्वरूपात एका दगडी स्टँडवर ठेवले गेले. ती जागा अशा साठवणीला योग्य

नव्हती. तिला मुळातच एका बाजूला उतार होता व त्या बाजूला मुळच्या स्टँडला मजबूत आधार दिलेला नव्हता. हॉवर्ड कार्टरने १९२२ साली थडग्याचा मधला पॅसेज उघडला आणि त्याला अनेक मोठ्या दारूच्या बरण्या घरंगळत त्या पॅसेजमध्ये आडव्या झाल्याचे दिसले. हजारो वर्षांपूर्वी जेव्हा त्या तिथे उघड्या झाल्या त्यावेळी सांडून सुकून गेलेल्या दारूचे अनेक नकाशे तिथे तयार झाले होते. काही ठिकाणी त्यात इकडे तिकडे पळत गेलेल्या पावलांचे ठसे उमटले होते. पॅसेजला लागून असलेल्या चेंबरचा मार्ग खुला करून दरवाजा उघडल्यावर त्याला एका खोक्यात असलेलं द्रव्य सुकलेले व त्यावरही उठलेले पावलाचे ठसे स्पष्ट दिसत होते. त्या ठशात व पॅसेजमधल्या ठशात फरक होता. हॉवर्ड कार्टरने त्याचं विश्लेषण केलं " पहिले ठसे हे पळत जाणाऱ्या व अगांतूकपणे ममीची संपत्ती लुटण्यासाठी आलेल्या चोरांचे व दुसरे ठसे ममीचे रक्षण करण्यासाठी उभ्या असलेल्या रक्षकांचे असावेत. " ही घटना अचानक घडल्याने झालेल्या झटापटीत त्यापैकी काही चोर पळण्यात यशस्वी ठरले. हे लक्षात घेऊन तो त्या दिशेने निघाला व एका बुजवून टाकलेल्या खड्ड्यापाशी आला. (Pit 55) त्याला तिथे बुजविलेल्या भिंतीतील मार्गाची स्पष्ट कल्पना आली. ५५ नंबरच्या खड्ड्यात त्याला एक पागोटे व त्यात लपविलेली एक सोन्याची अंगठी मिळाली. कुठल्याशा चोराने पळताना आपले पागोटे त्या खड्ड्यात टाकून दिले असावे. तिथे रक्षक असतील याची कल्पना चोरांना आली नव्हती वा चोर असे अवतरतील याची कल्पना रक्षकांना न आल्याने पाठलाग व झटापट झाली व कुणाचा तरी धक्का दारूच्या जार्सना लागला व त्या घरगळत मधल्या पॅसेजमध्ये उघड्या झाल्या. झटापट चालू असताना या उघड्या जार्सचा अडथळा दोघाना मुख्यत: चोराना झाला म्हणून ओल्या दारूवर त्यांच्या पावलांचे ठसे बऱ्याच दूरपर्यंत बाहेरच्या दिशेने उमटत गेले व कालांतराने तसेच सुकून गेले. त्यांचा पाठलाग करून त्या मार्गाने परत आलेले ठसे नव्हते. याचा कार्टरने काढलेला अर्थ चोरट्यांचा पाठलाग रक्षकांनी एक तर केला नसेल वा चोरांना नुसताच भास झाला म्हणून दारूवर फक्त चोरांचेच ठसे आहेत. कार्टरच्या म्हणण्यानुसार ही चोरी पूर्णतया अयशस्वी झाली. चोरटे हे ते थडगे उभारणाऱ्यांपैकीच कुणी माहितगार असावेत नाहीतर पॅसेजपर्यंत आत येण्याचा मार्ग त्यांना मिळू शकला नसता. त्यांचे दुर्दैव असे की त्यानी घेतलेल्या कष्टाचे थोडेही चीज झाले नाही.

त्यानंतर आणखी एक चोरी सुमारे १५०० वर्षांनंतर झाली. त्यात

तूतनखामनच्या पहिल्या चेंबरपर्यंत ते पोहोचले. परंतु आतल्या खोलीत सुरक्षित ठेवलेल्या मुख्य खजिन्यापर्यंत त्याना जाता आले नाही. पॅसेजमध्ये शहामृगाच्या आकाराचा पंखा पडला होता. तो पहिल्या चेंबरमध्ये तुतनखामनच्या हिरेजडीत खुर्चीवर ठेवला होता. ती खुर्ची ओढत पॅसेजपर्यंत आणण्यात चोरटे यशस्वी ठरले. परंतु नंतर ती कोपऱ्यात टाकून त्यांना पळ काढावा लागला. आतल्या चेंबरमध्ये असलेला खजिना व तुतनखामनच्या ममीपर्यंत चोर येऊ शकले नाहीत. पण बाहेरच्या चेंबरमधला खजिना व मधल्या पॅसेजमध्ये ज्या २० वस्तू अस्ताव्यस्त पडल्या होत्या त्यावरून चोरांचा दुसरा प्रयत्न त्याना काहीसे यश देऊन गेला. तुतनखामनचा सध्या अस्तित्वात असलेल्या खजिन्यात १५००० वस्तू आहेत. त्या ६ विस्तृत दालनात कायरो म्युझियममध्ये ठेवल्या आहेत. परंतु मुळात जो खजिना त्याच्या थडग्यात ठेवला गेला त्यातल्या ४० टक्के वस्तू चोरट्यांनी पळविल्या असे समजतात.

मी फक्त ४ तास या वस्तूंची दालने पाहात होतो. तुतनखामनचा एक खजिना पाहाण्यासाठी पूर्ण एक महिना दिला तरी तो अपुरा पडेल.

***

प्राचीन हिंदुस्थानचा उपग्रह शोध

एज्युसॅट नावाचा एक प्रोग्राम उपग्रह शिक्षण कार्यक्रम म्हणून इस्त्रोतर्फे हिंदुस्थानात वापरण्यास सुरूवात झाली आहे. जास्तीत जास्त शिक्षण संस्था डायरेक्ट टू होम (DTH TV) ब्रॉडकास्ट इंटरनेट व्हिडीओ कॉन्फरन्सिंग अशा पद्धतीने सर्वत्र राबविण्याची योजना आहे. हिंदुस्थानातील राज्य शासनानी आपापल्या विविध योजना कार्यक्रम, शैक्षणिक पातळीवर उद्याच्या सुविद्य नागरिकांना (विद्यार्थ्यांना) समजावून द्याव्यात ही या मागची संकल्पना आहे.

महाराष्ट्र शासनाने उपग्रह शिक्षणाचा हा कार्यक्रम कशासाठी वापरावा ? पाठ्यपुस्तकातील चुका व दिवसेंदिवस होत जाणारी शिक्षणाची परवड लक्षात घेता उपग्रहाद्वारे जर शाळा-शाळांतून दृक्‌श्राव्य पद्धतीचे हे उपग्रह माध्यम शिक्षण उपयोगात झाले तर अनेक समस्या सुटतील. अमेरिका, फ्रान्स, जपान, जर्मनी आदी राष्ट्रे इतिहास, शिक्षण, संशोधन, विज्ञान प्रसारणाच्या कामी उपग्रहाचा उपयोग करीत आहेत.

संस्कृती जतन पुरातत्त्वविज्ञान या क्षेत्रात उपग्रह शिक्षण सुविधेचा उपयोग महाराष्ट्राला पर्यटन क्षेत्रातली आपली घसरगुंडी थांबविण्यासाठी उपयोगात आणता येईल. महाराष्ट्राचा पर्यटन व्यवसाय ठप्प झाला आहे. केरळ, राजस्थान, तामीळनाडू यांची घोडदौड सुरू आहे. परदेशातील हिंदुस्थानी वकिलातींकडून वरील राज्यांतील पर्यटन स्थळांचेच प्रसिद्धीकरण होत असल्यास परदेशी पर्यटक बहुसंख्येने त्याच राज्यात जाणार व मुंबई विमानतळावर उतरूनही अजंठा-वेरूळ करणार नाहीत. जोपर्यंत महाराष्ट्राला यावर उतारा सापडत नाही तोवर महाराष्ट्राने दुसऱ्या पर्यायी योजनेचा शोध घेतला पाहिजे.

इस्त्रोची ही राज्यव्यापी योजना महाराष्ट्राने पर्यटनाच्या प्रसिद्धीसाठी करून घेणे व्यवहार्य ठरेल. आजच्या घडीला त्याची गरज आहे.

पुरातत्त्वाचे संशोधन उपग्रह विज्ञानाने कसे होईल ? काय उपयोग आहे त्याचा हिंदुस्थानला वा महाराष्ट्राला ?

उपग्रह अतिउंचावरून त्या-त्या भूप्रदेशांचे छायाचित्रण करीत असतो. कालिदासाने वा वाल्मिकीने वर्णन केलेले रामायणकालीन किंवा

चौथ्या शतकातील हिंदुस्थानचे भौगोलिक वर्णन कितपत खरे आहे हे उपग्रहाद्वारे जितके स्पष्ट होईल तेवढे विमानातून होणार नाही वा जमिनीवरून होणार नाही. पुरातत्त्वज्ञ भौगोलिक संदर्भाचा उपयोग करीत ऐतिहासिक सत्याचा शोध लावतात. इतिहासाने असे भूविशेष ठिकठिकाणी जतन केल्यामुळेच अनेक संस्कृतीचा शोध लागला. इजिप्तचे मनोरे जाग्यावर नसते तर खुफू हा सम्राट हिंदुस्थानच्या रामायण काळात होऊन गेला हे कळले नसते. खुफू व लंकेचा रावण हे एकमेकांना ओळखत होते. इजिप्त व लंका व्यापार सुरू होता. रावणाची ममी इजिप्तशियन पद्धतीने लंकेमध्ये अज्ञात गुहेत ठेवले गेली. इथंपर्यंतचे धागेदोरे मिळाले नसते. उद्या कदाचित उपग्रह संशोधन ती शोधून देईल.

महाराष्ट्राच्या पर्यटनाची कुठली ठळक वैशिष्ट्ये आपल्याला जगापुढे आणणे आवश्यक आहे. ती आपल्याला उपग्रह विज्ञानाद्वारे दाखवता येऊ शकतील ?

कार्ले (कार्ला) हे जगामधील एकमेव चैत्यगृह आता हिंदुस्थानजवळ व महाराष्ट्राजवळ उरले आहे की जिथल्या सागाच्या लाकडाच्या सर्व कमानी आज २००० वर्षांनंतरही बहुतांशी पूर्णस्वरूपात शिल्लक आहेत. तशी महाराष्ट्रात १००० लेणी व हिंदुस्थानात २०० लेणी आजही आहेत. परंतु कार्ले चैत्य पूर्णतया धड स्वरूपात दाखवता येईल. इतर ठिकाणी ते शक्य नाही.

म्हणजे महाराष्ट्र पर्यटनाला संजीवनी देणारे एक चैत्यविज्ञान हा मार्केटिंगचा हुकमी एक्का इस्रोच्या मदतीने जगभरातील सर्व स्टेशन्स, शाळा-कॉलेजेस, विज्ञान संस्था यांना दाखवून मुंबई विमानतळाकडे जास्तीत जास्त परदेशी पर्यटकांना खेचून घेता येईल. महाराष्ट्रातील इतर स्थळांकडे त्यांना वळविता येईल. शिक्षणाचे संदर्भ वापरून महाराष्ट्र पर्यटन खात्याने असा प्रयोग करून बघायला कसली आडकाठी आहे ?

***

भारतवर्षाचे विज्ञानपर्व

कापसाचे उत्पादन व उपयोग हिंदुस्थानात सर्वप्रथम इ. स. पू. ३००० वा त्याहून अधिक वर्षांपूर्वी झाला. हातमागावर कापड विणले जाई. त्या कापडाला विशिष्ट प्रकारे संस्कार करून त्याची प्रत (Quality) ठरवली जाई. हे आधुनिक तंत्र हिंदुस्थानी समाजाला इतक्या आधी कळले.

हिंदुस्थानातून कापूस इजिप्त व इतर देशात गेल्याला ५००० वर्षे झाली. कापसापासून कापडनिर्मिती करणारा सर्वात पहिला देश म्हणजे हिंदुस्थान. हडप्पा संस्कृतीत अशी कितीतरी उदाहरणे आहेत. ऋग्वेदात चांदीचा वापर होत असल्याचेही उल्लेख आहेत. कुणालनगर (इ. स. पू. ३८०० ग्रिफिथ) आजचे अंबाला शहर म्हणजे कुणालनगर. तांबे व चांदी जिथे जिथे मिळत गेली त्या ठिकाणी चांदी वितळवणाऱ्या भट्ट्या सापडत गेल्या. हडप्पा शहरातून चांदीचे नाजूक दागिने सापडले आहेत. दागिन्यांचे कोरीव काम सर्वप्रथम हिंदुस्थानात झाले. (इ. स. पू. ३७५०) इजिप्त, ग्रीस, पर्शिया या देशांकडे ही कला हिंदुस्थानातून निर्यात झाली. ही कलाही सरस्वतीच्या काठी निर्माण झाली. महाभारत काळात (३१०० BC- आता कदाचित हा काळ मागे जाऊ शकेल) सरस्वती नदीच्या उगमापासून अरबी समुद्रापर्यंत घोड्यावरून दौडत येण्यास ४२ दिवसांचा कालावधी लागे. त्याहीवेळी नद्यांच्या काठाने मार्गक्रमण होई. वाहतुकीसाठी घोडा हे वाहन १८०० कि. मी अंतर काढण्यासाठी वापरले जाई व तसे रस्ते त्यावेळी निर्माण झाले होते. परकीय लोक तेव्हाही हिंदुस्थानात व्यापारासाठी येत. त्यांना व त्यांच्या भाषेला म्लेंच्छ म्हटले जाई.

इ. स. पू. २००० च्या आसपास सतलज नदीने आपले पात्र बदलले व ती सिंधू नदीकडे अधिकाधिक वळत गेली व सरस्वती आक्रसत गेली. इ. स. पू. १९०० मध्ये सरस्वती नदी लुप्त झाली. पाणिनीचा काळ इ. स. पू. ६०० मानण्याचं आता कारण नाही. त्याने त्याकाळच्या हिंदुस्थानींचे पश्चिम व पूर्व हिंदुस्थानी अशी विभागणी केल्यामुळे याच काळात हिंदुस्थानवासीयांनी पश्चिमेकडून हिंदुस्थानात पूर्व वा उत्तर आणि दक्षिणेकडे अधिकाधिक स्थलांतरे केली असं पाणिनीने म्हटले आहे. म्हणजे तो इ. स. पू. २००० च्या सुमारास होऊन गेला. याच काळात गंगेच्या

दिशेने उत्तरपथ पुढे पुढे सरकला. उत्तरपथ हा पुष्कलावती (गांधार) ते ताम्रलिपी (हुगळी) प्रमुख राजमार्ग म्हणून ओळखला गेला व पुढे त्याची व्याप्ती बाल्ख शहर म्हणजे ४५० मैल दूरपर्यंत गेलेला रस्ता आहे. तत्कालीन ' भारतवर्षा 'चे हे विज्ञानपर्व अभिमानास्पदच आहे.

***

आर्यभूमीचे समाज शिक्षण

डॉ. भगवानसिंग सूर्यवंशी यांनी The Geography of Mahabharat या पुस्तकात या गोष्टीचा प्रकर्षाने उल्लेख केला आहे. The process of merging the identity of one's own, was enhanced by varions Aryan missionaries who left their homes and after crossing the unsurmountable impregnable mountains and forests went to spread the Aryan culture and enunciated the whole of India from Kashmir to Kanyakumari into one Secular Cultural Outlook.

आर्य संस्कृती ही एक पूर्वापार वृत्ती आर्यभूमीत जोपासली गेली. भारद्वाज, वसिष्ठ, गौतम, विश्वामित्र या ऋषींनी ज्ञानोपासनेची चळवळ त्यांच्या आश्रमव्यवस्थेतून इथे उभी केली. त्याची एक फार मोठी शिष्यपरंपरा निर्माण झाली. हीच परंपरा देश व परदेशात नेण्याचे कार्य त्यांच्या शिष्यांनी केले.

यावरून असं लक्षात येतं की, हिंदुस्थानात जनपदे म्हणून जी शासकीय राज्यव्यवस्था निर्माण झाली, त्यात शिक्षण अर्थ, राज्य प्रशासन, व्यापार, वाहतूक, शेती, व्यवसाय यांचे नियंत्रण व सुसूत्रीकरण जसं आपोआप होत गेलं तसं इतरत्र झाले नाही. ग्रीक ही पाश्चात्य जुनी संस्कृती. त्यांच्या इतिहासकारांनी इ. स. पू. २ च्या शतकापासून इ. स. पहिल्या शतकात हिंदुस्थानी जनपदे आपापसात भांडत आणि इथं अंदाधुंदी होती असे चुकीचे निष्कर्ष काढले. त्याआधी व नंतरही हिंदुस्थानात समाज आणि राज्यव्यवस्था यांच्या व्यवहारात एकवाक्यता होती असं आढळून आलं आहे. मग ग्रीकांनी असं चुकीचं का लिहिलं ?

ग्रीक इतिहासकारांना फक्त त्यांच्या छोट्या शहर समाजव्यवस्थेचा परिचय होता. ग्रीस हा मुळात एक छोटा देश होता. त्यांच्या शहर राजव्यवस्थेचा विस्तार हिंदुस्थानच्या जिल्ह्याच्या प्रमुख शहराएवढा होता. अथेन्स, स्पार्टा, थेबेस, कोरिंथ, मेगारा, अर्गोस आदी शहरप्रमुखात नेहमीच भांडणे, लढाया सुरू असत. हिंदुस्थानातील जनपदे (१६ + सुमारे १००) ही कुठल्याही ग्रीक प्रिन्सिपॅलिटीज् वा टीचभर व्यवस्थापनाहून कैकपटीने

मोठी व्यवस्थापने होती. आचार, विचार, सुव्यवस्था महसूल, शिक्षण, व्यापारउद्योग याबाबतीत प्राचीन हिंदुस्थानी जनपदाची अर्थ, शिक्षण व सामाजिक प्रगती पाहायला इथे कुठलेही ग्रीक इतिहासकार आले नव्हते. त्यांचे भाष्य हे त्यांच्या परंपरेवरून त्यांनी ठरवले. इतिहास असं सांगतो की, जगामध्ये जेव्हा कुठल्याही काळी स्वास्थ्य व आर्थिक सुबत्ता निर्माण झाली त्यावेळी कलांचा विकास होत गेला. अजिंठा लेणी आधी ५०० व नंतर ३०० अशी सुमारे ८०० वर्षांच्या काळात महाराष्ट्रात कोरली व नंतर चित्रित केली गेली. समाज प्रगत नसता तर इथे या दीर्घकाळ चाललेल्या छिन्नी खोदकामांचे व्यवस्थापन शक्य झाले असते काय ? त्याकाळी हजारो कारागीर अजिंठा परिसरात का राबले ? त्यांच्या अन्नपाण्याची, निवासाची सोय कुणी केली ? सातवाहन, वाकाटक, गुप्त, राष्ट्रकूट या वैदिक धर्मीय राजेशाह्यांनी बौद्ध पंथीयांची लेणी त्यांच्या राज्यात कशी खपवून घेतली? कलांना त्यांनी का उत्तेजन दिलं ? याचे उत्तर आमची प्राचीन, पण प्रगत समाजव्यवस्था हेच आहे. या समाजव्यवस्थेत सहृदयता अंतर्भूत असल्याने समाजाचा कुठलाही घटक काटेकोरपणे जपला गेला. त्याकाळी भाषा अनेक असतीलही. परंतु संस्कृत ही आर्य भाषाच हिंदुस्थानात शिक्षण, व्यापार, राजकारण या क्षेत्रात कायम राहिली. परदेशातही पोहोचली. हे या संस्कृतीचे वैशिष्ट्य. ग्रीक, मोगल व ब्रिटिशांना मान्य नसल्याने त्यांनी आमच्या शिक्षण, उद्योग, व्यापार यांचे खच्चीकरण केले. इथे असलेली सुबत्ता व स्थैर्य नाहीसे केले.

***

सरस्वती-सिंधू संस्कृतीची बोधचिन्हे

आर्य संस्कृतीची समाजव्यवस्था, प्रशासनाने उदारमतवादी धोरण ही एक बांधिलकी प्रत्येक राज्यव्यवस्थेने सरस्वतीच्या काळात (इ. स. पू. ५००० व आताच्या नव्या संशोधनानुसार इ. स. पू. ८००० ते १०,००० वर्षे) स्वीकारली. त्यामुळे शिक्षण आणि समाजक्षेत्रात कुठल्याही राज्य व्यवस्थापनाने ढवळाढवळ केली नाही. सामाजिक जीवनाचा तो एक मूलाधार झाला. हे कशावरून सिद्ध झाले ? असे होताना नगररचनेचे प्रशासन जनपद व्यवस्थापनाच्या आधी निदान ५००० वर्षे अस्तित्वात आले होते हे आज ठळकपणे पुढे आले आहे.

सरस्वती व सिंधू नद्यांच्या भूप्रदेशात (सुमारे ५००० कि. मी. पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण) ज्या २००० वसाहती मिळाल्या त्या प्रत्येक ठिकाणी ठराविक बोधचिन्हे वेळोवेळी सापडत गेली. काश्मीर ते कन्याकुमारी या प्रदेशाच्या सांस्कृतिक अभ्यासकांना नमस्कार, स्वस्तिक, चिन्ह, चौकोन, त्रिकोण, वर्तुळ, कुंकू, फणी यांचे हिंदुस्थानातले अस्तित्व कायम स्वरूपात कुठल्याही काळात आढळले आहे. केवळ नमस्काराचा विचार, स्वीकृती आणि परदेशगमन यात ७००० वर्षे लोटली आहेत. अम्बीतमे नदीतमे देवीतमे सरस्वती असे म्हणणारे मुनीजन दोन हाताचे पंजे म्हणजे हाताची पाच बोटे (दोन हातांची १०) एकत्र जुळवून पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पंचभूतांची पूजा करतात म्हणजेच आवाहन करतात ही वेदकालीन संकल्पना मनुष्यमात्राला जगाच्या व स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून देते. ती जाणीव जशी सांस्कृतिक आहे तशीच वैज्ञानिकही आहे.

आता जग आणि अंतराळात जाणता येणारी सूर्यमाला (अनेक सूर्यमाला) यांचे विश्वरूप हे शेवटी जीवसृष्टीच्या जन्माशीच येऊन स्थिरावले. मनुष्य वा जीवसृष्टीच्या जन्माआधीही ही विश्वसृष्टी अस्तित्वात होती. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही तत्त्वे एकत्र आली व सजीव प्राणिमात्राचा जन्म झाला असे वेद, भगवद्गीता आणि आजचे विज्ञान अशा सर्वांचे म्हणणे आहे. नमस्कार या बोधचिन्हामागे ही संकल्पना आहे.

जगातला आदी सुसंस्कृत मानव कोण ? राजा नहुष हे त्याचं उत्तर

आहे. त्याचं जे स्वरूप आपल्या समोर उभं होतं तेच एका वसाहतीत राहाणाऱ्या, शेत पिकविणाऱ्या, दूध व्यवसायात स्थिर झालेल्या गाईगुरांचे कळप घेऊन फिरविणाऱ्या मानवाचे आहे. त्याने गाव वसवलं. त्याच्या ३००० वर्षांत २००० वसाहती झाल्या. नद्यांच्या काठाने रस्ते बांधले गेले हे हिंदुस्थानी संस्कृतीचे आदी वैदिक दृश्यरूप टोपोग्राफी लॅण्डसॅट चित्रणाने व्यक्त झाले आहे.

ही अभिव्यक्ती खंबायतच्या आखातात अलीकडेच सापडलेल्या (द्वारकेहून जुन्या) दुसऱ्या रेखीव आणि आखीव शहराने (५ मैल x ५ मैल लांब रूंद) दाखवून दिली. कार्बन डेटिंग साइड सोनार या उपकरण पद्धतीने या शहराचे वय ९००० ते ९५०० येतं. इतक्या दीर्घ काळापूर्वीही भूमिती शास्त्राची सर्व परिमाणे (सरळ रेषा, वर्तुळाकार, चौकोन, त्रिकोण, लंबचौकोन तिथे तंतोतंत जुळली आहेत.) तशीच मापनात होती. गणितीची तीच पद्धत तेव्हाही अस्तित्वात असावी हे अतर्क्य असलं तरी खरं मानण्याची पाळी शास्त्रज्ञांवर आली आहे.

***

प्लॅनेटेरिअम सॉफ्टवेअर

अंतराळ संशोधनात काही सॉफ्टवेअर्स फार महत्त्वाची ठरली आहेत. महाभारत वा रामायण काळात (सुमारे ५००० वा पूर्वीचा काळ) अंतराळ ज्योतिषशास्त्र किती प्रगत झाले हे अशा १४० संदर्भाच्या नोंदी व संदर्भ सांगतात व त्यांची शहानिशा प्लॅनेटेरिअम सॉफ्टवेअरने जाणता येते. लोड स्टार हे असेच दुसरे प्रगत सॉफ्टवेअर आहे.

महाभारताच्या सभापर्वात एक, उद्योगपर्वात दुसरे व शल्यपर्वात तिसरे अशी तीन सूर्यग्रहणे झाल्याची नोंद नासाच्या शास्त्रज्ञांनी केली. २००० ते २००३ या काळात ते त्यांनी शास्त्रीय उपकरणांनी शोधण्याचे ठरविले आणि त्यांच्यासमोर अलिबाबाची गुहाच उघडली गेली. महाभारत हे केवळ काल्पनिक महाकाव्य नसून एक चालता-बोलता इतिहास आहे. त्यात वर्णन केलेल्या घटना खरोखर घडल्या होत्या. वापरली गेलेली संहारक अस्त्रे आजच्या अणुयुद्धासारखीच भयंकर होती याचा शोध लागला. प्लॅनेटेरिअम व लोड स्टार या दोन सॉफ्टवेअर्सचा वापर या कामी केला गेला. नासाच्या डॉ. एस्. बालकृष्णा व मेंफिस विश्वविद्यालयातील डॉ. नरहरी अशर यांनी एक सिद्धांत मांडला. त्यानुसार महाभारतादी कुठल्याही प्राचीन वाङ्मयातील घटनावर्णनं त्यावेळच्या ग्रहस्थितीवरून आजही कळू शकते. अंतराळ हा जमिनीसारखाच एक नकाशा आहे. त्यावेळी वर्णन केलेली नक्षत्रे, ग्रहणे, ग्रहस्थिती सॉफ्टवेअर्सचा वापर करून हजारो वर्षांनंतरही अचूक शोधता येते. ग्रहगोलाचे दिशा संदर्भ अंतर पूर्वीचे, आजचे व भविष्यातील घटनांचे निदान आज करता येते. त्यात पुढील घटना घडल्याचे वरील शास्त्रज्ञांनी सिद्ध केले. त्या अशा -

१) श्रीकृष्ण कौरव-पांडवांचे संभाव्य युद्ध टाळण्याच्या प्रयत्नात असताना कर्ण त्याला भेटला. त्यालाही संभाव्य युद्धाचे परिणाम गुरू कुळाचा उच्छेद होण्यात होईल हे कळले होते. श्रीकृष्ण, कर्ण, व्यास हे

खगोलतज्ज्ञ असल्याखेरीज त्यांनी सूर्य, चंद्र ग्रहणांची स्थिती कशी जाणली ?

२) महायुद्धाच्या १३ व्या दिवशी (शाल्यपर्व) संपूर्ण सूर्यग्रहण (३ रे) रणभूमीवर पडले. काळोख झाला. ही खरी ग्रहण घटना श्रीकृष्णाने आपल्या सुदर्शन चक्राने सूर्याला पूर्णपणे झाकून टाकल्याचा काव्यमय उल्लेख व्यासानी केला आहे. लोड स्टारमुळे हा काळ ठरविता आला.

या अनुषंगाने श्रीकृष्ण हस्तिनापूरला २९ सप्टेंबर रोजी इ. स. पू. ३०६७ मध्ये पोहोचला. २९ सप्टेंबर रोजी चंद्रग्रहण लागले. १४ ऑक्टोबर इ. स. पू. सूर्यग्रहण लागले. श्रीकृष्ण व कर्णाप्रमाणेच बलरामाने महायुद्ध टाळण्याचे प्रयत्न केले. परंतु ते सफल झाले नाहीत. निराश मनाने (१ नोव्हेंबर इ. स. पू. ३०६७) बलराम परिक्रमेला निघाला. महाभारताच्या युद्धाला २२ नोव्हेंबर इ. स. पू. ३०६७ रोजी सुरूवात झाली. भीष्माचा मृत्यू १७ जानेवारी इ. स. पू. ३०६६ (उत्तरायण) मध्ये झाला श्रीकृष्णाचा जन्म २१ जुलै इ. स. पू. ३२२८ मध्ये झाला. (डॉ. अरूणकु गार बन्सल) युद्धाच्या वेळी कृष्ण १६१ वर्षांचा तर कौरव पांडवांची वये १०० वा अधिक वर्षांची होती. दिन, महिने, वर्षांची अचूक मांडणी शास्त्रज्ञांना या सॉफ्टवेअरमुळे करता आली. २००३ रोजी बंगलोर येथे या विषयावर संमेलन झाले. त्यात वरील शास्त्रज्ञ व डॉ. के. एस्. राघवन व डॉ. एस्. कल्याणरामन (S.R.C.S.चिन्मई) आपले पेपर्स सादर केले होते. एक गंमतीचा प्रश्न असा पडतो - हिंदुस्थानी योद्ध्यांची वये १०० ते २०० च्या आसपास असण्याचा काळ ५००० वर्षांपूर्वी होऊन गेला. आज आम्ही ६० व्या वर्षी निवृत्त होतो. आम्ही काय हरवून बसलो आहोत - आमचं आयुष्य की बौद्धिक आणि शारीरिक क्षमता ?

***

सुजलाम् सुफलाम्

महाभारताचे युद्ध कधी झाले यावर शास्त्रज्ञांत एकवाक्यता नाही. कुणीही केलेल्या परीक्षणात १००० ते २००० वर्षांचा फरक पडतो. तितकाच फरक रामायण, महाभारत काळात आहे. रामायण आधी व नंतर महाभारत हे निश्चित झाले आहे. हा फरक असला तरी कुठल्याही परीक्षणातून हिंदुस्थानी संस्कृतीची जी वैशिष्ट्ये कळली आहेत ती महत्त्वाची आहेत. त्यानुसार ऋग्वेद व इतर वेद, पुराणे हा ऐतिहासिक घटनांचा एक संग्रह आहे. त्यातला काव्य विषय वेगळा आणि इतिहास वेगळा आहे. या काळात हिंदुस्थानीयांनी काश्मीर ते बिहार म्हणजे सिंधू ते सदानीरा (गंडक-बिहार) अशी स्थलांतरे केली. कुठल्याही काळात माणसांची स्थलांतरे राष्ट्रीय दुर्घटना वा सामाजिक सुरक्षितता यामुळे घडतात. दुर्घटनेचा हिंदुस्थानी संबंध इ. स. पू. १९०० मध्ये सरस्वतीच्या लुप्त होण्याशी आहे. तसाच सामाजिक सुरक्षितता, स्थैर्य याचाही संबंध सरस्वतीच्या सात हजार वर्षांच्या अस्तित्वाशी आहे. सरस्वतीच्या प्रकट होण्यामुळे हिंदुस्थानात परत सुबत्ता येईल असे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. ही सुबत्ता येण्यासाठी हिंदुस्थानातील प्रमुख नद्या जोडणारी ग्रीड सिस्टिम लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. त्यापैकी उत्तरांचल, हरयाणा, पंजाब, राजस्थान व गुजरात या राज्यांतून आवश्यक तिथे कालवे खणले गेले आहेत. बियास नदीवर धरण व वीज प्रकल्पाला पाकिस्तानच्या आडमुठेपणामुळे खीळ बसली होती. आता हा प्रश्न मिटल्याने अगोदरपासून तयार असलेल्या कालव्यातून पाणी वाहू लागेल. मात्र हे केंद्र शासनाच्या इच्छाशक्तीवर अवलंबून आहे.

सतलज नदीने चार हजार वर्षांपूर्वी सरस्वती नदीला गिळंकृत केले होते. तिचेच पाणी सरस्वतीच्या शुष्क कालव्यात सोडले जाणार आहे. पूर्वी ज्या स्रोतांमुळे सरस्वती नदी गंगेहून मोठी झाली ते स्रोत हिंदुस्थानच्या इतर नद्यांना कालव्यांद्वारे पाण्याचा पुरवठा करतील. हिंदुस्थानच्या हद्दीतून वाहणारे सरस्वतीचे मूळ स्रोत हिंदुस्थानी भूमीच सुजलाम् सुफलाम् करतील असे वरील तज्ज्ञ म्हणतात. पाकिस्तानचा या पाण्यावर वा कालवे जोडण्यावर कसलाही हक्क राहाणार नाही. २० कोटी लोकसंख्येला याचा आधी फायदा होईल. कालांतराने ब्रह्मपुत्रा व इतर पूरग्रस्त नद्यांच्या जादा

पाणीपुरवठ्याचा फायदा केरळ व तामीळनाडूपर्यंतच्या नद्यांनाही होईल. शास्त्रज्ञ म्हणतात, हिंदुस्थानसारखा चार हजार वर्षे जमिनीखाली दडून राहिलेला पाण्याचा साठा जगातल्या कुठल्याही राष्ट्राजवळ नाही. त्यामुळे इतरत्र पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले तरी हिंदुस्थानला चिंता करण्याची गरज नाही.

***

राम-रावण युद्धाचे आधुनिक संकलन

हिंदुस्थानात मध्यप्रदेश, महाराष्ट्र, आंध्र, ओरिसा राज्यांच्या सीमा प्रदेशात राहाणारे आदिवासी स्वत:ला रावणाचे वंशज समजतात. चार राज्यांच्या घनदाट जंगलात राहाणाऱ्यांना, आधुनिक साधनसुविधांचा स्पर्श झालेला नाही. परंतु आपण राक्षस वंशाचे आहोत याचा त्यांना अभिमान आहे. जंगलावर अवलंबून असलेले उद्योग, कंत्राटदार यांच्या संपर्कात असलेली राक्षस मंडळी चार पैसे कमावतातही. भीमबेटका, असुरगड या भागात एका दंतकथेनुसार रावणाने असुरगडच्या जंगलात सीतेचं अपहरण केले. लंका ते असुरगड या मुक्कामात रावणाने आपला पाठलाग होऊ नये व राम-लक्ष्मणाच्या हालचाली कळाव्यात म्हणून ठिकठिकाणी पाच-सहा राक्षस सैनिक उतरवले. परत जाताना सीतेचा आक्रोश ऐकून गरूडांचा राजा जटायूने रावणाचा पाठलाग करून त्याला गाठले. तुंबळ युद्ध झाले. जटायू मारला गेला व रावण सीतेसह लंकेकडे रवाना झाला. अनपढ, जंगलवासी अशा या लोकांना रामायणाचा इतिहास, घटनांचा तपशील सांगितला कुणी ? ते असुरगड म्हणतात, आम्ही नाशिकची पंचवटी हे अपहरण ठिकाण समजतो.

रावणाजवळ पुष्पक विमान होते. तशी शेकडो विमाने होती. परतीच्या प्रवासात प्रभू रामचंद्रांनी सुमारे २००० कि. मी. चा प्रवास २ टप्प्यात करून अयोध्या गाठली. त्याआधी पंपा ऊर्फ किष्किंधा शहराजवळ त्यांनी एक हॉल्ट घेतला व हे अंतर सहा तासात कापले.

डॉ. मधुसूदन चान्सरकर नागपूर विश्वविद्यालयातून उपकुलगुरू या पदावरून निवृत्त झाल्यावर ८० च्या दशकात जागतिक संघटनांचे अर्थ सल्लागार म्हणून श्रीलंकेत दोन वर्षे गेले. लंकेच्या प्रशासनाने त्यांना रावणावर संशोधन करण्याची परवानगी दिली. त्यावेळी राम-रावण युद्धाचे दहा नकाशेही त्यांना मिळाले.

राम-रावण युद्ध पारंपरिक शस्त्रास्त्रांनी झालेले नाही. श्रीलंकेच्या पुरातत्वाला अशा ४० ठिकाणांचा शोध नंतरच्या काळात लागला जिथे रावणाची सौर व अणुऊर्जेवर चालणारी याने, मिसाईल्स ज्या १० हवाई अड्ड्यांवरून उडत त्याचे गुप्त मार्ग, धावपट्ट्या, टेलिकम्युनिकेशन यंत्रणा,

भूमी-आकाश-समुद्र संदेशवहन राक्षस सैनिक, कानात बाळगता येणारे फोन यांचे आदानप्रदान अशा विविध साधनांनी युक्त राक्षस सैनिक सहजासहजी रामाला युद्धात हरणे शक्यच नव्हते. मारूतीनेही अनेकदा हवाई उड्डाणे करून मूर्च्छित लक्ष्मणासाठी संजीवनी आणली. ती टेकडी (त्रिकोणी) सर्व लंकेतील इतर टेकड्यांहून वेगळ्या प्रकारची आहे. त्यावर उगवणारी झाडे, वनस्पती लंकेत उगवणाऱ्या वनसंपदेहून वेगळी आहे. नायुनिया, करूणागल, माताळ, हनुमंतोला, गाल, मन्नार, नुवारा एलिया या रणभूमींवर घनघोर लढाया झाल्या. यापैकी काही ठिकाणी मिसाईल्स वा रासायनिक अस्त्रे वापरल्याने जळून खाक झालेले भूस्तर, टेकड्या, माती आजही प्रचंड प्रमाणात आढळते. जिथे काही पिकत नाही वा किरणोत्सर्ग झाल्याचे आढळते. मन्नार, पाम बे, पाल्कची सामुद्रधुनी हे विभाग समुद्राच्या तळाशी बुडालेल्या राम-रावण युद्धातील नौका अण्वस्त्रे म्हणून श्रीलंकेच्या दृष्टीने खास तळसंशोधानाचे म्हणून सुरक्षित आहेत. या संशोधनात श्रीलंकेने नासाची मदत घेतली आहे.

डॉ. मधुसूदन चान्सरकरांनी केलेल्या संशोधनाची जपानने दखल घेतली. श्रीलंका व नासालाही राम-रावण युद्धाचे वैज्ञानिक स्वरूप जाणण्यात एक निश्चित दिशा मिळाली.

हिंदुस्थानने खरं तर नासा व श्रीलंकेच्या संयुक्त संशोधनात सहभागी होऊन डॉ. चान्सरकरांनी केलेल्या संशोधनाचे चीज करावे. आज अनेक सॉफ्टवेअर्स आलेली आहेत. उपग्रहावरून समुद्राच्या कितीही छोट्या वस्तू, ठिकाणाचे स्पष्ट चित्रण करता येते. गोव्याच्या समुद्रतळ संशोधनाच्या कुशल पाणबुड्यांचा उपयोग करता येतो. इस्रोचा उपयोग करून आम्ही रामायणाचे योग्य विश्लेषण, पुनरूत्थान करू शकतो.

***

प्राचीन भूगोलतज्ज्ञ सौती

रामायण वा महाभारत अशी कुठलीही महाकाव्ये एका व्यक्तीने लिहिलेली नाहीत असा एक विचारप्रवाह आहे. विशेषत: रामायणानंतर (इ. स. पू. ५००० ते ७०००) महाभारत १००० ते १२०० वर्षांनी लिहिले गेले. महाभारतात शेवटची भर सौतीने घातली. सौती हा एक भूगोलतज्ज्ञ होता. महाभारत हा इतिहास आहे व त्याच्या खाणाखुणा भूगोलाने जाणून घेता येतात अशी त्याची श्रद्धा असल्याने त्याने ती ती स्थळे भूपटावर कुठे होती याचा बहुधा बारकाईने अभ्यास केला असावा. त्याने अभ्यास केलेल्या ठिकाणांची नावे आज तीच असतील किंवा बदलली असतील. परंतु स्थळकाळ वर्णन याविषयीचे त्यांचे आराखडे आजही बरोबर ठरले आहेत.

भूगोलाच्या सहाय्याने आपला इतिहास, परंपरा, स्थळकाळ वैशिष्ट्ये, ऋतुचक्रे, हवामानाचे, ग्रहस्थितीचे प्राचीन उल्लेख यांची अचूकता जाणता येते हे तत्त्व आता जगात सर्वमान्य झाले आहे.

सौतीने हे त्याकाळी जाणले होते. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचमहाभूते म्हणजे पाच विज्ञान सत्ये हे विश्व घडविण्यास कारणीभूत झाली असं संजयने धृतराष्ट्राला महाभारतात सांगितले आहे. पाच हजार वर्षांपूर्वीची आमची विज्ञान परंपरा किती उज्वल आहे हे यावरून लक्षात येईल. महाभारताला सात खंडांचा परिचय झाला होता.

महाभारतात चेदी, मत्स्य, वाराणसी, कलिंग, वल्हिक, पंचनद, मुद्र (मद्र), अयोध्या प्रतिष्ठान, रोहटका, मरूभूमी अहिच्छत्र, सिंधू, सुवीर (सौवीर), मगध, पहलव, कांबोज, रिशिक, किराट, केरळ, प्राग्जोतिषपूर, शूर्पारक, उत्कल, श्रावस्ती, कर्नाटक, कोकण, अपरांत ही गणराज्ये वा जनपदे व आणखीही कित्येक जनपदे आपले सामाजिक जीवन शांततेने व्यतीत करीत होती. त्यांची स्थाने प्राचीन कालानुसार आज निश्चित झाली आहेत. जागेअभावी सर्व नावे देता येत नाहीत. रामायणात आर्य गोदावरी ओलांडून दक्षिणेकडे गेले. क्रौंचारण्य हे दक्षिणेकडील अरण्य पार करून ते कन्याकुमारीपर्यंत जाऊन पोहोचले. भुवनकोश पुराण, तीर्थयात्रापर्व इत्यादींतून आर्यांच्या दक्षिणेकडील वाटचालीचे चित्र उभे राहाते.

विष्णुपुराणात (२, ३, १) भारतवर्षाची (उत्तर-दक्षिण) आर्यांच्या वाटचालीची रूपरेषा कळते.

***

काळाआड गेलेली आश्चर्ये

सिंध हा प्रदेश हिंदुस्थानातील राजस्थानप्रमाणेच थरच्या वाळवंटाचा एक भाग आहे. पूर्वेला अरवली पर्वत. पश्चिमेला सिंध नदीपर्यंत ८०५ कि. मी. दक्षिणेला कच्छच्या रणापासून परत ८०० कि. मी. असा थर वाळवंटाचा विस्तार २,६०,००० चौ. कि. मी. होतो. (भूगोल कोश - एल. के. कुलकर्णी)

कोणे एकेकाळी सिंध हा एक हिरवागार सुपीक प्रदेश होता. तो रामायणाचा काळ वा त्याही अगोदरचा वैदिक काळ असावा. सिंधू व सरस्वती या नद्या सुमारे ५००० वर्षांच्या सलग काळात एकत्रित वा विभागून काश्मीर, पंजाब व सिंध या विस्तृत प्रदेशातून वाहात असतानाच्या काळात वरील क्षेत्रात मोहेंजोदडो, बणावली, रूपार, हरप्पा, कालिबंगा अशा स्वरूपात सुमारे २००० वसाहती वा शहरे या क्षेत्रफळात स्थिर झाली. इ. स. पू. १९०० मध्ये सरस्वती नदी राजस्थानमध्ये नाहीशी झाली. त्यानंतरच्या काळात एकेकाळच्या हिरव्यागार प्रदेशाचे वाळवंटात रूपांतर होत गेले असे बीएआरसी, इस्रो, नासा, राजस्थान वॉटर बोर्ड व जिओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया यांनी स्वतंत्र वा संयुक्त परीक्षणातून सिद्ध केले आहे.

ही भौगोलिक व अंतराळ निरीक्षणे इतिहासाच्या नोंदीच्या संकलनासाठी विचारात घेतल्यावर वैदिक काळ हा कसा राजकीय व सामाजिक उत्थापनाचा व दीर्घ सुस्थितीचा काळ होता हे कळते. राम-रावण व कौरव-पांडव हे व इतर लहान सहान युद्धप्रसंग आले तरी दृढ झालेली समाज व्यवस्था व शिक्षण पद्धतीत बदल झाले नाहीत. बदल झाले ते पश्चिमेकडून पूर्वेकडे जी लोकांची स्थलांतरे होत गेली त्या अनुषंगाने आर्य-वैदिक वा हिंदुस्थानी संस्कृतीचे प्रसरण झाले. भौगोलिकदृष्ट्या आर्यांनी अफगाणिस्तान ते गंडक (वा सदानीरा) बिहार एवढ्या विशाल क्षेत्रात सुमारे ५००० ते ६००० वर्षे इतका दीर्घ काळ हिंदुस्थानी समाज शिक्षण, शेती, संशोधनात अग्रेसर राहिला असेच वरील परीक्षणे सांगतात. या सुस्थितीचा अंत एकदम एकाच टप्प्यात झाला नाही.

सिंधचे सुपीक स्वरूप महाभारताच्या मध्यापर्यंत टिकून असावे. याचं कारण आपल्याला महाभारतातील दुर्योधनाची बहीण व सिंधचा राजा

जयद्रथ याचा विवाह सांगतो. कौरव-पांडवांचे कुरूकुल हे त्या काळच्या समाज व राजकीय परंपरेत आर्यावर्तातले सुसंपन्न सर्वमान्य, उच्च कुल समजले जाई. त्याच्याशी सोयरीक व्हावी अशीच इतर राजकुले विचार करीत. कैकेयी ही दशरथाची पत्नी जन्माने हिंदुस्थानी नव्हती. ती इराणी वा पर्शियन (भौगोलिक अर्थाने, धार्मिक नव्हे) होती. महाभारतातली गांधारी ही भौगोलिक अर्थाने अफगाण होती.

सर्व वैज्ञानिक परीक्षणे असं दाखवितात की वैदिक काळात आर्य समाज काश्मीर, अफगाणिस्तान मार्गे इराण व युरोपात स्थायिक झाला. तोपर्यंत संस्कृत ही एकच भाषा आर्यांच्या स्थलंतराबरोबर जगभरात त्यात रशिया, अलास्का, कॅनडा, यूएसए, मेक्सिको, पेरू अशी पसरली वा लिहिली जात असावी. त्यामुळे जगाच्या सर्व भाषांत संस्कृत शब्द आहेत वा त्यावरून निर्माण झालेले शब्द व लिप्या आहेत. तामीळ ही एक दक्षिण भारतीय भाषा घेतली तरी त्यात ५००० संस्कृतोद्भव शब्द आहेत. संस्कृत भाषेचा उगम, ब्राह्मी व नंतर देवनागरी या दोन लिप्यांवरून जगातील सर्व देशांच्या लिप्या निर्माण होत गेल्या.

***

रामराज्यातील प्रशासन

प्रभू श्रीरामाच्या कोशल राज्याची व्याप्ती शरयू-राप्ती नदीच्या दोआब (दोन नद्यांमधील प्रदेश) प्रदेशापुरती प्रामुख्याने मर्यादित होती. त्याचा विस्तार गोमती-गंगा-शरयू व काशी असा झाला. दशरथाच्या काळात या सूर्यवंशीय घराण्याची अयोध्या ही राजधानी होती. श्रीरामचंद्राने राज्याच्या विस्तृत सीमा लक्षात घेऊन प्रशासनाला सोपे जावे म्हणून साकेत व श्रावस्ती या दोन नव्या राजधान्या वसविल्या. वाल्मीकी रामायणातले श्रावस्ती शहर गोंडा (उत्तर प्रदेश) जिल्ह्यात साहेत-माहेत या जोडगावांजवळ सापडले आहे. डॉ. चित्राव शास्त्रींनी रामराज्याच्या भौगोलिक सीमा पूर्वी निश्चित केल्या होत्या तशीच ही व्याप्ती आहे.

ब्रिटिशांनी प्रशासनाच्या सोयीनुसार प्रादेशिक विभागणी कशी केली हे गौरवाने सांगितले जाते. ही व्यवस्था प्रभू रामचंद्रांनी प्रचारात आणलेली आहे हे आम्हाला ठाऊकही नाही. त्यानुसार उत्तर कोसल, दक्षिण कोसल (शरयू नदी या राज्यांना तेव्हा विभागात असे) रामाचा मोठा मुलगा कुश दक्षिण कोशलचा प्रशासक तर लव हा त्याहून लहान मुलगा उत्तर कोशलचा प्रशासक झाला. कोशल महाजनपदात शाक्य जनपद (तराई) सामील झाल्यानंतर रामराज्याच्या सीमा हिमालयाच्या पायथ्यापर्यंत गेल्या (पश्चिमेला राप्ती व पूर्वेला रोहिणी नदी). लक्ष्मणाचा मुलगा चंद्रकेतू याने राप्ती व सदानीरा नद्यांच्या मधला प्रदेश काबीज करून रामराज्याची सीमा आणखी वाढवली. आजचे गोरखपूर व सारन जिल्हा या प्रदेशात येतात.

बृहत संहितेनुसार रामराज्याचा प्रादेशिक नकाशा कासवाच्या आकाराचा आहे.

***

भगवद्‌गीतेचा विज्ञानबोध

भगवद्‌गीता ज्याला त्याला आपापल्या पद्धतीने जाणून घेता येते. एखाद्या सनातन्याला त्यात सनातन धर्म दिसेल. वैदिकाला त्यात वेदविद्या सापडतील. क्षत्रियाला त्यात निर्बलांचे रक्षण करण्यासाठी शस्त्र धारण करण्याचा सल्ला मिळेल. योगाभ्यासकाला योगसिद्धीचे ज्ञान होईल. सर्वसामान्य पारमार्थिकाला त्यात आपापले कर्म कसे करावे याचा बोध होईल.

यापलीकडे भगवद्‌गीतेचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न सध्याचे शास्त्रज्ञ का करीत आहेत ? काय आहे एवढं गीतेत ज्यामुळे इस्रो, नासासारख्या विज्ञान संस्थांचे लक्ष भगवद्‌गीतेकडे जावे !

डॉ. नरहरी अशर (मेंफिस विश्वविद्यालय) यांनी भगवद्‌गीतेचा विचार वैज्ञानिक दृष्टीने केला. का ? ते म्हणतात, ' भगवद्‌गीता आपल्याला अंतराळ, भूमी, सागर, अग्नी, हवा या पाच मूलभूत तत्त्वांचा शोध घेण्याला प्रवृत्त करते. ही तत्त्वे (Elements) पृथ्वीच काय जगाच्या जन्माआधीही होती, नंतरही राहाणार आहेत. '

भगवद्‌गीता विज्ञानाची कोणती दालने उलगडते तुम्ही ठरवू शकता. कसं ?

अन्नादभवन्ति भूतानी पर्जन्यादन्नसंभव: ।
यज्ञातभंवति पर्जन्यो यज्ञ: कर्मसमुद्रभव:
(अध्याय ३-१४)

जगातले यच्चयावत प्राणीमात्र ज्या अन्नावर जगतात ती अन्नधान्ये पावसापासून उत्पन्न होतात. पाऊस यज्ञापासून उत्पन्न होतो. पावसावर नियंत्रण असते सूर्याचे (अग्निदेवता) व त्या अनुषंगाने कर्मे करावी लागतात. त्याचा परिपाक म्हणजे जीवन आहे व हे एक कालचक्र आहे. हे कालचक्र अव्याहत चालू आहे. कितीकाळ चालू राहाणार आहे हे आपण जाणून घेतले पाहिजे. हा एक विज्ञानाचा दृष्टिकोन आहे. पावसावर सूर्याचे नियंत्रण असते ते कसं ? नदी, नाले, सागर वा जलाशय यातल्या पाण्याचे बाष्पीभवन सूर्याच्या उष्णतेमुळे होते. जे हजारो वर्षे सुरू आहे. पंचभूते-पंचमहाभूते म्हणून जीवन निर्मितीच्या ज्या प्रक्रिया घडत आल्या त्या

मनुष्यजन्माआधीपासून घडत आल्या. ही ‘ सायकल ’ वेदकाळात हिंदुस्थानींना ठाऊक होती. पाण्याचे कण आकाशात ढगरूपाने वास्तव्य करतात व डोंगर सान्निध्यात (पृथ्वी) आल्याने पाऊस पडतो. श्रीकृष्ण (इ. स. पू. ७००० ते ५००० वर्षे) निश्चितपणे एक हवामान व भूगोलतज्ज्ञ होता असे वरील श्लोकावरून दिसते.

महाभारत वा त्या आधीच्या रामायणकाळी चातुर्वर्ण्य-ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य शूद्र वर्णव्यवस्था अस्तित्वात होती असं भगवद्गीतेने सांगितले आहे. समाजजीवन व त्याचा अभ्यास Socialogy हे शास्त्र समजावून सांगते.

चातुर्वर्ण्य मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।
तस्य कर्तारमपि माम् विद्यकर्तारमन्यम् ।।
(अध्याय ४-१३)

हिमयुगाचा अंत झाला (सुमारे ११००० वर्षांपूर्वी) व जल स्वरूपात सरस्वती नदी हिमालयातून प्रभासपट्टन (सोमनाथ-गुजरात) क्षेत्रापर्यंत पोहोचली तोपर्यंत सागर निर्मितीचे कार्य सुरू होऊन पूर्णत्वाला पोहोचले होते. म्हणजे एका बाजूने निसर्ग सृष्टी निर्माण करीत होता व दुसऱ्या बाजूने समाजजीवनही आकाराला येत होते. समाज घडणे ही प्रक्रिया अनेक शास्त्रीय कल्पना प्रचारात आणण्याचे कार्य करीत होती. या जडणघडणीत सृष्टी जाणणारा, तिचे पालनपोषण व जिवांचे रक्षण करणारा त्यांना जीवनोपयोगी वस्तू प्राप्त करून देणारा व प्रक्रियांचे सेवा सेवक म्हणून समाजाला रूजू करून देणारा असे चार व (वर्ण) निर्माण झाल्याचे भगवद्गीतेत ७००० वर्षांपूर्वी म्हटले आहे.

***

द्रोणपर्वाचे गूढ

दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती अमेरिकेने हिरोशिमा आणि नागासाकी या जपानी शहरांवर अणुबॉम्ब टाकल्यावर झाली. आधुनिक शास्त्रज्ञ आता अशा निर्णयावर आले आहेत की महाभारतातले द्रोणपर्व हे द्रोणाने अशीच विनाशी शस्त्रे वापरल्याचा एक सुस्पष्ट पुरावा आहे. हडप्पा आणि मोहेंजोदारो येथे रस्त्याचे उत्खनन चालू असता शेकडो मानवी सांगाडे मिळत गेले. त्यांचे वैज्ञानिक विश्लेषण करताना सर्वांचा मृत्यू एकाच वेळी झाल्याचे दिसत आहे. सर्व सांगाडे सुस्थितीत होते. त्यांच्यात युद्ध झाल्याचेही दिसत नव्हते. त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले नव्हते. सर्व सांगाड्यांना किरणोत्सर्ग झाला होता व त्याच प्रकारची स्थिती गंगा व राजमहल पर्वतखोऱ्यात मिळालेल्या पुरातन शहरात आढळली होती. त्याचे उत्खनन रशियन शास्त्रज्ञ करीत होते. दोन्ही लांबच्या प्रदेशातली शहरे आहेत. इतक्या विस्तृत प्रदेशात माणसे क्षणार्धात का मृत व्हावीत ? कार्बन डेटिंगनुसार इ. स. पू. २५०० वर्षी ही माणसे मृत झाली.

जोधपूरपासून १० मैल पश्चिमेला ३ मैल क्षेत्रफळात एक नागरिक वसाहत बांधली जात होती. त्या पट्ट्यातील वैद्यकीय पाहणीत असं आढळून आलं की, बहुसंख्य बालके जन्मजात पंगू आहेत व बहुसंख्य माणसांना कॅन्सर होतो व त्यात त्यांचा अंत होतो. याचं एक महत्त्वाचं कारण हा विभाग किरणोत्सर्गी बनला आहे. या पट्ट्यात वाळूत राखेचे प्रमाण प्रचंड होतं. इथं राख कुठून आली ? कधी आली ? सुमारे ८००० ते १२००० वर्षांपूर्वी हा प्रदेश एक ना अनेक स्फोट व आघाताने जळला गेला. त्यात तिथल्या पूर्वप्राचीन शहरातल्या इमारती जळून खाक झाल्या व माती किरणोत्सर्गी बनली. परिणामी नव्याने एक नागरी वसाहत उभारण्याचा प्रकल्प सोडून द्यावा लागला. महाभारताच्या द्रोण पर्वात अशा उत्पाताचे स्पष्ट उल्लेख आहेत. किसारी मोहन गांगुली हे अमेरिकन संशोधक आता असं म्हणतात की, असा किरणोत्सर्ग फक्त अणुयुद्ध झालं असेल तरच होऊ शकतो. ८००० ते १२००० वर्षांपूर्वी झालेला विनाश जर अणुयुद्धाने झाला असेल तर महाभारताचे युद्ध हे अणुयुद्ध होते यावर जास्त संशोधन होणे गरजेचे आहे. शास्त्रज्ञ तर आता म्हणतात, अशी अनेक अणुयुद्धे

५०००० वर्षांत झाली असावीत.

राम-रावण युद्धाचा काळ महाभारताआधी १००० ते १५०० वर्षे धरला जातो. असेच जळलेले प्रदेश श्रीलंकेत आढळले आहेत. रावणाला त्याचे आजोबा पुलस्त्य (पुलस्नी) ऋषींनी २४ विद्या (विज्ञाने) शिकविल्या. त्यात विमान, अणु व सौर विज्ञान, संदेशवहन या महत्त्वाच्या विद्या रावणाने लवकर आत्मसात केल्याने तो इंद्राला व दशरथाला डोईजड झाला. यातला पौराणिक भाग सोडला तरी त्या विद्याची प्रचिती रामायणात स्पष्ट केली आहे. राम-रावणात झालेल्या युद्धात क्षेपणास्त्र वापरली गेली. सौरशक्तीचा वापर झाला. राक्षस सैनिकांनी संदेशवहन यंत्रणेचा उपयोग केला गेला, हे खरं असावं असं गृहीत धरून पुढील संशोधनाच्या कक्षा आता वाढविण्यात आल्या आहेत.

***

वैदिक संस्कृतीची परंपरा

हिंदुस्थानात वैदिक संस्कृतीच्या काळात भूमिती आणि बीजगणित यांचा विकास झाला. इतकेच नव्हे तर व्यापाऱ्यांकरवी ही शास्त्रे मध्य आशिया, इजिप्त व युरोपात गेली. असे मॅके व राजाराम यांचे म्हणणे आहे. याचा पुरावा मॅकेला इ. स. पू. २५०० हरप्पा व मोहेंजोदडोला मिळाला. धोलावीरा येथेही डॉ. राजारामना पूर्ण गोलाकार रचना विहिरी, इमारती आढळल्या व ज्या उपकरणाच्या मदतीने असे भूमिती आकार मिळविलेली ती उपकरणेही सापडली. धोलावीरा येथे मिळालेल्या अशा गोलाकार चकतीवर ठराविक अंतराने खाचा पाडल्या आहेत. डॉ. राजाराम यांनी इजिप्त व इतरत्र झालेल्या परीक्षणात बोधायन व कल्पसूत्रांचा काळ इ. स. पू. २७०० वर्षे असा ठरविला आहे. या सूत्रांतून भूमितीचा उपयोग, इतिहास यावर भाष्य केले आहे. हिंदुस्थानींनी इमारतीचे आराखडे अगोदर ठरवून त्या अनुषंगाने त्यांच्या रचना निश्चित केल्या. मोहेंजोदडो व लोथल याच्या पोहण्याचा तलाव व बंदर गोदीची बांधणी कुठल्या तरी आराखड्याने केली. तो आराखडा भले जमिनी भिंतीवर आधी योजून त्यांचा मोठा आकार परिमाणाने मिळविल्याचे स्पष्ट झाले आहे. हिंदुस्थानी संस्कृतीच्या अस्तित्वात विज्ञानच प्रामुख्याने आढळते. ज्याची परंपराच ५००० ते ८००० वर्षांची आहे. आम्ही आमच्या विपुल प्राचीन साहित्यातील विज्ञान शोधत गेलो तर चौकोन, त्रिकोण, वर्तुळ, अर्धवर्तुळ, पायथागोरस, अंक, शून्य, बीजगणित, लहान-मोठी परिमाणे, उपयोग याबद्दलचे भाष्य मिळते जे आजच्या शास्त्रांनी कुठेना कुठे उपयोगात आणले आहे. ते शोधून काढायचं तर क्लिष्ट सूत्रे आहेत जी काव्यमय असल्याने अधिकच दुर्बोध झाली आहेत. आताचे शास्त्रज्ञ म्हणतात हे सर्व खरं असलं तरी आम्ही त्यांचा छडा लावल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.

***

रामसेतू व लोणार

रामसेतूचा प्रश्न अस्तित्वात आहे की नाही ? घटन आणि विघटनवाद्यांच्या कार्यक्रम पत्रिकांवर, सभासंमेलनात आता कुणी त्यावर बोलत का नाही ?

रामायणाचे केवळ दोनच दृश्य स्वरूपातले ऐतिहासिक पुरावे रामायणकालीन संस्कृतीचे म्हणून सिद्ध झाल्याचे आपण म्हणू शकतो. हे सिद्ध का झालं ? कुणी केलं ? इस्रो, नासाचे अंतराळ संशोधन अहवाल म्हणतात - रामसेतू मानवनिर्मित आहे. वैज्ञानिकदृष्ट्या हे कसं सिद्ध झालंय यावर मी अगोदरही लिहिले आहे. लोणार हे बुलढाणा जिल्ह्यातले अशनीपाताने घडवलेले जलविवर हाही रामायणकालीन इतिहासाचा साक्षीदार आहे. या दोन्ही स्मृती विशेषांची सरकारी, निमसरकारी खासगी इतिहासप्रेमी म्हणविणाऱ्या संस्था, संघटना यांच्याकडून अक्षम्य हेळसांड होताना आज आम्ही अनुभवत आहोत.

लोणार व रामसेतूच्या पर्यावरण क्षेत्राचा अभ्यास, संवर्धन व विकास याचे अहवाल नासा, इस्रो, बीएआरसी, निऑट, जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया यांनी दिलेले आहेत. चित्रफिती काढल्या गेल्या आहेत. गल्फ ऑफ मन्नार मरीन बायोस्फीअर रिझर्व्ह या प्रकल्पानुसार मन्नारचे जलक्षेत्र दक्षिणपूर्व आशियात सर्वात मोठे क्षेत्र समजले जाते. पाण्यातील, तळाखालील, किनाऱ्यावरील जीव व वनस्पती, प्रजनन, इकोसिस्टिम, प्रवाळ प्रक्रिया, यात आढळून येणारे वैविध्य यांचा थेट संबंध रामायणकाळाशी जातो. वैज्ञानिकदृष्ट्या रामायण काळाचे वय ७३०० वर्षांहून कितीही मागे जाऊ शकते. महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, या सर्व संस्थांच्या संशोधनाचे अहवाल केंद्र व राज्य सरकार यांच्याकडे असतीलच. १०,५०० स्क्वे. कि. मी. क्षेत्रफळातल्या शेकडो वनस्पतीपैकी व जीवसृष्टीपैकी ११ जाती केवळ रामायणकालीन गवताच्या तर १४७ जाती जलचर प्राण्यांच्या व इतर वनस्पती रामायणकाळात अस्तित्वात असल्याचे आढळले आहे. ४५० मत्स्य जाती, ७९ शिंपल्यातल्या जीवसृष्टीच्या व इतर ४६० विविध जीवसृष्टीच्या आढळल्या आहेत. जीवसृष्टीचा थेट संबंध रामायण काळाशी जुळतो हा फार मोठा पुरावा ३६०० विविध जीव

वनस्पतींच्या बाबतीत संशोधनाने सिद्ध झालेला आहे.

रामसेतू वा लोणारकडे दुर्लक्ष व त्याचा सतत होत जाणारा विनाश आमच्या राज्यकर्त्यांच्या, संस्थांच्या, विश्वविद्यालयांच्या, उद्योगांच्या, विविध पक्ष, वृत्तपत्रांच्या एकतर नजरेला आला नाही किंवा हेतूपूर्वक त्याकडे दुर्लक्ष झाले आहे.

हिंदुस्थान व केंद्र सरकारने या क्षेत्राच्या विकासावर लक्ष केंद्रित केले तर लाखो लोकांना रोजगार उपलब्ध होतील. यावरचे विविध तांत्रिकी संस्थांनी दिलेले अहवाल केंद्र व राज्य शासनाकडे धूळ खात पडले आहेत.

***

राजबंदी सीता व पेटलेली लंका

रावण हा लंकेचा राष्ट्रपुरूष. जसा राम आपला. आम्ही रावणाला दैत्य, सीताहरण करणारा, १० तोंडी राक्षस म्हणून ओळखतो. आपल्याकडील तथाकथित विद्वान पुरोगामी बुद्धिवादी मंडळी रामायण, राम-रावण युद्ध एक ' दंतकथा ' समजतात. श्रीलंकेचे पुरातत्व खाते मात्र म्हणते रामायण खरे आहे. ते राम व सीतेचा द्वेष करीत नाहीत. रावणाचा पराभव करून राम त्याचे पुष्पक विमान घेऊन अयोध्येला गेला. ' नासा ' व ' इस्रो ' म्हणतात, रामसेतू हे मानवनिर्मित आश्चर्य आहे. विज्ञानाने राम-रावण युद्धाचे भौगोलिक व ऐतिहासिक संदर्भ खरे ठरविले आहेत. सीतेचा महाल व सीता तलाव हे दोन स्मृतिसंदर्भ खरे आहेत. रावणाने सीतेला अशोकवनात ठेवली परंतु सीतेला कुठलाही त्रास कुणाही राक्षसाला देण्याची मनाई केली. त्रिजटा या राक्षस स्त्रीला तिच्यासमवेत ठेवले व वरील ठिकाणी सीता तलावात रावणाचा मुळातला राजवाडा होता तिथे तिची राहाण्याची व्यवस्था झाली. रावणवधानंतर सीतेने आपल्या पावित्र्याची आणि पातिव्रत्याची खात्री रामाला दिली ते मलगवट्टन हे ठिकाण व ते प्रचंड वटवृक्षाचे झाड आजही आहे. त्या भागातील सर्व लोक आपला न्यायनिवाडा कोर्टात न जाता सीतेच्या पवित्र स्मृतीला वंदन करून करतात. हजारो वर्षांची ही परंपरा आहे. न्यूरेलिया हे गाव अशोक वनाचे ठिकाण आहे. सीतावास्तव्याच्या अनेक जागांपैकी एक. रावणाचे अनेक रत्नजडित राजवाडे त्यांच्या अस्तित्वाने आजही या विभागाची शान वाढवितात. न्यूरेलियाजवळ एक संपूर्णतया जळालेला प्रदेश लंकादहनाच्या स्मृती आजही जागवतो. लंकादहनानंतर मारूतीने आपले राक्षसांनी पेटवलेले शेपूट जवळच्या समुद्रात बुडवून विझवले. (डॉ. बद्रीनारायण, डॉ. पी. के. बॅनर्जी) हनुमानाने द्रोणागिरी पर्वत उचलून आणला ते ठिकाण लंकेत इतरत्र कुठेही न आढळणाऱ्या वनस्पतींबद्दल आजही प्रसिद्ध आहे. कॅण्डी टेकड्यांच्या प्रदेशात एखाद्या शिखरासारखे ते समुद्रात निमुळते होत गेले आहे. लंकेतले डॉ. सेलोटे हे आयुर्वेदाचार्य म्हणतात, इथल्या वनस्पती हिमालयातल्या वनस्पतींशी साधर्म्य असलेल्या परंतु लंकेत कुठेही न उगवणाऱ्या आहेत. मग त्या राम-रावण व लक्ष्मणाचे युद्ध जेथे झाले त्या

वास्तू विशेषांचे संदर्भ व आजच्या भौगोलिक परीक्षणांचे अहवाल यातले साधर्म्य थक्क करणारे आहे.

***

पुनश्च रामसेतू

रामसेतूच्या विषयावरून २६ फेब्रुवारी १३ रोजी राज्यसभेत भाजपसह सर्व विरोधी पक्षांनी सत्ताधारी यूपीएला चांगलेच धारेवर धरले. परिणामी सभागृहाचे कामकाज काही वेळ बंद पडले व तहकूब करावे लागले.

रामसेतूमुळे ७००० ते ९००० वर्षांपूर्वीचे हिंदुस्थानी विज्ञान प्रकट झाल्याचे अहवाल ' इस्रो 'चे माजी संचालक माधवन, भूगर्भ खात्याचे माजी संचालक बद्रिनारायण, कोरलतज्ज्ञ डॉ. पी. के. बॅनर्जी यांनी २००४ साली केंद्र शासनाला दिले. संसद सदस्यांनी हे अभ्यासून हा प्रश्न नव्याने उपस्थित करावा. तसे केले तर काय आढळेल ? १०,५०० स्क्वे. कि. मी. क्षेत्रफळात आज पसरलेल्या जीवसृष्टी (वनस्पती) मध्ये रामायण काळातील गवताच्या ११ जाती, जलचर प्राण्यांच्या १४७ जाती, ४५० मत्स्यजाती, ७९ शिंपल्यांच्या जाती व इतर जीवसृष्टीच्या ३६०० जातींनी समृद्ध आहे. इतके मोठे प्राचीन जीवसृष्टी असलेले क्षेत्र जगामध्ये दुसरे नाही. वरील वैज्ञानिक संस्था म्हणतात, ' या क्षेत्राचा हिंदुस्थानने विकास करायचे ठरवले तर एक वा अनेक सुसज्ज सागरसृष्टी विद्यालये निघू शकतील. शिक्षण, पर्यटन, उद्योग, अर्थ, सागर संशोधन, इतिहास, पुरातत्व, व्यवसाय, निर्यात अशा १२ क्षेत्रांतील गुंतवणूक इतकी प्रचंड असेल की लाखो हिंदुस्थानीयांना नोकरी, व्यवसाय उपलब्ध होतील. हा प्रादेशिक विकास सेतुसमुद्रम्‌पेक्षा कित्येक पटींनी उत्पन्न मिळवून देऊ शकेल. मुख्य म्हणजे, तो कायमस्वरूपी व सतत वाढता राहील. सेतूसमुद्रम्‌च्या दुरूस्तीचा खर्चही कायमस्वरूपी व वाढत जाणारा आहे. थोरियम टायटॅनियमचा ६० टक्के साठा रामसेतूमुळे केरळच्या किनाऱ्यावर आज सुरक्षित आहे. सेतू तोडल्याने असे सर्व साठे धुपून जातील किंवा आंतरराष्ट्रीय वाहतूक सुरू झाल्यामुळे थोरियम टायटॅनियम तस्करीला अनधिकृत व्यवसायाचे फार मोठे क्षेत्र उपलब्ध करून देण्याची चूक आपण करून बसू.

धनुष्यकोडी ' टी ' ते तलाई मन्नार (लंका) या ३३ मैल (५३ कि. मी.) क्षेत्रात रामसेतू पसरला आहे. भूगर्भ परीक्षणे बोअर होल्स,

कोरल, समुद्र यात सेतूला समांतर १ कि. मी. क्षेत्रात आढळलेली वाळू, दगड, चुनखडी नैसर्गिकदृष्ट्या घडलेली नाही. ती मानवनिर्मित भराव टाकल्यासारखी आढळली आहे. बरे त्यातही रेती, वाळू, चुनखडी, मोठे दगड, शिलाखंड असे स्तर आहेतच. भूगर्भ खात्याचे रासायनिक विश्लेषण त्याला Calcareons san stones Calcioum व bonlder like materics असे म्हणते. विशिष्ट पद्धतीने त्यात प्रवाळ व रेती दाबून बसविण्याची प्रक्रिया आपोआप होऊ शकत नाही. सेतूचा हा पट्टा धनुष्यकोडीपासून सुरू होतो व लंकेच्या तलाईमन्नार इथे संपतो. तेथपर्यंत ही अशी स्तररचना कशी झाली ? कुणी केली ?

रामसेतूला केंद्र शासनाने धक्का लावू नये हीच सर्व हिंदुस्थानीयांची मनोमन इच्छा आहे; परंतु हे धार्मिक वा भावनिक पातळ्यांवर सांगण्याऐवजी वैज्ञानिक पद्धतीने ते कसे सिद्ध झाले आहे. त्याच्यावर काय डॉक्युमेंटेशन, चित्रफिती व अहवाल केंद्र, नासा, इस्रो, निऑट यांच्याकडे आहेत ते जाणून घ्यायला हवं तरच रामसेतू वाचविण्याचे म्हणणे जनतेला पटेल.

***

महाभारतकालीन द्वारकेहून मोठी नगरी

समुद्रतळाखाली वा सिंधू, गंगा अशा सुप्रसिद्ध नद्यांच्या पोटात काय दडलं असेल ? पुराणकालीन शहरे, टायटॅनिकसारखी प्रचंड जहाजे. बुडालेल्या जहाजांतील खजिने, सोनेनाणे ? हिंदुस्थानच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशन टेक्नॉलॉजीतर्फे (NIOT) व इस्रो (ISRO) या संस्था अनुक्रमे समुद्र व अंतराळातून या प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा सतत प्रयत्न करतात. कशासाठी हा खटाटोप ? इतिहास आणि संस्कृतीचे जतन असं या संस्था म्हणतात. हा एक प्रचंड खर्चाचा उद्योग तितकाच वेळकाढू आहे. हिंदुस्थानच्या संदर्भात अशा संशोधनाची क्षेत्रे ठरविण्यात आली आहेत.

द्वारका (खंबायत आखात) हा महाभारत व रामसेतू (पाल्क बे, गल्फ ऑफ मन्नार, तुतिकोरीन) हा रामायणकालीन सागरप्रदेश पुराणकालीन संदर्भ लक्षात घेऊन Potential areas म्हणून निवडले गेले आहेत. नासा व श्रीलंका हे संशोधन स्वतंत्रपणे करीत आहेत. राम-रावण युद्ध वा महाभारत युद्ध ही काल्पनिक युद्धे नव्हती. दुसऱ्या महायुद्धासारखा विनाश त्यांनी घडवून आणला होता. यावर जगातले शास्त्रज्ञ सहमत आहेत. तसे प्रादेशिक पुरावेही आता त्यांच्याकडे आले आहेत. पाण्याखाली गेलेली द्वारका व रावणलंकेचा पश्चिम भाग इ. स. पू. ३००० ते ५००० वर्षांइतका काळ शास्त्रज्ञांनी गृहीत धरला होता. पण आता या काळापलीकडे आणखी २००० ते ३००० वर्षे आपला इतिहास मागे जाऊ शकेल, असे नवे संशोधन सांगते.

साइड स्कॅन सोनार या आधुनिक उपकरणामुळे हिंदुस्थानी इतिहासातील घटनाकाळ अजूनही २००० ते ३००० वर्षे मागे जाऊ शकेल. द्वारकानगरीहून मोठ्या नगरीचे अवशेष ३६ मीटर्स (१२० Ft) खोलवर पसरलेले सोनार उपकरणाने शोधून काढले आहेत. (BBC New Tom Housden) इतक्या खोल ध्वनिलहरी सोडून जी छायाचित्रे संकलित करता आली त्यात काय आढळले ? नगर रचना, इमारती, रस्ते यांचा प्रमाणबद्ध आकारही आताच्या भूमितीशी जुळणारे आहेत.

आश्चर्याची गोष्ट ही की आता मिळालेले शहर खंबायत

आखातातले द्वारकेसारखेच पण आधीच्या काळातलं शहर आहे. अधिक विस्तृत शहर, अधिक खोल पाण्यात आढळत आहे. तिथले रस्ते, चौक, कंपाऊंड वॉल्स अधिक रेखीव आणि मजबूत आढळल्या आहेत. त्या नगरीची छायाचित्रे, तिचे भूमिती विशेष स्पष्टपणे दाखवितात. चौकोन, गोलाकार भिंतीची सरळ रचना, जिन्यांच्या पायऱ्या यांची रचना कुठली ना कुठली भूमिती परिमाणे वापरून आधी ठरवून गेली व त्यानुसार निर्मिती झाली. सोनार स्कॅनप्रमाणे वय येतं ९००० ते ९५०० वर्षे. याचा दुसरा अर्थ असा की, आम्ही सरस्वती नदीचे जे वय ११००० म्हणतो ते बहुधा अजूनही मागे सरकेल. महाभारताच्या अणुयुद्धाशी शहराचा काही संबंध असेल का ?

***

इतिहासातला भूगोल

भारताचा भूगोल राजकीयदृष्ट्या अनेकवेळा बदलला. भूस्तरीय दृष्ट्याही हजारो वर्षांत अनेक बदल झाले. इतिहास जर भूगोलाच्या व विज्ञानाच्या मदतीने जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर तो सोपा होतो. एरवी न कळलेली अनेक रहस्ये अशा त्रिमिती दर्शनाने पटकन समजतात.

इतिहास भूगोल व त्यातील विज्ञान संदर्भ शिक्षक संशोधक वा विद्यार्थ्याला जे आकलन मिळवून देतात ते त्याच्या स्मृतिपटलावर कायम राहाते. घोकंपट्टी करावी लागत नाही. इंटरनेटवर तुम्हाला आधुनिक दृष्टीने अनेक विषयांची स्फुटे गोषवारा संदर्भ मिळतील; परंतु ते नेहमीच पुरेसे होईल असं नसतं. अशा समजुतीने त्या विषयाचे सर्व ज्ञान मिळेल असं कधी होत नाही. इतिहासाचे पुरावे, संदर्भ नामांकित वाचानालयात जाऊन मिळवून त्याला इंटरनेट व मॅप्सची जोड दिली तर इतिहास संकलनाचे काम सोपे होते. अशा संकलनांची ब्रीफ्स तयार केली तर इतिहासाच्या शिक्षकाचे काम स्वत:पुरते सोपे होईलच; परंतु अशी ब्रीफ्स सीडीच्या स्वरूपात वाचनालयात साठविता येतील. वस्तुसंग्रहालये, प्रदर्शने, प्रवास सहजी, संस्कृती रक्षण, फिल्म प्रॉडक्शन, राजकीय शिष्टाचार, विदेश सहली, पर्यटकांचे स्वागतकक्ष, विमान कंपन्या, विमानतळांच्या कार्यकक्षा येथे उपयोगी पडतील यात काही शंका नाही. हे सारं परदेशात घडते आहे. विज्ञान पर्यटनाच्या क्षेत्रात याचा उपयोग केला जात आहे.

सध्याच्या शिक्षण पद्धतीत व्यवस्थापन शिक्षणात (एमबीए, एमएमएस) प्रशासन व्यवस्था प्रशिक्षण क्षेत्रात, जिल्हाधिकारी, कमिशनर यांच्या अधिपत्याखालील कार्यालये, मंत्रालयातील प्रोटोकोल, जनसंपर्क कार्यालये, वृत्तपत्रे, टी. व्ही. वाहिन्या या सर्व ठिकाणी जिल्हा राज्य केंद्र अशा विविध पातळ्यांवर जी जी माहिती गोळा होते, संकलित होते व प्रसारित होते तिचे टेलरमेड स्वरूप भूगोलाच्या संदर्भात केल्याने सोपे होते. माहितीचे प्रसारण आणि आकलन एकाच वेळी साधण्याची किमया भूगोल करतो.

विज्ञानाची कुठलीही शाखा भूगोलाच्या संकलनाने समजावून देणे आणि घेणे हा एक दृक्श्राव्य अनुभव आहे.

प्रशासन व्यवस्थेचे नीट आकलन होणे हे खाजगी निमशासकीय, शासकीय (राज्य वा केंद्र) तिथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना, संबंधित उद्योगव्यवसायातील नेहमी संपर्कात येणाऱ्या अधिकारीवर्गाला आवश्यक असेल तर भूगोलाच्या मदतीने केलेल्या टेलरमेड संकलनाचा निश्चितच उपयोग होईल.

अशा सर्व संकलनाला पर्यटनाची जोड देऊन जे माहिती प्रसारण होते ते पक्के असते, कायम टिकणारे असते व स्वस्तही असते.

' इन्सेटिव्हज ' या स्वरूपात देशातील वा परदेशातील सहली असे समजा स्वरूप असेल तर एखाद्या कार्यालयात याचा टेलरमेड प्रोग्रॅम व्यवस्थापन कसा आखील ? आराम आणि कार्यक्षमता वाढवणे हा अशा सहलीचा उद्देश असतो. डीलर्स, डिस्ट्रिब्युटर्स, एजंट्स यांच्या कॉन्फरन्सेस हल्ली होतात. शहरातील प्रेक्षणीय स्थळांची एक दिवसाची सहल असते. त्या सहलीची योजना आखताना तिथे आपण सांस्कृतिक, ऐतिहासिक काय व का पाहाणार आहोत हे व्यवस्थापन व तेथील अधिकारीवर्गाला समजणे आवश्यक आहे. तशी सीडी व जपानी फ्लॅशकार्ड तंत्राने हे निश्चितच सोपे होईल.

***

मोहेंजोदारोचा ‘ अणुस्फोट ’ !

अलेक्झांडर पेचरस्की या रशियन शास्त्रज्ञाला अणुविज्ञानाचा प्राचीन उपयोग कुठे केला गेला हे जाणण्याची उत्सुकता होती. मोहेंजोदारो (दडो) या सिंधच्या वाळवंटातील प्राचीन वसाहतीचे इ. स. १९०० च्या दरम्यान झालेल्या उत्खननाची पार्श्वभूमी त्याला कारणीभूत झाली. उत्खननात हे पूर्णतया विकसित झालेले शहर अचानक ओस का पडले याची कारणे कळत नव्हती. परकीयांचे आक्रमण झाले असल्यास, इतरत्र आढळणाऱ्या विध्वंसाच्या खाणाखुणा, मृत व्यक्तींच्या सांगाड्यांच्या अवशेषांवर आढळणाऱ्या जखमा, लढाईत आढळणारी शस्त्रे, मृत प्राण्यांचे अवशेष कुठेही आढळले नव्हते. पूर आला असल्यास जमिनीवर आढळणाऱ्या खाणाखुणादेखील सापडल्या नाहीत. एवढ्या प्रचंड वसाहत क्षेत्राची वाताहत एकदम अचानक झाल्याचा निष्कर्ष काढावा लागला. मोहेंजोदारोच्या वसाहतीमधल्या घरे, रस्ते, जलवहनाची गटारे यांचा तसा नाश झाला नव्हता. त्यामुळे इथले रहिवासी एकाएकी कुठे गायब झाले हे कळेना.

डेव्हेनपोर्ट आणि व्हिन्सेन्टी या दोन शास्त्रज्ञांनी मोहेंजोदारोचा विनाश नागासाकी हिरोशिमावर अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी टाकलेल्या अणुबॉम्बसारख्या संहारक शस्त्राने झाला या मुद्यांवर संशोधन केले. त्यांना असं आढळलं की, फार मोठ्या भूप्रदेशातील वाळू हिरव्या रंगाच्या सुकलेल्या थरात घट्ट स्वरूपात चिकटली आहे, असे अनेक थर खूप दूरपर्यंत पसरले आहेत. त्या वाळूचे रासायनिक विश्लेषण झाले त्यावरून काच वितळताना जी प्रक्रिया घडते तसा एखादा प्रकार इथे घडला असावा. अणुस्फोट झाला तरच हे शक्य आहे हे त्यांच्या लक्षात आले. नेव्हाडा येथे अणुबॉम्बच्या ज्या अनेक चाचण्या घेतल्या गेल्या त्यात नेमकी हीच परिस्थिती आढळली होती.

मोहेंजोदारोचे अशा दिशेने केलेले उत्खनन व वाळूचे रसायनिक विश्लेषण तिथे १५०० डिग्रीज सेंटिग्रेड वा त्याहून अधिक तापमान कधीकाळी झाल्याचे दाखवीत होते. त्या काळाची व्याप्ती महाभारताच्या काळाइतकी मागे जाऊन पोहोचली. (इ. स. पू. ३००० ते ५०००) या

काळात शेकडो माणसे काही क्षणात मृत झाली. त्यांचे सांगाडे किरणोत्सर्गी झाले ते ५० पट अधिक घटनेने (उत्सर्गाने). अशा घटनेचा महाभारतकालीन युद्धाचा संदर्भही शोधला गेला. तो असा आहे - एका प्रचंड स्फोटाने जमीन हादरली आणि धुराचा प्रचंड काळा लोळ सर्वत्र पसरला. त्याने आकाश आणि आसमंत व्यापून टाकला. शेकडो प्राणी, जनावरे, माणसे क्षणार्धात मरून पडली. त्यात शेतकरी, सैनिक व जनावरांचा समावेश होता. त्यांच्या आजूबाजूची व त्वचेवरील वाळू किरणोत्सर्गी झाली होती.

(संदर्भ - Anoient nuclear blast and levitating stones of Shivaru By - Alexander Pechersky.)

***

पाणिनी

पाणिनीने संस्कृतचे व्याकरण बनविले व तक्षशिला विद्यापीठात तो संस्कृत शिकवी. आताच्या संदर्भात या घटनेचा काळ अजून १००० वर्षे मागे जाऊ शकेल. पाणिनीने उत्तर पथाचा उल्लेख केला आहे तो आजचा ग्रॅण्ड ट्रंक रोड आहे. ब्रिटिशांनी हा रस्ता नव्याने विस्तृत केला. त्यांच्याही अगोदर शेरशहा सुरीने (हुमायूनला विस्थापित करणारा) त्याची दुरूस्ती केली (इ. स. १५४०). त्याही अगोदर सम्राट अशोकाने या रस्त्याच्या दोन्ही बाजूने झाडे, विहिरी व मुक्कामासाठी सराया बांधल्या. आज या जुन्या रस्त्याचे अवशेष मथुरा शहराजवळ दिसतात. ताम्रलिप्तीपर्यंत हा सर्वात प्राचीन रस्ता २४०० कि. मी. अंतराचा आहे. याचा अर्थ घोड्यावरून ६० ते ७० दिवसांचे अंतर तेव्हा होई. महाभारत काळातील रस्ते फारसे बदलले नसतील तर महायुद्धाच्या वेळी कौरव-पांडवांच्या वेळी याच रस्त्याचा जास्तीत जास्त वेळा सैन्य वाहतुकीसाठी उपयोग केला गेला असेल. कुरूक्षेत्रावर युद्धासाठी येण्यासाठी त्यांना कुठूनही एक ते दीड महिना लागला असेल.

वेदांनी कुठेही आर्यांनी हिंदुस्थानवर आक्रमण केल्याचा उल्लेख केला नाही. आर्य वेगळ्या वंशाचे होते अशीही नोंद वेदात नाही. त्यांची वेगळी भाषा होती असंही नाही. प्राचीन हिंदुस्थानी नद्यांच्या काठाकाठाने स्थिरावत गेल्याचेच त्यांच्या वसाहती सांगतात. वैदिक संस्कृती, हरप्पन वेगळी वा सिंधू आणि सरस्वती संस्कृती वेगळी नव्हतीच. ब्राह्मी लिपी ही संस्कृतची आद्य लिपी आहे. ज्यातून पुढे देवनागरी निर्माण झाली. हरप्पा-मोहेंनजोदारो इथे मिळालेले शिक्के व त्यांचे विश्लेषण अद्याप पूर्ण झाले नाही. परंतु ती चित्रलिपी वाटल्यामुळे ब्रिटिशांनी त्या संस्कृतीला द्राविडी ठरवून टाकले. मध्यंतरी दिल्लीला डॉ. कल्याणरामन् यांनी या लिपीची उकल व त्यावरील त्यांचे संशोधन यावर भाषण केले.

संस्कृत ही वैदिक आर्यांची मातृभाषा होती. हर्षवर्धन हा राजा सातव्या शतकात होऊन गेला. इ. स. पू. ५००० वर्षांपासून ते हर्षवर्धनाच्या काळापर्यंत शिक्षण, राजकारण, प्रशासन, अर्थकारण, व्यापार या सर्व उलाढाली संस्कृत भाषेतच होत. मुसलमानांचे आक्रमण हिंदुस्थानवर झाले

नसते तर आजही आम्ही आमचे राजकीय व सामाजिक व्यवहार बहुधा संस्कृतमध्येच ठेवले असते.

***

पर्वतकाची विषकन्या

इतिहासाचे भान ठेवून लिहिलेले एक प्राचीन नाटक म्हणजे विशाखादत्ताचे 'मुद्राराक्षस'. त्यात सांगितलेल्या घटना चंद्रगुप्त मौर्याच्या काळावर (इ. स. पू. ३२४ ते इ. स. पू. ३०० या काळात) प्रकाश टाकणाऱ्या आहेत. पाटलीपुत्राचा जुलमी राजा धनानंद याला पदभ्रष्ट करण्यामध्ये चंद्रगुप्त मौर्य व आर्य चाणक्य यांना स्वत:च्या उत्कृष्ट सैन्याचे पाठबळ राजा पर्वतकाने दिले. विशाखादत्ताने हे नाटक ४ थ्या शतकात लिहिले म्हणजे ७०० वर्षांनी. तरीही तो हिंदुस्थानचा इतिहास विसरला नाही. चंद्रगुप्ताला धनानंदाचा एक नातेवाईक (बहुधा अनौरस पुत्र) म्हणून राजाश्रय मिळाला. एक सेनाधिकारी म्हणून नोकरी मिळाली. परंतु स्वत:च्या इतर औरस मुलांचा दर्जा त्याला धनानंद देत नसावा. आर्य चाणक्य दंडाधिपती (Revenue Minister) म्हणून धनानंदाकडे नोकरीला राहिला. पाटलीपुत्रात त्याच्याविरूद्ध कारस्थाने करणारे म्हणून चंद्रगुप्त व चाणक्य यांच्यावर त्याची खप्पामर्जी झाली.

चंद्रगुप्त व आर्य चाणक्य पाटलीपुत्रांतून पसार झाले व तक्षशीलेत राजपुत्र अंभीच्या आश्रयाला आले. त्यांना पर्वतक या राजाने सैन्याची सर्वतोपरी मदत केली. अलेक्झांडरचा सैन्य देण्यामध्ये काहीच उपयोग झाला नाही. उलट अडथळा निर्माण झाला. हा पर्वतक निश्चित कुठल्या देशाचा राजा होता याबद्दल विवाद आहेत. तो झेलमचा राजा पुरू (पौरस) निश्चित नव्हता. सैन्याच्या बदल्यात धनानंदाचा काटा काढल्यावर मगधाचे राज्य स्वत:ला मिळावे अशी त्याची सुप्त महत्त्वाकांक्षा असेलही. परंतु पाताळयंत्री चाणक्याने त्याला तसे आश्वासन गरजेपोटी दिले. धनानंद व त्याचे आठ पुत्र यांना ठार मारल्यावर चंद्रगुप्तासाठी नगराचे दरवाजे खुले झाले.

चाणक्याला चंद्रगुप्त हवा होता. पर्वतकाला कसे संपवावे हा विचार बळावला. पण हे जमावे कसे ? इतिहासात दोन घटना सांगितल्या आहेत. धनानंदाचा अमात्य राक्षस याने चंद्रगुप्ताला ठार मारण्यासाठी एक कळसूत्री महाद्वार उभे केले तेव्हा चंद्रगुप्त पालखीत बसून नवरदेवाप्रमाणे राजवस्त्रे घालून तयार झाला असताना आर्य चाणक्याने त्याला बाजूला

होण्याचा आग्रह केला व पर्वतकाची तशीच सजवलेली पालखी दिमाखात पुढे काढली. राक्षस अमात्य घातपात केल्याखेरीज राहाणार नाही ही अटकळ पर्वतकाच्या पालखीवर ते द्वार कोसळल्यावर व त्याचा मृत्यू झाल्यावर फक्त चाणक्याच्याच लक्षात आली.

दुसऱ्या गोष्टीनुसार राज्याभिषेकाआधी एक महोत्सव झाला व पर्वतकाच्या शयनमंदिरात आर्य चाणक्याने एक सुंदर विषकन्या पाठवली. दुसऱ्या दिवशी सकाळी राजा पर्वतक मृत झाल्याचे कळले व चंद्रगुप्ताचा राज्याभिषेक बिनबोभाट पार पडला. यापैकी निश्चित खरी घटना कुठली हे बाहेर आले नाही. पर्वतकाचा अंत अकस्मात झाला एवढेच ठाऊक आहे. कारस्थानी राक्षस अमात्य शेवटी आर्य चाणक्याला शरण गेला.

कळसूत्री म्हणजे यांत्रिकी व्यवस्थेने दारे वर-खाली करणे. हिंदुस्थानात इ. स. पू. ३०० वर्षे परिचित होते व विषकन्या योग्य वेळी वापरून शत्रूचा काटा कसा काढीत याचे राजा पर्वतकाचा मृत्यू एक ठळक उदाहरण आहे. (संदर्भ ' मुद्राराक्षस ' व आर्य चाणक्याचे अर्थशास्त्र)

***

शून्यातून शून्याकडे

महाराष्ट्राची दुसरी राजधानी नागपूर हिंदुस्थानच्या बरोबर मध्यावर वसलेली आहे. हिंदुस्थानच्या दक्षिण, उत्तर, पूर्व, पश्चिम अशा कुठल्याही दिशेने कुठल्याही वाहनाने तुम्ही प्रवासाला सुरूवात केल्यास नागपूर शहर हे केंद्रस्थानी येते. भौगोलिकदृष्ट्या अंतराची मोजणी करण्यासाठी जिथून सुरूवात केली जाते ती शून्यापासून. म्हणून नागपूरची केंद्रभूमी व बिंदू ब्रिटिशांनी शोधून त्या ठिकाणी एक स्तंभ उभारला. त्याला ' झीरो माइलस्टोन ' हे नाव देण्यात आले.

हिंदुस्थानच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौगोलिक, शास्त्रीय, गणिती, शैक्षणिक अशा कुठल्याही दृष्टिकोनातून केंद्र व महाराष्ट्र शासनाने ही वास्तू पर्यटनाच्या नकाशावर आणणे महत्त्वाचे आहे. तशी नोंद युनेस्कोकडे हिंदुस्थानने करवून घेतली पाहिजे. म्हणजे युनेस्कोतर्फे हिंदुस्थानात येणारी शिष्टमंडळे महाराष्ट्राच्या पर्यटन खात्याला नागपूरकडे वळवता येतील. त्यामुळे पर्यटकांच्या संख्येत वाढ होईल. आज काय दिसतं? हे स्थळ महाराष्ट्र व केंद्र शासनाच्या पर्यटन नोंदीतही समाविष्ट झालेले नाही.

ज्याला खरोखर ऐतिहासिक महत्त्व आहे त्या गोष्टीच आम्ही दुर्लक्षित करतो. मध्यंतरी मी दिल्लीत गेलो. दिल्ली पर्यटन विभागाने एक दिवसाची सहल करताना कुतुबमिनार व त्याच्या इतिहासाची उजळणी करताना गाइडने १५ मिनिटे घेतली, मग मुक्काम हलविताना जवळच्या लोहस्तंभाकडे अंगुलीनिर्देश करीत तो म्हणाला, ' समोर छोटासा दिसतो तो लोहस्तंभ ज्याला पाहायचा असेल त्याने जावे. २ मिनिटे फक्त. आपल्याला लगेच निघायचंय.' मी, माझी पत्नी आणि एक वृद्ध इतिहासाचे अभ्यासक कसेबसे तिथे पोहोचलो. समुद्रगुप्त व चंद्रगुप्ताची (४ थे शतक) ब्राह्मी लिपीत कोरलेल्या स्तंभावरील अक्षरांकडे बघण्याएवढाही वेळ मिळाला नाही. बसचालक भोंगा वाजवू लागला. केविलवाणा लोहस्तंभ आमच्याकडे हताशपणे पाहात राहिला. दिल्ली पर्यटनाकडे वट कुतुबमिनारची, समुद्रगुप्ताला विचारतो कोण ?

***

न गंजणारे लोहस्तंभ

दिल्लीजवळ मेहरोलीचा लोहस्तंभ म्हणून ओळखला जाणारा लोहस्तंभ, मध्य प्रदेशातील धास्वा गावाजवळचा व कर्नाटकातील मोकांबिका देवालयाचा ध्वजस्तंभ असे तीन लोहस्तंभ न गंजणारे स्तंभ म्हणून घडवले गेले. गेली २००० वर्षे लोखंडापासून पोलाद तयार करण्याचे तंत्रविज्ञान हिंदुस्थानने आत्मसात केले. इथल्या तलवारी, तोफा, भाले, कट्यारी न गंजता जगातील देशांनी वेळोवेळी वापरल्या.

डॉ. आर. आर. बालसुब्रह्मण्यम व जमशेदपूरच्या लॅबोरेटरीज ऑफ चीफ मेटॅलर्जी इन्स्पेक्टर व जगातील विविध देशांनी इ॑॰ येऊन ही न गंजण्याची प्रक्रिया सर्वप्रथम हिंदुस्थानात कशी घडली या॑ र संशोधन केले आहे. जितक्या उंचीचा लोहस्तंभ वा असेच प्रचंड लोह॰ाम घडविताना लोखंडाबरोबर मँगनीझ, क्रोमियम, कॉपर, निकेल, गंध॰क, सिलिकॉन, नायट्रोजन यांचा वापर केल्याचे संशोधकांना आढळले. लोखंडाला गंज चढू न देणारे आवरण (Film) वारंवार निर्माण होत राहील असे तंत्र प्राचीन हिंदुस्थानात निश्चित कधी प्रगत झाले याबद्दल मतभेद आहेत. परंतु या स्तंभांना स्वत:ची झळाळी व किंचित तपकिरी रंगाचं आवरण सतत कुठल्याही हवामानात न थांबता आपोआप घडत राहील हे या घडणावळीचे वैशिष्ट्य आहे.

४० ते ५० पौंडांचे गुळाच्या ढेपीसारखे गोळे (Lumps) एकापुढे एक याप्रमाणे किंवा एकावर एक याप्रमाणे तितक्या उंचीच्या मातीच्या साच्यात ओतकाम करून, वेल्डिंग करून अशा दोन्ही प्रकारे झाले. हे करण्यासाठी भट्टीमध्ये असे गोळे लाल होईपर्यंत तापवले जात. प्रत्येक गोळा दुसऱ्या गोळ्यात एकजीव होण्यासाठी मधोमध छिद्र ठेवले जाई व त्यातून एक तार ओवली जाई.

मेहरोलीच्या लोहस्तंभाच्या परीक्षणात खांबाप्रमाणे एकसंध झालेला हा स्तंभ, त्यावरची सात कमळे, परत एकावर एक ठेवून त्याचे स्वतंत्र वेल्डिंग केल्यानंतर खांबाच्या खोबणीत ते बसवले गेले व त्यानंतर तो मथुरेच्या विष्णुमंदिरात स्थापन केला गेला. तेथून दिल्लीपर्यंत म्हणजे १४७ मैल दूर तो उभारला गेला. (इ. स. ३८०-८५) त्यावर ब्राह्मी

लिपीतील संस्कृतमध्ये दुसऱ्या चंद्रगुप्ताचे नाव कोरले आहे. गुप्त सम्राटांची वंशावळ तिथे कोरली आहे. ६ टन वजन, २४ फूट उंची (७.३ मी.) बैलगाड्यांच्या मदतीने १४७ मैल नेण्यासाठी मजबूत लाकडाचा पृष्ठभाग व लाकडाची चाके बैलगाडीच्या पृष्ठभागावर जोडण्याची कामगिरी आधी करावी लागली. रस्त्याचे नूतनीकरण करावे लागले व अनेक धट्टेकट्टे बैल तो गाडा ओढण्यासाठी लागले. म्हणजे अशा स्वरूपाची वाहतूक साध्य करण्याचेही एक तंत्र आधी शोधले गेले. टी. ए. हीथ यांनी १८३९ मध्ये या संशोधनासंबंधीचा अहवाल तयार केला तर दुसरे पुरातत्त्वज्ञ व्ही. बॉल यांनी १८८१ मध्ये ' हिंदुस्थानचे लोखंड विज्ञान ' यावर आपला प्रबंध तयार केला.

***

हिंदुस्थानी दंतकथा व शल्यचिकित्सा

दातांचे आरोग्य आणि निगा याची सर्वप्रथम ओळख हिंदुस्थानींना ९००० वर्षांच्या आधीपासून झाल्याचे आंद्रे कुसिना या पुरातत्त्वज्ञाने जाहीर केले. मेहरगडच्या उत्खननात असे कैक सांगाडे मिळाले. ज्यांच्या दाढा वा दात किडल्याचे दिसत होते व किडलेला दात कोरून तो परिश्रमपूर्वक भरून पूर्ववत बसविलेला होता. (मिसुरी कोलंबिया विश्वविद्यालयाचे संयुक्त संशोधन) या शस्त्रक्रियेत अणकुचीदार सुयांमारखी उपकरणे वापरल्याचे स्पष्टपणे दिसत होते. शल्यचिकित्सेवर पुढे तिसऱ्या व चौथ्या शतकात सुश्रुताने शस्त्रक्रिया या विज्ञानाचा पूर्ण अभ्यास करून सुश्रुत संहिता लिहिली. त्याद्वारे शरीरशास्त्र आणि रोगचिकित्सा यांचा एकत्रित अभ्यास करण्याची प्रथा सर्वप्रथम हिंदुस्थानात सुरू झाली. रोग निवारणासाठी शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्यास ती सुलभरीत्या कशी करता येईल यावर अनेक विश्वविद्यालयातून संशोधन होत राहिले. परिणामी शस्त्रक्रियेसाठी वेगवेगळी उपकरणे तयार होऊ लागली. सुश्रुताने दंतचिकित्सा व शल्यचिकित्सेवर जी उपकरणे वापरली त्याचे चित्र आता उपलब्ध आहे. सुश्रुत बनारस विद्यापीठात दंतचिकित्सा व शल्यचिकित्सा हे विषय शिकवीत असे.

सुश्रुतासारखा शल्यविद्या शास्त्रज्ञ इ. स. च्या तिसऱ्या व चौथ्या शतकात झाला. नेत्र आणि प्लास्टिक सर्जरी तो आताच्या कुशल व्यासंगी डॉक्टरांसारखीच करी. विद्यापीठात अध्यापन करीत असताना त्याने कुशल डॉक्टरांची फौज तयार केली. अनेक विद्यापीठात पुढे त्याचे विद्यार्थी शल्यविद्या शिकवू लागले. शल्यचिकित्सेची हिंदुस्थानी परंपरा सुश्रुत, चरक यांच्यामुळे हिंदुस्थानात व अन्य देशातही पोहोचली.

सुश्रुत संहितेत ११२० रोगांचा विचार केला आहे. रोगांना आवर घालणारी व पूर्णपणे निर्मूलन करणारी अशी ७०० आयुर्वेदिक औषधे, ६४ प्रकारच्या विविध शस्त्रक्रिया नोंदल्या गेल्या. याचा अर्थ वैदिक काळापासून हिंदुस्थानी डॉक्टर्स केवळ मंत्रतंत्र यावर भर न देता रोगनिदान, शस्त्रक्रिया शरीर व मनाचे आजार यावर जास्त भर देत असत हे समजते.

सुश्रुताच्या शस्त्रक्रियेत सिझेरियन मोतीबिंदू, कृत्रिम अवयवांची

जोड, हाड मोडल्यास नव्याने ते परत जोडण्याचे कसब, कानाच्या आतील शस्त्रक्रिया, मेंदूवर आघात झाल्यास सुश्रुताने तशाही अवस्थेत मेंदूवर शस्त्रक्रिया करून रोग्याचे प्राण वाचविल्याचा उल्लेख आहे. त्याच्या शस्त्रक्रियेत जखमी दुखऱ्या भागाला छेद देऊन अनावश्यक भाग कापून टाकला जाई. शिरा कापल्या जात. त्यांना टाके घातले जात. जखमा धुऊन, टाके घालून बंद केल्या जात. आता सांधेजोड अस्थिभंग अशा क्रियात नळी घालून हाडाला आधार दिला जातो. सुश्रुताने अशाच प्रकारे हाडे, सांधे जोडणीसाठी धातूचा उपयोग केला आहे.

***

झेलमचा ‘ चिखल कुवा ’

पाकिस्तानने १९६० मध्ये कारी व मंगला या टेकड्यांचा, तिथल्या पाणलोट क्षेत्राचा पाऊस, पूर, वारे, हवामान यांचा अभ्यासपूर्ण अहवाल तयार केला. मंगला धरण बांधण्यासाठी पाकिस्तानला जागतिक बँकेकडून कर्ज हवे होते व त्यासाठी या अहवालाची आवश्यकता होती. या दोन टेकड्यांच्या भूप्रदेशात हे धरण बांधले गेले (१९६७). या टेकड्यांमधून झेलम नदी वाहते. कारी टेकडीला चंद्रकोरीप्रमाणे वळून वाहताना ऐन पावसाळ्यात (जून-जुलै-ऑगस्ट) आजूबाजूच्या टेकड्या व हिमालयाच्या उताराचा हा भूप्रदेश असल्याने इथे उंचावरून धबधबे कोसळतात. झेलमला त्याचवेळी पूर आणि पावसाचा तडाखा बसतो. पाण्याला वेग येतो. सोसाट्याचे वारे वाहू लागतात. झेलमचे इतर वेळचे शांत स्वरूप बदलते. हिमालयात बर्फ वितळण्याचा हा मोसम असल्याने जोरदार हिमवृष्टीबरोबर अनेक हिमखंड व शिळा गडगडत खाली येतात. झेलमचा उत्तर काठ काळ्या मातीचा तर दक्षिण काठ गारगोटी (Quartz) या पांढऱ्या कठीण दगडाचा आहे. तो उत्तर काठापेक्षा उंच आहे. या उंच प्रदेशाला कारी टेकडीने वेढले आहे. नैसर्गिकपणे हा भूभाग एक ५ x ५ मैल एवढे विस्तृत मैदान वा पठार बनला आहे. झेलमच्या या प्रदेशात पुरा बरोबर व कोसळणाऱ्या धबधब्यांबरोबर गाळ आणि तुटलेले वृक्ष वाहत येतात. हा गाळ व झाडेझुडपे वेगाने झेलमच्या उंच किनाऱ्याला धडकतात आणि सखल उत्तर किनाऱ्याकडे लकटली जातात. हजारो वर्षे ही क्रिया चालू आहे. हा गाळ पसरत जातो व पुढे जात कुठेतरी स्थिरावतो. त्यामुळे या क्षेत्रातली शेती नष्ट होते. इथे काही पिकू शकत नाही. फक्त दलदल, काटेरी झुडपे व सुकलेल्या गाळावर उगवणाऱ्या वेली. कालांतराने सुकलेला पृष्ठभाग आणि जमीन एकसारखीच दिसू लागते. या प्रदेशाची माहिती असणारी माणसे एकमेकांच्या मदतीने क्वचितप्रसंगी इकडे तिकडे करतात. पण नवख्या माणसांना सुकलेल्या गाळाखाली साचलेला ओला गाळ कळू शकत नाही.

या प्रदेशात असे चिखल कुवे (कोकणात याला काहिल (काईल) म्हणजे कढई असे म्हणतात) निष्काळजीपणे चालणाऱ्या माणसाचा पाय

कधी कुठे रूतेल सांगता येणार नाही. अशा कुव्यात वा काहिलीत पाय रूतल्यावर माणूस हळूहळू आत ओढला जातो. त्याच्याबरोबरचे सवंगडी दोर किंवा बांबूच्या साहाय्याने प्रसंगावधान राखून त्याला ओढून बाहेर काढूही शकतात.

झेलमच्या उत्तर किनाऱ्याला जिथे अलेक्झांडरने १७ मैल ऐन पूर आणि पावसात नदी ओलांडली (जुलैचा पहिला आठवडा इ. स. पू. ३२६) तीही रात्रीच्या वेळी झेलम दुथडी भरून वाहताना ती गावे आहेत हरणपूर-भूना. जनरल ॲबॉटला १८४८ च्या नोव्हेंबरमध्ये शीख-ब्रिटिश युद्धात हा अनुभव आला होता. नोव्हेंबर हा काही पावसाचा महिना नाही. मग ऐन पावसाळ्यात अलेक्झांडर त्याची सेना, जनावरे, आपापली आयुधे घेऊन झेलम कशी काय पार करू शकला असता ? बरे, तशीही पलीकडे गेलीच असती तर त्यांना त्यांचे फालँक्स फॉर्मेशन करण्यासाठी मोठ्या संख्येने साखळी तयार करण्याएवढा वेळ आणि शत्रूवर तुटून पडण्याएवढी उमेद येणार कुठून ? १७ मैल चालण्यासाठी त्यांचे २२ ते २६ तास वाया गेले. ग्रीक इतिहासकार म्हणविणाऱ्यांचा हा केवळ कल्पनाविलास आहे. हरणपूर-भूना हा परिसर आजही अशा चिखल कुव्याचा आहे. हिंदुस्थानने इमेजरी व साइड सोनार वा तत्सम उपकरणांच्या सहाय्याने ' नासा 'च्या मदतीने असे कुवे शोधल्यास अलेक्झांडरचे सैनिक, त्यांच्याबरोबरची घोडी व आयुधे यांचे अवशेष मिळू शकतील.

***

भूगोलाने सांगितलेला इतिहास

हरणपूर-भूना या जोडगावांजवळ जनरल अ‍ॅबॉट ब्रिटिश सैन्यदलाची एक तुकडी घेऊन आला. (१८४८) शीख-ब्रिटिश युद्धाचा काळ होता तो. अ‍ॅबॉट एक इतिहास संशोधकही होता. त्याला असे आढळले की, शीख त्याला मुद्दामच जवळ जाऊन आपल्या अंगावर घेत. ब्रिटिश घोडदळ पाठलाग करू लागले की झेलम नदीच्या दक्षिण किनाऱ्यावरच्या दलदलीत घुसत आणि क्षणार्धात नाहीसे होत. कुठे गेले कळत नसे. पण ब्रिटिश सैनिक मात्र ओल्या चिखलातून किनाऱ्याकडे येण्याच्या खटाटोपात त्यांच्या जनावरांसह पार थकून जात. समोर काहीशा उंचावर गारगोटीचे (Quartz) एक मैदान दिसे. तिथून कुठून तरी शीख माणसे येत. बेसावध सैन्यावर हल्ला करीत त्यांचा खजिना, दाणागोटा व जनावरांची वैरण लुटून पसार होत. नरसिंगपूर (रा) नावाच्या गावापासून एक पायवाट कारी या टेकडीकडे जात असे. पाठलागाला कंटाळलेला अ‍ॅबॉट एके दिवशी त्या वाटेने कारी टेकडीच्या मध्यावर येऊन पोहोचला आणि आश्चर्यचकीत झाला. त्याच्यासमोर पांढऱ्या पिवळसर गारगोटीचे प्रशस्त पठार (माळ) त्याला दिसले. ते झेलम नदीच्या दिशेने सखल होत गेले होते. परंतु ते पूर्णतया सपाट मैदान नव्हते. कारी टेकडी दुसऱ्या बाजूने जिथे संपन्न होती त्यापलीकडे मंगल नावाची दुसरी तशीच टेकडी होती. त्यांच्यामधून झेलम नदीने आपला मार्ग काढला होता. मंगल आणि कारी टेकड्यांना अनेक घळी पडल्या होत्या. दोन्ही टेकड्यांनी चंद्रकोरीच्या आकारासारखे एक वळण झेलमला दिले होते. जून-जुलै-ऑगस्ट या तीन महिन्यात इथे बर्फ वितळल्याने अनेक धबधबे उंचावरून आधीच खवळलेल्या झेलममध्ये उडी घेत. पावसाचा जोर वाढला की नदी रौद्ररूप धारण करी. हिमकडे कोसळत. चिंचोळ्या मार्गात अशा शिळा अडकल्या की पाणलोट ठरलेलाच. अशावेळी झेलमच्या सुमारे १७ मैलांच्या प्रदेशातील गाळ, झाडेझुडपे उत्तरेच्या सखल प्रदेशाकडे लकटला जाई. हजारो वर्षांपासून ही क्रिया घडत आली.

हरणपूर भूना गावासमोर अ‍ॅबॉटला चिखलाने व काटेरी झुडपे-वेलींनी गच्च भरलेली बेटे आढळली. अशी आणखीही काही बेटे त्या

अर्धगोलाकार प्रवाहात त्याला आढळली. १८४८ मध्येही ती निर्मनुष्य होती आणि अचानक त्याच्या कानावर एक लोककथा पडली. फार पूर्वी इथे दोन राजांमध्ये तुंबळ युद्ध झाले होते. इथला सम्राट जिंकला व त्याच्यावर हल्ला करणारा राजा पराभूत होऊन पळून गेला. ॲबॉटने इतिहासावरचे अनेक ग्रंथ वाचले होते. अनेक लढायांचा अभ्यास एक सेनाधिकारी म्हणून केला होता. त्याला नवा उत्साह आला. पुढील दोन दिवस ॲबॉटने कारीच्या पठारावर मुक्काम केला. मंगला टेकडीकडून कारीच्या पठारादरम्यान जी चिंचोळी भूमी व पाण्याचा ओघ आत शिरला त्याला त्याने अलेक्झांडर्स क्रीक (creek) हे नाव दिले. क्रीकच्या नंतर चिखलाचा एक पट्टा व त्यानंतरची दोन बेटे इतिहासात ग्रीकांनी सांगितल्याप्रमाणेच तिथे त्याला आढळली आणि त्याच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला.

पुरू व अलेक्झांडर यांचे युद्ध इ. स. पू. ३२६ च्या जुलैमध्ये (पहिला किंवा दुसरा आठवडा) ज्या रणभूमीवर झाले तीच ही भूमी आहे. आपले नकाशे आणि अहवाल त्याने कोलकत्याच्या मुख्य कार्यालयात पाठवून दिले ते नंतर इंग्लंडला रवाना झाले. ब्रिटिश म्युझियमकडे अलेक्झांडरच्या पुरू विजयाचे चांदीचे पदक वा नाणे आणि अनेक कागदपत्रे १८९५ ते १९२६ या काळात सुरक्षिततेच्या कारणाखाली पाठवली गेली. ब्रिटिश शासनाने याबद्दल कुठेही वाच्यता केली नाही. अनेक संशोधकांनी आक्षेप घेऊनही आजतागायत आमच्या खऱ्या इतिहासाची छाननी करता आलेली नाही.

***

प्राचीन युद्धाचे स्मृतिविशेष

स्मृतिविशेष (Artitacts) म्हणजे गतइतिहासाच्या वैशिष्ट्यांना हजारो वर्षानंतरही जपून ठेवणारे अवशेष. पाश्चात्य राष्ट्रे अशा अवशेषांच्या चित्रफिती, प्रवासी साहित्य, ऐतिहासिक वस्तूप्रदर्शने भरवतात. जगामध्ये संमेलने आयोजित करतात. आपल्याकडे असे विशेष शेकडो आहेत. अंभी, पुरू, आर्य चाणक्य व चंद्रगुप्त मौर्य यांनी हिंदुस्थानला परकीय आक्रमणापासून कसे सहीसलामत वाचवले हे सांगणारे दोन स्मृतिविशेष आज पाकिस्तानात आहेत. त्यापैकी एक आहे कारी रणमैदान व दुसरा विशेष आहे राजपुत्र अंभीचा राजमहाल.

पाकिस्तानी पुरातज्ज्ञ डॉ. सैफूर रहमान दार आणि डॉ. अहमद हसन दाणी यांनी ८० च्या दशकात भीर या टेकडीखाली उत्खनन करण्यास सुरूवात केली. अलेक्झांडरचे ज्या तक्षशिलेत ५ महिने वास्तव्य झाले ते कुठे व त्याचे लाखभर सैन्य व १५००० घोडदळ कुठे छावण्या पडल्या असतील ? जेमतेम ३०,००० लोकसंख्या असलेल्या तक्षशिलेतील जनतेवर एवढ्या मोठ्या संख्येने आक्रमण झाल्यावर आबालवृद्ध स्त्रिया यांच्यावर काय अत्याचार अलेक्झांडरच्या ग्रीक वा मॅसिडोनियन सैनिकांनी केले असतील ? या शक्यता त्यांना समजावून घ्यायच्या होत्या. त्याशिवाय अलेक्झांडरने पुरूचा पराभव करून जर खरंच जगज्जेतेपद मिळवलं असेल तर तशी नाणी, पदके अलेक्झांडरची वस्त्रे, शस्त्रे, जिरेटोप, पादत्राणे, आभूषणे, ताम्रपट, सत्कार समारंभ, मेजवान्या यांचे काही ना काही स्मृतिविशेष मिळाले असते तर अलेक्झांडरच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले असते. डॉ. सैफूरना अंभीच्या राजमहालात याची उत्तरे मिळतील असा विश्वास होता.

अंभीच्या राजवाड्यात आक्रमणाच्या काळात दोन महत्त्वपूर्ण घटना घडल्या होत्या. अंभीने अलेक्झांडरला तक्षशिलेत सत्कार व मेजवान्या दिल्या होत्या. त्याला मैत्रीच्या सद्भावनेचे प्रतीक म्हणून २० टॅलंट म्हणजे १६०० किलो सुवर्णसाठा दिला होता. अलेक्झांडरला त्याला मिळालेल्या अशा स्वरूपातील भेटी सुरक्षित ठेवण्याचं एक ठिकाण हा राजमहालच होता. मग या भेटवस्तू वा विजयाप्रीत्यर्थ पाडलेली सुवर्ण वा

तत्सम धातुमिश्रित नाणी राजवाडा सापडल्यास तसा निष्कर्ष काढणे सोपे गेले असते. राजवाड्याचे अवशेष मिळाले पण अलेक्झांडरच्या विजयाचे एकही स्मृतिचिन्ह, नाणी, इतर वस्तू (फर्निचर, शिरस्त्राणे, तलवारी, भाले इत्यादी) त्यांना मिळाल्या नाहीत. याच महालात राजपुत्र अंभीने बहुधा चंद्रगुप्त मौर्याची भेट घडविण्याचा प्रयत्न केला होता. याचं एक कारण असं होतं - चंद्रगुप्त मौर्य, मगधाधिपती धनानंद याचा एक सेनाधिकारी पळून तक्षशिलेत आला होता. (बहुधा एप्रिल इ. स. पू. ३२६) व त्याला धनानंदाविरूद्ध आधी केलेल्या बंडाची पार्श्वभूमी होती. त्याला अलेक्झांडरकडून सैन्यमदत अपेक्षित असावी असा एक तर्क आहे. ही भेट झाली की नाही हे निश्चितपणे कुठे नोंदले गेले नाही, परंतु ग्रीक नोंद म्हणते की चंद्रगुप्त व अलेक्झांडरमध्ये काहीतरी बेबनाव निर्माण झाला व चंद्रगुप्ताला अचानक अलेक्झांडर त्याला ठार मारणार असल्याची जाणीव झाली. अशा परिस्थितीत चंद्रगुप्त त्या राजवाड्यातून वा छावणीतून जिवानिशी कसा सटकला हे एक गूढ अंभीच्या राजवाड्यातील अलेक्झांडरच्या वास्तव्यकाळाशी जोडले गेले आहे.

भीर टेकडीजवळून ताम्रनाला म्हणजे हारो या सिंधूच्या उपनदीचा नाला वाहतो. सैनिकांच्या राहुट्या युद्धकाळात अशा एखाद्या जलसाठ्याच्या आधारे उभ्या राहातात अशावेळी सैनिकांची शस्त्रे नेहमीच्या वापरातील वस्तू ढाली, तलवारी, भाले इत्यादी अशा ठिकाणी वा रणभूमीवर कित्येक शतकानंतरही इतरत्र सापडल्या आहेत. लाखभर सैन्य वा घोडदळ इथे वास्तव्याला सुमारे ५ महिने होते. परंतु राजवाडा वा ताम्रनाल्याच्या किनाऱ्याने अशा वस्तीच्या खुणा पुरातत्वज्ञानाला आढळल्या नाहीत. भीर टेकडी हेच तक्षशिला नंबर १ म्हणजे अलेक्झांडरकालीन तक्षशिला शहर होतं असं समजतात.

राजपुत्र अंभीच्या राजवाड्याला एक ऐतिहासिक महत्त्व अशासाठी आहे की, चंद्रगुप्तासारखा एक सेनाधिकारी तो सुद्धा मगध या प्रबळ राज्याचा स्वत:च्या राजाविरूद्ध सैन्याची मदत मागण्यासाठी अलेक्झांडरकडे स्वत:हून आला होता. नियतीने अलेक्झांडरला जगज्जेता बनण्याची एक संधी आपसूक दिली होती. मगध म्हणजे भारत असे तेव्हा समजले जाई. पण भडक डोक्याच्या अविचारी अलेक्झांडरला त्या घटनेचे महत्त्व कळले नाही. चंद्रगुप्ताला मदत करून अलेक्झांडर पाटलीपुत्र या मगधाच्या राजधानीवर हल्ला करू शकला असता पण त्यानं चंद्रगुप्ताला ठार मारण्याचा केलेला प्रयत्न बहुधा याच राजमहालात केला असावा. धनानंदाला

संपविण्याची आर्य चाणक्य व चंद्रगुप्ताची मूळ योजना यामुळे बाजूला पडली व अलेक्झांडरचा बीमोड आधी केला पाहिजे ही योजना पुढे आली.

पाक पुरातत्वाकडे राजपुत्र अंभीचा राजमहाल व ॲबॉटने काढलेली कारी रणभूमीची चित्रे. फोटोग्राफ्स व नकाशे असण्याची शक्यता आहे. हिंदुस्थान सरकारने ती मिळविण्याचा प्रयत्न करावा.

***

चंद्रगुप्ताचा ग्रीक घरोबा

सम्राट चंद्रगुप्त याचा विवाह ग्रीक राजकन्येशी झाल्यावर ज्या पुष्कलावती ते ताम्रुलिप्ती या म्हणजेच उत्तर पथ मार्गाने चंद्रगुप्ताचे वऱ्हाड आले तो दाखविणारा नकाशा. सध्याचा ग्रॅण्ड ट्रंक रोड हे याच मार्गाचे अवशेष रूप आहे.

सेल्युकस निकेटर इ. स. पू. ३०६ मध्ये अलेक्झांडरने घेतलेल्या मार्गानेच हिंदुस्थानवर चालून आला. अलेक्झांडर हिंदुस्थानातून पळाल्यानंतर (इ. स. पू. ३२५ ऑक्टो.) इथली सर्व जनपदे, टोळीराज्ये, चंद्रगुप्ताच्या साम्राज्यात विसर्जित झाली होती. सेल्युकसला हा फरक तत्काळ जाणवला. चंद्रगुप्त मौर्याच्या खड्या सेनेचा आकडा सहा लाखांवर व हत्तीदल ९००० झाले होते. हिंदुस्थानात शिरण्याचे सर्व मार्ग व खिंडी चंद्रगुप्तने कडेकोट बंदोबस्तात ठेवल्या होत्या. सेल्युकस व चंद्रगुप्त यांच्यात प्रत्यक्ष युद्ध झाल्याच्या ग्रीक वा हिंदुस्थानी नोंदी नाहीत. परंतु त्यांच्यात अचानक तह झाला. सेल्युकसने पूर्ण अफगाणिस्तान उत्तरेचा बॅक्ट्रिया हा ग्रीक प्रदेश व एकेकाळी पर्शियन साम्राज्यात सामविष्ट असलेले सिंध व पंजाब हे प्रांत ५०० हत्तींच्या बदल्यात चंद्रगुप्तच्या हवाली केले. हेच प्रदेश जिंकण्यासाठी अलेक्झांडर हिंदुस्थानावर चालून आला होता. सिंध व पंजाब जिंकले की आपण जगज्जेते होऊ ही धारणा त्यामागे होती. सेल्युकसही बहुधा हे सिद्ध करण्यासाठी परत चालून आला. अलेक्झांडरला इ. स. पू. ३२६ मध्ये हिंदुस्थानचा भूगोल परिचित नव्हता. इथल्या नद्या, दऱ्याखोरी १०,००० ते १७,००० फूट उंचीची शिखरे यांची काहीच जाणीव त्याला नव्हती म्हणून त्याची चढाई वाया गेली, असे म्हणता येईल. परंतु सेल्युकस स्वत: अलेक्झांडरबरोबर आधी हिंदुस्थानात याच मार्गाने आला. तो त्याच्याबरोबर पुरूबरोबरच्या युद्धात सहभागी झाला. त्याच्याबरोबर सिंधच्या मरूभूमीतून पळण्याची जीवघेणी पाळी त्याने अनुभवली होती. परत तीच चूक करण्यापेक्षा चंद्रगुप्तशी मैत्री जोडणे जास्त फायदेशीर ठरेल

हा विचार करून त्याने लढाई केली नाही व आपली एक कन्या (हेलन) त्याने चंद्रगुप्तला वा त्याचा पुत्र बिंदुसार याला विवाहात देऊन आपला मेगास्थेनीस नावाचा राजनैतिक प्रतिनिधी पाटलीपुत्रात चंद्रगुप्तच्या दरबारी नियुक्त केला. जॉर्ज वुडकॉकने Greeks in India नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. त्यात त्याने वायव्येकडील अशांत सीमा अशोकाच्या काळात शांत राहिली याचं एक कारण हा विवाह कारणीभूत असावा, असं त्यानं म्हटलं आहे. चंद्रगुप्तच्या या विवाहाची घटना मजेशीर आहे. चंद्रगुप्त व सेल्युकस यांच्या तहाच्या वेळीच म्हणजे तक्षशिलेत हा विवाह संपन्न झाला. चंद्रगुप्तची राजधानी मगधात म्हणजे आजच्या बिहारमध्ये पाटणा (पाटलीपुत्र) येथे होती. हे अंतर १६०० कि. मी. आहे. आजही शाही विवाहात २-३ हजार माणसांची गर्दी होते. लगेच विवाह लागला असेल असं म्हटलं तरी वऱ्हाडाची १०,००० ते १५,००० मंडळी दोन्ही पक्षांची असतील. त्यानंतर ग्रीक राजकन्येला घेऊन सम्राट मंडळी पाटलीपुत्राकडे रवाना झाली. कितीतरी रथ व बैलगाड्यांसह त्यांनी उत्तर पथाने (आजचा ग्रॅण्ड ट्रंक रोड) पाटण्याला कूच केले. चंद्रगुप्त व आर्य चाणक्याने जीवाची घोडदौड करीत ४० दिवसांत हे अंतर इ. स. पू. ३२६ मध्ये (एप्रिल) पार केले होते. वऱ्हाडी मंडळी रमतगमत परतीच्या मार्गाला लागली असतील, मध्ये कुठे ना कुठे मुक्काम करती झाली असतील. त्यांना प्रथम पाटण्याहून तक्षशीला व तेथून परत पाटणा असा ३२०० कि. मी. प्रवास करण्यासाठी किती वेळ लागला असेल ? अंदाज करा. अश्वपरीक्षक म्हणतात एक घोडा त्याला नीट दाणा वैरण व खुराक दिला तर दिवशी ३० ते ४० कि. मी. धावू शकेल. पण त्यानंतर त्याला परत धावते करण्यासाठी पूर्ण एक दिवस विश्रांती घ्यावी लागते. बैल १५ ते २० कि. मी. धावू वा चालू शकतो. म्हणजे परतीचा चंद्रगुप्त व त्याच्या वऱ्हाडाचा काळ सहज ३ ते ४ महिने होईल. पूर्वी रस्ते नीट नसत म्हणजे हे मार्गक्रमण या वऱ्हाडाला किती कष्टाचे झाले असेल ?

***

घोड्याची निपज

युद्धात वापरले जाणारे घोडे आग व आवाज यांना घाबरू नयेत म्हणून खास शिक्षित करण्याची प्रथा अनादी काळापासून चालू आहे. असे घोडदळच युद्धात शत्रूवर चालून येऊ शकते. युद्धात विजय मिळो वा पलायन करण्याची वेळ येवो, घोडा किती लांबचा पल्ला थोड्या वेळात गाठू शकतो यावर त्याच्या धन्याचे यश अवलंबून असते. असे घोडे उंच व बळकट असतात. घोडा हे कुत्र्यासारखेच इमानी जनावर आहे. त्याला आपल्या धन्याचे प्राण वाचवण्याचे ज्ञान उपजत असते, पण प्रशिक्षित घोडे अशावेळी एकट्याने वा संघटितपणे शत्रूवर चालून जाण्यास कचरत नाहीत. जातिवंत घोडे निर्माण करण्याची निकड सर्वच राष्ट्रांना पूर्वापार माहीत होती. घोड्यांची निपज व वर्णसंकर या गरजेपोटी करण्याची प्रथा नंतरच्या काळात अस्तित्वात आली. घोड्याबरोबर खेचर व गाढवांचा उपयोग इतिहासात वेळोवेळी झाला आहे. घोडा शिस्तप्रिय व वेगाने पळणारा प्राणी असला तरी पर्वतातील खिंडी व उंच दऱ्याखोरी यातल्या चिंचोळ्या मार्गातून घोड्यांना वापरताना अनेक अडचणी येत. खेचरे व गाढवे अशा वाहतुकीला अधिक उपयुक्त पडत. विशेषत: अशावेळी खेचरांचा उपयोग प्रामुख्याने केला जाई. खेचरामध्ये घोड्याचा इमानीपणा व शिस्त अंगभूत असते, तर गाढवाचा काटकपणा खेचरात आपोआप उतरतो. त्यांना घोड्यासारखा प्रमाणित खुराक दिला जात नाही. खेचर हा घोडा (नर) व गाढव (मादी) याच्या संकरातून निर्माण होतो. परंतु अशा उत्पादित वर्णसंकरातून नंतर प्रजोत्पत्ती होत नाही.

युद्धात उंच जागी वाहतुकीला खेचरे व सपाटजागी बहुधा गाढवे वापरतात. ते जास्त सुटसुटीत पडते. घोडा लांब पल्ल्याच्या घोडदौडीसाठी व युद्धात वापरला गेला.

मुद्दाम निपजलेल्या घोड्याला १४ पौंड गवत, १२ पौंड धान्य (ओटस्, बार्ली, हरभरे) व भरपूर पाणी ठराविक वेळी देण्याची प्रथा आहे. पण वाहतुकीसाठी वापरले जाणारे घोडे धन्याच्या मर्जीप्रमाणे खाऊ घातले जातात. घोडे, खेचरे व गाढवे कुठल्याही हवामानात तग धरून मार्गक्रमण करतात. बैलाची बोजा सांभाळण्याची क्षमता सर्वात जास्त

असली तरी पळण्याची क्षमता कमी असते. त्यामुळे बैलांचा वाहतूक उपयोग शांततेच्या काळात झाला असे इतिहासात आढळले आहे.

***

पुरूचे नेतृत्व

पुरू व अलेक्झांडरची तुलनाही करणे चुकीचे आहे. पुरू इथलाच राजा होता. त्याला इथले हवामान, सीमा, समाज, स्वत:चे सैनिकी सामर्थ्य, युद्ध कौशल्य याबद्दल पूर्ण ज्ञान होते. (भाग - ३)

पुरू अलेक्झांडर युद्धाला एक वेगळाच संदर्भ आहे. या संदर्भातील नोंद पाश्चात्यांकडील नोंदीत सापडणार नाही. २३३६ वर्षांपूर्वी आर्य चाणक्य नावाचा एक विद्वान भारताच्या अंतर्गत व बाह्य सुरक्षिततेसाठी एक छत्री अंमल इथे निर्माण करण्याचे स्वप्न पाहात होता. त्यावेळीही मगध हे पूर्वी भारतातले एक प्रबळ राज्य होते. आंतरराष्ट्रीय स्थरावर मगध म्हणजे भारत असे समजले जाई.

अलेक्झांडरचे शिक्षण, राजशिष्टाचार, शौर्य, भौगोलिक ज्ञान, त्याची कार्यकुशलता, त्याचे औदार्य, धडाडी या गुणांचे विश्लेषण केवळ भारताच्या १८ महिन्यांचा इतिहास तपासला तरीही एकाही गुणाचे पालन त्यानं केलेलं नाही हे सांगणारे २० प्रसंग आहेत किंवा घटना आहेत. अलेक्झांडरची कुठल्याही व्यक्तिमत्त्वाशी (नेपोलियन, शिवाजीमहाराज, फिलीप २ रा तुलना होऊ शकणार नाही.) अलेक्झांडर हे असे एकच व्यक्तिमत्त्व आहे ज्याने २१००० मैल प्रदेश पायदळी तुडवला. ३२ वर्षातली आठ वर्षे म्हणजे १/४ आयुष्य युद्धे करून केवळ भारतातच ४ ते ५ लाखांचे हत्याकांड घडवून आणले. याच्या दुप्पट माणसे त्यानं मध्य आशिया, आफ्रिका (इजिप्त) व स्वदेशात ठार मारली असावीत.

जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा त्यानं जरूर बाळगली, परंतु ते त्याला जिंकता आलं नाही. अंभी, पुरू, आर्यचाणक्य, चंद्रगुप्त मौर्य यांनी त्याला पंजाबात रोखले नसते तर, मात्र तो मगधापर्यंत पोहोचू शकला असता व पाटलीपुत्रात त्यानं जगज्जेता म्हणून नव्याने स्वत:ला सार्वभौम सम्राट म्हणून जाहीर केले असते.

हे युद्ध पुरूचे एकट्याचे नव्हतेच. अलेक्झांडरने ज्यांना ज्यांना

विस्थापित केले, ठार मारले, राजकुळातील स्त्रियांवर बलात्कार केले अशी राजकुलीन व सर्वसामान्य पीडित प्रजा यांना त्यांचे पुनर्वसन पुरूच्या विजयात दिसले म्हणून त्यांनी त्याचे नेतृत्व मान्य केले असं तत्कालीन कौटिलीय अर्थशास्त्र व महावंशटीका या ग्रंथांमुळे कळू शकते. अर्थशास्त्रातील युद्धनीती, प्रशासन, व्यवस्थापन यांची प्रकरणे हा एक प्रकारे या युद्धाच्या काळाचा परामर्ष आहे. पुरू व अलेक्झांडरची तुलनाही करणे चुकीचे आहे. याची स्पष्ट कारणे अशी आहेत - पुरू इथलाच राजा होता. त्याला इथले हवामान, सीमा, समाज, स्वत:चे सैनिकी सामर्थ्य, युद्धकौशल्य याबद्दल पूर्ण ज्ञान होते. अलेक्झांडरचे भौगोलिक अज्ञान त्याला सिंध पंजाबची तक्षशीलेत ५ महिने मुक्काम करूनही कसलीही माहिती तो मिळवू शकला नाही.

बाल्ख ते पेशावर या ४०० मैलांच्या परिसरात वावरणाऱ्या टोळ्यांशी लढण्यात त्याचे वर्ष गेले. परत सिंध वाळवंट पार करण्यात आणखी १० महिने यात त्याच्या सैन्याची नासाडी इतकी झाली की बॅबिलॉनला एप्रिल २२३ इ. स. पूर्वमध्ये पोहोचला तेव्हा फारच थोडे मॅसिडोनियन सैनिक त्याच्या बरोबर होते. भारतात डास चावल्याने त्याला अनाकलनीय आजार झाला. अतिमद्यपान व सततची पळापळ, त्यातच त्याच्या फौजेतली सारखीच उद्‌भवणारी भांडणे, कटकारस्थाने यामुळे त्याला लिव्हरचे दुखणे, उलट्या यांचा त्रास शेवटच्या काळात झाला. त्याला भारतात असतानाच्या काळात स्वत:चा पराभव स्पष्ट दिसू लागला. हस्ती (मसाग) मल्लोई या लढायात त्याच्या अनावर वागण्याने त्याच्या प्राणावर बेतले. आक्रमणापासून पलायनाच्या दीर्घ काळात त्याचे नेतृत्व, शिस्त, प्रशासन, विद्वत्ता, उमदेपणा, उत्तरदायित्व न दिसता, क्रौर्य, कपटी स्वभाव, संशयी वृत्ती, बेपर्वाई याचेच वारंवार दर्शन घडत राहिले. पुरू मात्र संयमी, ठाम, दृढनिश्चयी, बाणेदार, युद्धाच्या डावपेचात सरस ठरला. अलेक्झांडरचे आव्हान स्वीकारल्यावर विजयासाठी त्याने ५ महिने रणभूमीवर काढले. ऐन पावसाळ्यात तो डोळ्यात तेल घालून फौजेच्या हालचालींवर लक्ष देत असे. जनावरांसाठी कडबा, सैन्याचा शिधा यावर त्याचे लक्ष केंद्रीत झाल्याने त्याच्या सैन्याची इच्छाशक्ती व कार्यतत्परता कायम राहिली. अलेक्झांडरच्या सैन्यासारखा अडथळा व थकवा यांना तोंड देण्याची पाळी त्यांच्यावर आली नाही.

अलेक्झांडर खरोखरी मुत्सद्दी असता तर चंद्रगुप्ताला हाताशी धरून त्याला अपेक्षित असलेल्या सैन्याची मदत घेऊन मगधसम्राट धनानंदाची

उचलबांगडी करता आली असती व जगज्जेतेपणाचे स्वत:चे स्वप्न साकार करण्याची संधी जी आयतीच त्याच्यासमोर नियतीनं आणून दिली होती ती वाया गेली. गरम डोक्याच्या अलेक्झांडरचा हा उतावळेपणाच भारताच्या मोहिमेत दिसून येतो. हा प्रसंग घडला व चंद्रगुप्त आणि आर्य चाणक्य यांची धनानंदाचा उच्छेद करण्याची मूळ कल्पना काही काळ बाजूला पडली वा तसे करणे त्यांना भाग पडले व अलेक्झांडरचे समूळ उच्चाटन करणे याला अंभी, अभिसार, पुरू व पराभूत आणि विस्थापित यांनी त्यास अग्रक्रमाने प्राधान्य दिले. अलेक्झांडर भारतावर आक्रमण करून आल्याची बातमी मगधसम्राट धनानंदाला निश्चितच असेल. बिआस नदीपलिकडे त्याच्या राज्यांची सीमा सुरू होई. त्याचे साम्राज्य भ्रष्टाचारामुळे खरेतर डबघाईला आले होते. त्याचे सैन्य व हत्तीदल सामर्थ्यशाली असूनही त्याच्या जुलमी राजवटीला त्याची प्रजा कंटाळली होती. अलेक्झांडरला पुरूचा अडथळा झाला नसता तर कदाचित धनानंदाचाही पराभव करणे त्याला शक्य झाले असते, परंतु अलेक्झांडरचे सैनिकीबळ झेलम किनारीच नष्ट झाले (प्लूटार्च) ' The batle with Porus (Puru) depressed the spirit of Macedonians and made them unwilling to advance further in India. '

प्लूटार्चची ही नोंद अलेक्झांडरचे जगज्जेतेपण पुरूच्या लढाईत त्याच्यापासून दूर गेल्याचा स्पष्ट पुरावा आहे. हे युद्ध जर इथेच निकाली ठरलं असेल तर अलेक्झांडरचा पुढचा भारतातला मुक्काम कथित लढाया पुरू, अंभी, अभिसार आदी राजांना क्षत्रप म्हणून दिलेल्या सरकारी नोकऱ्या व त्यांनी त्यांच्यासाठी केलेले पराक्रम या नोंदी खऱ्या कशावरून ? ज्यांचे पुत्रपौत्र युद्धात मारले गेले, राज्ये गेली, ज्यासाठी ते लढले, ते त्याचे क्षत्रप म्हणून त्यांची नोकरी चतकोर जमीन मानमरातबासाठी का स्वीकारतील ? ग्रीकांनी लिहिलं पाश्चात्यांनी मुख्यत: ब्रिटिशांनी त्यांच्या साम्राज्यशाहीला पोषक म्हणून ते स्वीकारलं, आमचं काय ?

***

जगज्जेता...?

पुरू आणि अलेक्झांडर यामध्ये जगज्जेता कोण ? जाणून घेऊया काळाआड दडलेला इतिहास !

जगामध्ये सर्वाधिक साहित्य अलेक्झांडरवर लिहिले गेले. डॉक्युमेंटरीज आणि फिल्म्स निर्माण झाल्या. त्या सर्वांचा विषय एकच - अलेक्झांडर जगज्जेता कसा झाला जिंकायला भूप्रदेश शिल्लक न राहिल्याने म्हणे तो रडला. त्याने कुठल्या लढाईत विजयश्री खेचून आणली ? त्याची व्यसने ही सुद्धा पाश्चात्यांनी त्याच्या उदात्तीकरणाला वापरली. तो तत्त्ववेत्ता, विद्वान, शूर, उदार, राजकारणी होता अशी विशेषणे पाश्चात्यांनी अलेक्झांडरला लावली. अवघ्या ३२ वर्षांच्या आयुष्यात त्याने बॅबिलॉन ते बॅक्ट्रिया, बॅक्ट्रिया ते पंजाब व सिंधचा प्रदेश आणि युरोपात मॅसिडोनिया, ग्रीस, आफ्रिकेत इजिप्त व भारतात पंजाब व सिंधपर्यंत त्याने मजल मारली.

हा खरा इतिहास असता तर आम्ही त्याला जगज्जेता म्हणून मानले तरी चालले असते. पण तसे काहीच झालेले नसताना आम्ही त्याला जगज्जेता म्हणून का डोक्यावर घ्यावे ? स्वतंत्र भारतात साठ वर्ष उलटून गेल्यावरही आमच्याजवळ इस्रो, बीएआरसी, सरस्वती संशोधन प्रकल्प, पुरातत्त्व, अंतराळ उपकरणे असूनही कारी या रणभूमीचा साधा नकाशाही ना आपण बनवू शकलो ना मिळवू शकलो. रामसेतूची तोडफोड वा जोड यांची उजळणी गेल्या दहा वर्षांत इतक्यावेळा झाली की नक्की आता या विषयावर सांगण्यासाठी नवे काय आहे हे समजणे जरूरीचे आहे.

अलेक्झांडर हा वंशपरंपरेने फिलीप दुसरा याच्या खुनानंतर राज्यावर आला. फिलीपने ठेवलेले राज्य, संपत्ती, सैन्य याची व सम्राट या उपाधींची प्राप्ती त्याला सहजासहजी झाली. परंतु राज्याभिषेकाअगोदरच म्हणजे केवळ २० व्या वर्षी सर्व व्यसनांच्या आहारी गेलेला, उद्दाम, बेदरकार, वाया गेलेला अशी अनेक दूषणे ग्रीकांनीच त्याला दिली आहेत. स्कॉटलंड यार्डने त्याच्या मृत्यूसंबंधी सन २०००-०२ या काळात संशोधनाला सुरूवात करून बी. बी. सी. व डिस्कव्हरी चॅनेलने या संदर्भात डॉक्युमेंटरी तयार केली. त्यापूर्वी अनेकांनी त्याच्यावर आपापली संशोधने

करून मते मांडली. सध्या ही मते दोन मतप्रणालीत विभागली जातात.

१) अलेक्झांडरवरचे लिखाण अतिरंजीत आणि पूर्णतया खरे नाही.

२) तो पुरूला हरवून व भारतातील जिंकलेल्या प्रदेशाची नीट व्यवस्था लावून नाणी पाडून विजयोत्सव साजरे करीत खुष्की व समुद्रमार्गे बॅबिलॉनला परतला.

स्कॉटलंड यार्डने नव्याने केलेल्या व टीव्हीवरून त्यांनी दाखविलेल्या एपिसोडस्‌मध्ये त्याच्या भारतातील अठरा महिन्यांच्या वास्तव्याचा कुठेही उल्लेख झाला नाही. अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि भारतातील पंजाब व सिंध या मार्गाने (गेट्रोसिया) खुष्की व समुद्रावरील त्याच्या हजार ते पंधराशे किलोमीटरचे चित्रण बीबीसीने दाखवलेले नाही. ते त्यांनी का टाळले हे बहुधा भारतातील संबंधित खाती, विश्वविद्यालये अथवा इतिहासकारांनी नंतर विचारलेही नसावे. एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून याचं उत्तर भारताला विचारण्याचा हक्क नाही काय ?

आपल्याकडे ज्या संशोधकांनी व नेत्यांनी अलेक्झांडरच्या भारतीय मोहिमेवर संशोधन केले त्यात स्वातंत्र्यवीर सावरकर, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. परमेश्वरी लाल गुप्ता, डॉ. फडके, डॉ, बोधनकर व पाकिस्तानी पुरातत्त्वज्ञ डॉ. अहमद हसन दाणी व डॉ. सैफूर रहमान दार ही प्रमुख नावे आहेत. इतरही अनेकांनी संशोधन केलेले आहे.

निदान त्याच्या इथल्या जानेवारी इ. स. पू. ३२६ ते २५ ऑक्टोबर इ. स. पू. ३२५ या काळापर्यंतची माहिती सर्वेक्षणे, नोंदी, पेपर्स वा त्यासंबंधी संशोधकांनी स्वतंत्रपणे लेख लिहिले असले तर त्यांच्या झेरॉक्स प्रती असल्यास मला आणखी संशोधनासाठी उपयोग होईल.

कौटिल्य उर्फ आर्य चाणक्य हा अलेक्झांडरच्या आक्रमण काळात त्या आधी व नंतर अशी एकूण १८ वर्षे तक्षशीलेत वास्तव्याला होता. परंतु त्याने अलेक्झांडरचा त्याच्या इथला १८ ते २० महिन्याच्या युद्धे, पराक्रम, वास्तव्य याचा कुठेही उल्लेख का केला नाही ? ज्या ग्रीक इतिहासकारांनी अलेक्झांडरच्या पराक्रमाचा सतत उल्लेख केला. त्यांना आर्य चाणक्य या नावाच्या कुणाही व्यक्तीचा उल्लेखही का करावासा वाटला नाही ? ह्या दोन्ही परस्पर विरोधी घटनांकडे दोन्ही बाजूंनी मौन पाळण्यासारखं काय कारण होतं ?

***

हिंदुस्थानी संगीत

सर्व संगीतांचा मूलस्रोत हिंदुस्थानी संगीत आहे. हिंदुस्थानी संगीताची परंपरा २५०० वर्षे आहे. हिंदुस्थानचा आद्य संगीतकार भरतमुनी यांना समजतात.

हिंदुस्थानी संगीताची परंपरा २५०० वा त्याहून अधिकपर्यंतच आहे हे १७४६ साली तुर्कस्तानचा सुलतान याने मुद्दाम त्या देशाची परंपरा शोधण्यासाठी करवून घेतलेल्या संशोधनामुळे कळू शकले. त्याचा राजगायक असलेल्या अब्बू हमीर समई याला त्याने तुर्की संगीत कुठून पैदा झाले याचा शोध घेण्यास सांगितले. अब्बू हमीरने अनेक देशांची सफर केली. बहुधा तो हिंदुस्थानातही आला व अनेक श्रेष्ठ संगीत तज्ज्ञांना भेटला असावा. ' मकदबे सुलतानिया ' हा त्याचा गाजलेला संगीतग्रंथ आहे. त्यानं त्यात असं स्पष्टपणे म्हटलंय की तुर्की वा अरब संगीत मुळातले हिंदुस्थानी संगीतच आहे. ते राग आणि रागिण्यांवर आधारित आहे. तबकाउल उमम् (१० वे शतक) या दुसऱ्या अरेबिक ग्रंथात हेच सांगितले आहे. भरतमुनी कश्मीरमधल्या नीला खोऱ्यात शारदाश्रम या ठिकाणी निर्माण झालेल्या विश्वविद्यालयात संगीत शिकवीत. त्यांनी बारा स्वर (सात शुद्ध व पाच कोमल) व प्रत्येक दोन स्वरातील आवर्तने जास्तीत जास्त २२ असतात हे शोधून काढले. या २२ आवर्तनांना श्रुती म्हणून आज संगीत शास्त्रात ओळखले जाते. डॉ. विद्याधर ओक यांनी यावर संशोधन करून २२ श्रुतीसह एक नवे हार्मोनियम (मेलोडियम) प्रचारात आणले आहे. संगीताचे भरतमुनी पुरस्कारित संगीत शिकविणारी शारदा पीठम व तक्षशिला ही दोन आद्य विद्यालये झाली जिथे वीणा व तबला शिकवला जाई. मूळ सामवेदातील ऋचा आरोह, अवरोहात म्हणण्याची परंपरा अशी प्राचीन आहे.

***

अजंठ्यातली विज्ञाने

पाश्चात्यांच्या एका दृष्टिकोनाची दाद आपण घेतली पाहिजे. हजार वर्षे अज्ञात राहिलेल्या अजंठा गुफांमध्ये काय गूढ आहे ही जाणीव ब्रिटिशांना अजंठ्याचा शोध लागल्यापासून निर्माण झाली. हे गूढ म्हणजे चमत्कार नसून ३१ गुंफातील रंग, रचना ताजीतवानी का राहिली. या मधल्या दोन गुंफा अर्धवट का राहिल्या, का पूर्ण करता आल्या नाहीत. व सर्वात महत्त्वाचे म्हणजे २००० वर्षामागील चित्रमालिका प्रत्यक्षात उतरण्यामागे काय विज्ञाने दडली आहेत, हे जाणून घेण्यासाठी १९०९ ते १९११ मध्ये लेडी हेरिंगहॅम व डोरोथी लार्चर या पुरातत्त्वज्ञ फोटोग्राफर व चित्रकार अशा तीनही शास्त्रांत पारंगत असलेल्या स्त्री शास्त्रज्ञाना अजंठ्याला पाठवले.

त्या दोघीही फर्दापूर गेस्ट हाऊसवर राहिल्या. आल्या आल्या त्यानी सर्व लेण्या व परिसर हिंडून त्यातली त्यांच्या दृष्टीने महत्त्वाची पॅनेल्स निवडली. सर्व चित्रमालिका २ वर्षात चित्रीत वा छायाचित्रित करणे केवळ अशक्य आहे हे त्यांच्या लक्षात आले. बरोबर त्यावेळचे उत्कृष्ट कॅमेरे, स्टँड व चित्रमालिकांच्या जास्तीत जास्त जवळ जाणे शक्य व्हावे म्हणून उभे राहताना अडचण होणार नाही अशा शिड्या त्यानी आणल्या. लेडी हेरिंगहॅमच्या असं लक्षात आलं की भिंतीवरची चित्रे कॅनव्हासवर रेखांकित करणं सोपं आहे. परंतु अंधारात असलेली तशीच चित्रे वीज उपलब्ध नसल्याने तशीच्या तशी उतरवणे वा समजून घेणे सोपे नाही. तेही एकवेळ जमेल परंतु उंचावर तक्तपोशीवर रेखाटल्या चित्राचं काय ? ती कशी काढायची ?

हजारो वर्षांपूर्वी (२००० वर्षांपूर्वी) चित्रकारांनी ती कशी काढली असतील, रंगवली असतील, प्रकाश कुठून कसा आणला असेल ते तिला कळेना. तिने खूप मेहनत घेऊन पूर्वीच्या नोंदी तपासल्या. त्या काळी ब्राँझचे आरसे वापरीत. ते ढकलगाडीवर बसवीत. सूर्यप्रकाश पाहिजे तसा वळवून घेण्यासाठी २ हजार वर्षांपूर्वीच्या कारागिरांनी गुंफांसमोर हौद खोदून तो काठोकाठ पाण्याने आधी पूर्णपणे भरण्याची व्यवस्था केली होती. सूर्याच्या विशिष्ट कोनात पडणाऱ्या प्रकाशाचे पाण्यामुळे परावर्तन होई. तो परावर्तित प्रकाश केंद्रित करण्याचे व हव्या त्या दिशेला वळविण्याचे काम त्यामुळे सोपे होई. असे कवडसे अंधाऱ्या जागांवर केंद्रित करण्याचे त्या कारागिरांचे कसब लेडी हेरिंगहॅमने जाणून घेतले. तितक्या उंचीचे व फिरवता येणारे आरसे आणण्याची व्यवस्था झाली. प्रात्यक्षिके घेऊन कामगारांना प्रशिक्षित केले गेले. २००० वर्षांपूर्वीचे कारागीर जसे वागले असतील तसे ट्रेनिंग कामगारांना आधी दिले गेले. आवश्यक त्या प्रकाशासाठी वेगळ्या आकारांचे आरसे ठराविक ठिकाणी लावून पुन:पुन: परावर्तन खेचण्याची व्यवस्था झाली.

हे करण्याची गरज तिला का भासली ? टॉर्च वा लॅन्टर्न्सचा उपयोग जास्त परिणामकारी व सोपा नसता का झाला ? याचे तिला उमजलेले कारण असे होते. टॉर्चचा उपयोग पाहिजे तेवढा स्थिर करण्यात आडवे पडल्यावर अडचणी येत होत्या. लॅन्टर्न्स लवकर तापत व त्याचा धूर तिथे घुसमट निर्माण करी. तो त्वरित बाहेर काढण्यासाठी तिथे खिडक्या नव्हत्या. पूर्वीच्या कारागिरांनी सूर्यप्रकाशच का निवडला याचं उत्तर तिला मिळालं. पर्यायी व्यवस्था करणे २० व्या शतकातही तिला शक्य झालं नाही.

२९ गुंफांची रचनाही सरळ समांतर नव्हती. वर-खाली अशा स्वरूपात घोड्याच्या नालाच्या आकारात त्या कोरण्यात व रंगविण्यात आल्या होत्या. त्यांचे प्लॅस्टरिंग व त्यावरची चित्रे याना धक्का न लावता चित्रे रेखांकित करणे वा छायाचित्रित करण्यामध्ये चित्रमालिकांची उंची व प्रकाश योजनेचे तंत्र यांची सांगड जमेना. लेडी हेरिंगहॅमने शेवटी पातळ बटर पेपर चित्रांवर चिकटवून त्यावर हलक्या हाताने लेड पेन्सिलने तिने आधी रेखांकने काढून घेतली. त्या त्या पॅनेल रेखांकनावर तिने नंबर्स घातले. मूळ चित्रकृती कुठल्या रंगात शेडस्सहित तिला समजल्या याची टांचणे तिने तयार केली. त्यांचा क्रम लक्षात घेतला व एक एक बटर पेपर कॅनव्हासवर आधी कोरून घेतली व मग दोघींनी त्यात स्वत:च्या ब्रशांनी रंगकाम केले. ब्रिटिश शासन यंत्रणा पाठीशी असल्याने त्याना हिंडणे फिरणे

यासाठी वाहने मिळत गेली. स्वत:साठी वेगळा खर्च करावा लागला नाही.

लेडी हेरिंगहॅम व डोरोथी लार्चर यांनी त्यांच्या सात सहकाऱ्यांसह फार मेहनत व चिकाटीने जी चित्रे पूर्ण केली ती संख्येने जास्त नाहीत. कारण त्याना मिळालेला अवधी फक्त दोन वर्षांचा होता. मूळ चित्रकारांनी २९ गुंफा खोदून व नंतर प्लॅस्टरिंग व रंगकाम करण्यात ८०० वर्षे घालवली होती. लेडी हेरिंगहॅमने यावरून स्वत:चे काही ठोकताळे बसवले. त्यांवरून हे काम पिढ्यान्‌पिढ्या चालू होते. चित्रकार रंगकर्मी, शिल्पी, सिव्हिल इंजिनियर्स, आर्किटेक्टस्, इंटिरियर डिझायनर्स, सुतार अशा विविध थरातील शेकडो कारागिरांनी येथे इतकी वर्षे काम कसे केले, कुणी त्याना मार्गदर्शन केले ? त्यावेळी शेकडो हजारोंच्या संख्येने कारागीर कसे उपलब्ध झाले हे एक गूढ आहे.

हैद्राबादच्या सफदरजंग म्युझियममधल्या ग्रंथालयात याझदानींचे चार खंड जपून ठेवले आहेत. ते निझामाचे खास सल्लागार व पुरातत्व प्रमुख होते. त्यानी अजंठ्याच्या गुंफातील प्रत्येक चित्राचे व पॅनेलचे छायाचित्रण करवून घेतले. अनेक महत्त्वाच्या चित्रकृतींचे कॅनव्हास चित्रिकरण तयार करून घेतले. त्यातील चित्रे व छायाचित्रण हे एक परिपूर्ण वैज्ञानिक इति संकलन आहे. त्यात चित्रांतले मूळ रंग, उत्पन्न झालेल्या छटा याची माहिती मिळते. अजंठ्याचा दगड लाव्हा रसापासून झालेला बसाल्ट रॉक आहे व अजंठ्याच्या डोंगरातला बसाल्ट रॉक शिल्पाना उठाव देणारा उत्कृष्ट दगड आहे. या दगडाचं वैशिष्ट्य डॉ. याझदानीनी सांगितलं आहे. एक तर हा दगड टणक आहे, त्यावर काम करणाऱ्या कारागिराला त्याच्या कलाकृतींना मूर्त स्वरूप देण्यासाठी स्वत:चं कसब वापराव लागतंच. पण छोटीशी चूक सबंध कलाकृतीचे सौदर्य बिघडवून टाकते. एकाच डोंगर स्थरातले बसाल्ट रॉक सारख्याच स्वरूपाचे नसतात. काही ठिसूळ असतात. अशा ठिसूळ दगड कोरणाऱ्या कारागिराना आधी त्याची कल्पना येत नाही. अर्धवट काम करताना दरडी कोसळतात. यामुळेच अजंठ्याच्या दोन लेण्यातले काम त्या कारागिरांना सोडणे भाग पडले.

मारूती पिंपरे पेशाने फोटोग्राफर आधीही ते औरंगाबाद विश्वविद्यालयात फोटोग्राफर होतेच. पुरातत्व खात्याने त्याना विश्वविद्यालयातील नोकरीतून स्वत:च्या बाह्यचित्रण व मुख्यत्वे अजंठ्यात येणाऱ्या पर्यटकांचे मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित केले. त्यांच्यासारखा इतिहासाचा अभ्यासक फोटोग्राफर नव्हता. त्यानी ४० वर्षे हेच काम केले. शेकडो वेळा ते तिथे जात, मार्गदर्शन करीत. प्रसंगी मुक्काम करून

पुरातत्वाची अजंठा पॅनेल्स तयार करीत. त्यांच्या बरोबर मी अजंठ्यात फिरलो आहे. त्यांनी तयार केलेल्या चित्रांची प्रदर्शने मी पाहिली आहेत. तिथे शांत बसून एकाग्रपणे रेखाटन करणाऱ्या पिंपऱ्यांचे मनन, चिंतन मी अनुभवले आहे.

पिंपऱ्याना त्यांचे पूर्वज शालिवाहन (सातवाहन) राजांचे चित्रकार होते असा विश्वास आहे. अनेक देशी परदेशी कला संस्थानी त्याना आपल्याकडे काम करण्यासाठी बोलावले. प्रलोभने दाखवली. परंतु पिंपऱ्यांनी त्यांच्या या विश्वासापोटी अजंठा सोडले नाही. त्यांच्या चित्रप्रदर्शनातील पॅनेल्स अजंठ्यातल्या मूळ चित्राला समोर ठेवून काढलेल्या रेखाकृती आहेत. मारूती पिंपरे पुरातत्वातून रिटायर झाल्यानंतर आपली चित्रे त्यांच्या घराच्या छोट्या जागेत जेवढ्या आकर्षकपणे ठेवता येईल अशा स्वरूपात केवळ जिज्ञासूनाच ती दाखवतात. अजंठ्याचा चालता-बोलता एन्सायक्लोपिडिया ह्याच बिरूदावलीत परिचित असलेले पिंपरे अत्यंत साधे, निगर्वी आहेत. जे जे स्कूल ऑफ आर्ट मुंबईमधून बाहेर पडलेले पिंपरे कुठेही न जाता अजंठ्याला आले. माझ्या चित्रकलेचे उगमस्थान शालिवाहनांच्या २००० वर्षांपूर्वीच्या कलाश्रयात आहे. त्यामुळे माझी सेवा अजंठ्याचे मनन, चिंतन आणि रेखाटनात आहे. बस् याहून काय हवे ?

याझदानीचे चारही खंड मी सफदरजंग वास्तू संग्रहालयात आठ दिवस बसून वाचले आणि अजंठ्याचे चित्रावलोकन माझ्या मनावरही कायम उमटले. एकेक खंड जवळजवळ १००० पानांचा असेल. सर्व पॅनेल्स चित्ररूपाने संग्रहित करणाऱ्या या माणसाने अजंठा चित्रावलीत व त्यातली विज्ञाने अचूक हेरण्यात आयुष्यातली किती वर्षे व्यतीत केली असतील देव जाणे.

प्राचीन चित्रकला, नृत्य, संगीत व विज्ञानांचा सहजाविष्कार हजारो वर्षे भारतात टिकला. संग्रहित झाला. वत्सगुल्म प्रतिष्ठान ही सातवाहनांची परंपरा जरी असली तरी हे कौशल्य, हा वारसा आला कुठून याचा मी ज्यावेळी विचार करतो त्यावेळी मला वेदकालीन आश्रम, शाळा, जनपदे, तक्षशिला, शारदापीठ (शारदी) आता दोन्ही पाकिस्तानात गेली. गौतमबुद्धाचे धनुर्विद्या शिकत असतानाचे एक शिल्प आहे तर दुसरे योगाविष्कारात क्षमायाचना करणाऱ्या कमनीय नर्तिकेचे (अजंठा) आहे. तक्षशिलेपासून दक्षिणपथ उज्जयनी भृगकच्छ (भडोच) शुर्पारक (नाला सोपारा) प्रतिष्ठान (पैठण) पर्यंत सरकत गेला. पाणिनी-मौर्य-वाकाटक-

गुप्त-सातवाहन यामार्गे ही कला महाराष्ट्रात रूजली व त्याचे श्रेय सातवाहनाकडे जाते. सातवाहनाचा इतिहास अथ पासून इतिपर्यंत जाणून घ्यायचा असेल तर तुम्हाला औरंगाबादला डॉ. मोरवंचीकरना भेटावे लागेल.

प्राचीन विज्ञानाचा इतिहासात एकत्रित उपयोग दाखविणारे ठिकाण अजंठा आहे. ज्याची विज्ञान परंपरा २००० वर्षांपासूनची आहे हे कसं कळलं ? जागेच्या मर्यादेत हे सर्व एका वेळी सांगणे कठीण आहे. बसाल्ट दगडाचा शिल्पासाठी उपयोग व अजंठा डोंगरांची योजना, तिथे मिळणारे पांढरे उदी भगवे लाल रंगांचे दगड हे जाणणारे पूर्वकालीन भूगर्भ शास्त्रज्ञ होते. हे दगड कुटून वस्त्रगाळ करून पाणी, वनस्पती वा रसायनांचा उपयोग आपल्याला चित्रकला शास्त्रीय दृष्टिकोनातून शिकवली जाई हे सांगते. अजंठ्यात पहिल्या व दुसऱ्या लेण्यात निळा रंगाचा वापर झाला आहे. हा रंग भारतात तेव्हा निर्माण होत नसे. तो भारतात आणणारे पर्शियन्स भृगकच्छमार्गे येत जात. त्यानंतर शूर्पारक बंदराचा थेट व्यापारी व नौकायन संबंध भृगकच्छ-उज्जयनी-आग्रा-मथुरा-तक्षशिला-पेशावर व दक्षिणेकडे कोल्हापूर-विजयवाडा या व्यापारी मार्गांचे केंद्र अजंठ्याशी जोडले गेले. इराणकडून दगडी स्तूप लेणी शिल्पांची शास्त्र-कला भारतात आयात झाली. (डॉ. दाऊद दळवी) सातवाहन काळ इ. स. पू. २ ऱ्या शतकानंतर ते शिलाहार-वेरूळ-कैलास इ. स. ९०० ते १००० पर्यंतचा काळ याचे केंद्रस्थान अजंठाच येते. रस्त्यांच्या स्वरूपात १५००० कि. मी. वाहतूक योग्य राजरस्ते उत्तरेकडे तक्षशिलेकडे १७०० कि. मी. ताम्रलिप्ती (हुगळी कलकत्ता) २४०० ते ५०० कि. मी. वत्सगुल्म प्रतिष्ठान विजयवाडा मार्गे दक्षिणेकडे मद्रास-रामेश्वर दक्षिणोत्तर पूर्व-पश्चिम बाजारपेठा जोडणारा मार्गपथ (कुठूनही २००० ते २५०० कि. मी.) अजंठा हे एक जंक्शन तेव्हाही (२००० वर्षे) झालं होतं.

सातवाहनांचा सुवर्णकाळ पुढे हजार वर्षे टिकला. कसा ? राजयंत्रणा समाज व शिक्षण व्यवस्था यांचे सहजजीवन शक्य करणारा हा काळ होता. विद्यार्थ्यांनी शिकावे, शिक्षण संस्थानी शिकवावे राजयंत्रणेने शिक्षणाचा खर्च पेलावा. अजंठ्यासारखी केंद्रे तेव्हा घडविली जात असताना, हे शिक्षणप्रमुख त्यांना स्वतःची चिठी वा ओळखपत्र देऊन पाठवीत. लगेच ही विद्यार्थी मंडळी म्हणजे त्या काळाचे पदवीधर, द्वीपदवीधर वा डॉक्टरेट मिळवलेले तरूण अजंठा कार्यशाळेकडे वा तशाच इतर कार्यशाळांकडे कूच करीत. समाज व तेथील राजसत्ता त्यांच्या चरितार्थ

व निवासाची काळजी घेई. अजंठा हे या व्यवस्थेचे २००० वर्षांपूर्वीचे दृष्य स्वरूप आहे इतकेच. परंतु हा ७००० वर्षांपूर्वीचा वेदकालीन भारतीय शिक्षण व्यवस्थेचा अंगभूत आविष्कार आहे जो आज अस्तंगत होताना दिसतो आहे.

***

समुद्रगुप्ताची हार्प

सम्राट समुद्रगुप्ताचे (इ. स. ३५०-३७०) एक सुवर्णनाणं जगप्रसिद्ध आहे. समुद्रगुप्त जे वाद्य वाजविताना दिसतो ती वीणा असं सांगतात. प्रत्यक्षात ती हार्प आहे. म्हणजे अनेक तारांचे पसरट वाद्य आहे. रावणही हाळ नावाची हार्प वाजवीत असे. त्यातून त्याने ' रावणवीणा ' वा रूद्रवीणेचा शोध लावला.

सरस्वतीच्या हाती मात्र वीणा आहे. सरस्वती नदीचे वय १० ते ११००० वर्षे, हे आज सिद्ध झाले. राजा नहुषापासून सरस्वतीच्या संस्कृती संकल्पनेला सुरूवात होते. सरस्वती ही वेदात नदी आहे. तशीच ती देवताही मानली गेली आहे. प्रत्येक संस्कृतीची वा देवतेची प्रतीके असतात. त्यावरून संस्कृतीची ओळख होत असते. सरस्वती देवता ही सुख-समृद्धी-कला यांची कारकदेवता आहे. वीणा हे वाद्य संस्कृतीचे गायन-वादन स्वरूप व्यक्त करते. सरस्वती देवता म्हणून हिंदुस्थानात सुमारे ८००० वर्षांपासून ओळखली जाते.

वीणावादन हे जर ८००० वर्षांपासून येथे प्रचलित असेल तर ती सारेगमपपासून एकूण बारा स्वरांचीच अभिव्यक्ती आहे. जगात संगीत १२ स्वरांतूनच निर्माण होते व प्राचीन संगीत ज्यावेळी संस्कृत विद्यापीठातून शिकविले गेले ते आताप्रमाणेच ज्या रागातून निर्माण झाले त्या रागांची कल्पना भरतमुनी नावाच्या ऋषीने शोधून काढली. रागांचे चलन वा वादन आज आहे त्या स्वरूपात पूर्वीही होते काय, या प्रश्नाला आजचे संगीतकार ' नाही ' असं उत्तर देतात; परंतु त्यांच्या दृष्टीने आद्य संगीतकार जो तानसेन त्याने संगीत शोधून काढले वा तो कुठे कुणाकडे जाऊन शिकला याचा पुरावा पर्शियन इतिहास वा मोगल बादशहांच्या इतिहासामध्येही मिळत नाही. मोगल काळात ज्या संगीतशास्त्राचा उदय वा विकास झाला असं म्हणतात त्याबद्दल नोंद का नसावी ? संगीत गुरूगृही शिकवले जाई असं म्हणावं तर तानसेनाव्यतिरिक्त इतर संगीतकार त्या ५०० वर्षांत झाले असतील तर त्यांची नावे इस्लामी इतिहासात का नाहीत ? मोगल काळात शास्त्रीय संगीत ही कल्पना अभ्यास म्हणून अस्तित्वात असल्याचे पुरावे नाहीत. मोंगलानी पर्शियन वंशीय संगीत उचलले. पण हिंदुस्थानी संगीताचा

पाठपुरावा केला असं झालेलं दिसत नाही.

हिंदुस्थानी संगीताची उत्पत्ती सांगणारे तबकाउल उमम् (१० वे शतक) व मकदबे सुलतानिया हे दोन अरबी ग्रंथ उपलब्ध आहेत. ‘ मकदबे सुलतानिया ’चा लेखक तुर्कस्तानच्या सुलतानाचा राजगायक व राजकवी होता. त्याचं नाव अब्बू समई होते, असा उल्लेख सापडतो. १७४६ साली सुलतानाने त्याला त्याकाळच्या संगीतप्रसिद्ध देशात पाठवून तुर्की संगीताची परंपरा शोधण्यास सांगितले. त्यात असं स्पष्ट लिहिलंय की, एकूणच पाश्चात्त्य व पर्शियन संगीत हे हिंदुस्थानी रागरागिण्यावर बेतले गेले आहे. तंतुवाद्ये पूर्णतया हिंदुस्थानी तंतुवाद्यांतून उत्पन्न झाली आहेत. दुबईच्या म्युझियममध्ये वीणा, सतार, पखवाज, डफ, तबला, शहनाई, बासरी ही वाद्ये ठेवली आहेत. त्यांची नावेही तीच आहेत, आकारही तसाच आहे.

२००० वर्षांपूर्वीच्या अजंठा व पितळखोरा लेण्यातही वीणा, तबला, मेंडोलिन (Mandolin) तबला, झांज ही वाद्ये रंगवलेली आहेत. आज त्यांचा जो आकार आहे त्याच आकाराची ती वाद्ये आहेत. त्यामुळे सरस्वतीचे मातृत्व (पितृत्व) लाभलेले हिंदुस्थानी संगीत होते कसे, हा प्रश्न पुढे येतो.

हिंदुस्थानी संगीत हे प्राचीन हिंदुस्थानी स्वतंत्र संगीत आहे हे इस्लामी जगानेच मान्य केले आहे. मोगल बादशहांकडे त्याचे पितृत्व जात नाही.

तक्षशीला, बनारस, काशी, नालंदा विद्यापीठांना संगीताची ३००० ते ४००० वर्षांची परंपरा आहे. केवळ तक्षशीलेत गौतमबुद्ध, पुष्पमित्र शुंग, राजा महेंद्रवर्मन, काशीचा राजा प्रसेनजीत, अशोकपुत्र कुणाल लिच्छवी, राजकन्या चेलना हे तक्षशीलेत वीणा शिकत होते. वीणा हे अत्यंत कठीण वाद्य असे आजचे वीणावादक म्हणतात. सहज ५ वर्षे पूर्णपणे वादनाचे कसब अंगीकृत करण्यासाठी लागतात. त्याकाळची परिस्थिती याहून वेगळी नसावी.

कुठलेही वाद्य संगीत गायन ही कला तसेच ते एक शास्त्र आहे, हे भरतमुनींनी ३००० वर्षांमागे सिद्ध केले. त्यांनी संगीतात सा-रे-ग-म-प-ध-नी हे सात मूळ स्वर व रे, ग, ध, नी हे कोमल व शुद्ध असे बदलणारे स्वर व स व प हे अचल व म हा न बदलणारा तीव्र म्हणजे एकूण १२ स्वर व त्यांच्या २२ श्रुती असल्याचा शोध लावला. प्रत्येक दोन स्वरांमध्ये जास्तीत जास्त २२ कंपने निर्माण होतात व २२ व्या कंपनाला पहिल्या त्या स्वराची अखेर होते, असं सांगणारा पहिला संगीतकार भरतमुनी होता.

समुद्रगुप्ताचा काळ हे एक सुवर्णयुग समजले जाते. त्याच्या सुवर्णनाण्याचं ऐतिहासिक महत्त्व काय ? तो स्वत: जी हार्प वाजवी वा तशा स्वरूपाचे वीणावादन हे एक शास्त्रीय पद्धतीचे वादन असावे. त्यावेळच्या रागांचा उल्लेख मात्र कुठे मिळत नाही. अशा रागरागिण्यांवर जे साहित्य निर्माण झाले असेल ते त्या काळात विद्यापीठांच्या लायब्ररीत कॉपीच्या स्वरूपात सुरक्षित ठेवले जाई; परंतु तक्षशीला, नालंदा ही विद्यापीठे व तिथली ग्रंथालये जाळली गेल्याने प्राचीन संगीताची हिंदुस्थानी परंपरा शोधणे हे एक कठीण काम झाले आहे.

समुद्रगुप्त, राजा हर्षवर्धन हे संगीताचे गुणग्राही सम्राट झाले. राजा हर्षवर्धनने (६२०-६४२) एक संगीत महोत्सव त्याच्या राजधानीत आयोजित केला. ह्युएन संग या चिनी प्रवाशाने या महोत्सवाला हजेरी लावली होती.

***

कालिदासाचे विमान

पुण्याच्या डॉ. सुरेश भावे यांनी १९७० च्या दरम्यान कालिदासाची मेघदूत व रघुवंश ही महाकाव्ये वाचली. ते स्वत: शल्यविशारद व एक कुशल वैमानिक होते. मूलत: संशोधक वृत्ती संस्कृत आणि हिंदुस्थानी संस्कृती ही एक विज्ञानाधिष्ठ संस्कृती होती हा दृढ विश्वास असल्याने त्यांनी ' रामायण ' आणि ' मेघदूता 'चा तसा अभ्यास केला. दोन्ही महाकाव्यात त्यांना विमानविद्या आणि मिसाईल्स यांचे मार्गक्रमण जाणवू लागले. इतिहास आणि भूगोल यांचे अनोखे मिश्रण डोळ्यांसमोर येऊ लागले. त्यांच्यातला संशोधक जागा झाला.

कालिदासाने वर्णन केलेली स्थळे प्रत्यक्ष बघण्या चा संकल्प करून स्वत:च्या विमानातून, होडी, मोटारसायकल, पायी अशा मिळेल त्या वाहनांतून त्यांनी ती ती स्थळे पालथी घातली. त्या अगोदर पुण्याच्या भांडारकर इन्स्टिट्यूट, अनेक इतिहास मंडळे यातून त्यांची माहिती व नकाशे त्यांनी स्वत: तयार केले. १९९२-९३ साली त्यांनी उत्तर प्रदेशातील अयोध्येपासून रावणाच्या लंकेपर्यंत १८०० कि. मी. प्रवास स्वत:च्या विमानाने केला व रामसेतूचा वैज्ञानिक शोध आणि वेध घेतला. एकाच वेळी कालिदासाचा व रामायणाचा खगोल-भूगोल जाणणारे डॉ. सुरेश भावे हे आद्य हिंदुस्थानी संशोधक ठरले. ' रामाच्या पदचिन्हावर पुष्पक विमानाने पंख पसरले ' हे त्यांचे प्रवासवर्णन जिज्ञासूंनी जरूर वाचावे.

रामसेतू हा मानवनिर्मित सेतू आहे हे त्यांचे संशोधन सर्वमान्य झाले. कालिदासाचे महाकाव्य हे कालिदासाने स्वत: उंचावरून पाहिलेले दृश्य चित्रण आहे व ते करताना कालिदास स्वत: एकतर वैमानिक म्हणून विमान चालवत असावा अथवा वैमानिकाशेजारी बसून छायाचित्रे काढीत असावा. डॉ. भाव्यांनी कालिदासाच्या वर्णनाप्रमाणे नागपूरजवळच्या रामटेक ते कैलास पर्वत, व्हाया विदिशा उज्जैन, हरिद्वार, ऋषिकेश, मलय पर्वत, तुळजापूर, लोणार सरोवर, अलाहाबाद असा सुमारे १२०० कि. मी. ते इतर वाहनासह वा पायी कित्येक कि. मी. प्रवास करून जे सर्वेक्षण केले त्याची दखल ' नासा 'ने घेतली. इमेजरी फोटोग्राफी (सॅटेलाइट) व भूप्रदेशाचे कालिदासाने केलेलं वर्णन हे वैज्ञानिकदृष्ट्या परिपूर्ण आहे.

रामसेतूचे मानवनिर्मित अस्तित्व शोधण्यासाठी डॉ. सुरेश भाव्यांनी धनुष्यकोडी ते लंका (तलाईमन्नार) म्हणजे सुमारे ५३ कि. मी. भयंकर वारे, समुद्रतुफान यांची पर्वा न करता एक होडी व सिंहली नावाडी बरोबर घेऊन बांबूच्या साहाय्याने त्यांना आधी बऱ्याच वेळा आकाशातून दिसलेली दगडांची रांगेने लंकेपर्यंत पोहोचलेली पट्टी समुद्राखाली चार फूट खोल असल्याचे आढळले. प्रत्यक्ष समुद्रातून पोहत ते पुढे गेलेल्या दगडांवर उभे राहिले. छातीइतक्या पाण्यात हीच कसरत त्यांनी पुढच्या दगडांवर केली. रामाने नळ नावाच्या वानरवंशीय तंत्रज्ञाच्या मदतीने सेतू बांधला व त्याचा शत्रूने नंतर उपयोग करू नये म्हणून एक बाण मारून तो पाण्यात बुडविला असा रामायणात उल्लेख आहे हे एक वैज्ञानिक सत्य आहे. आपली महाकाव्ये, वेद, पुराणे, जातककथा या भाकडकथा नव्हेत. आपल्या विज्ञान वारसाची ती उगमस्थाने आहेत. त्या उगमस्थानांचा शोध घेणे हे आज आधुनिक उपकरणे-लोडस्टार सॉफ्टवेअर, साइड स्कॅन सोनार, इमेजरी व कॉम्प्युटर चित्रण सर्वेक्षणाने सहजशक्य आहे.

भांडारकर इन्स्टिट्यूट, डेक्कन कॉलेज, सागर विज्ञान संस्था, मशहूर उद्योगसंस्थांचे साहाय्य घेऊन हिंदुस्थानच्या केंद्र व राज्य शासनांनी पुढाकार घेणे योग्य ठरेल.

***

मृत्यूच्या दाढेतून परत !

मायकेल गेरासिमोव्ह एक रशियन वंशतज्ज्ञ Anthropology आणि पुरातत्वज्ज्ञ Archacologist देव मानीत नसे. आपल्या छंदापायी त्याने कित्येक झपाटलेली ठिकाणे (Haunted places) कब्रस्थाने पायदळी तुडवली होती. तो कुठे कधीही एकटा जात असे. आपला कॅमेरा आणि नोटबुक मात्र सदोदित त्याच्याजवळ असे. १९४१ साली तो तैमूरलंगची कबर शोधण्यासाठी बाहेर पडला त्यावेळी त्याचे प्रमुख लक्ष्य होते ' तिमूररूबी ' हे रक्तासारखे लाल रत्न. गूढ शक्ती असलेले हे रत्न तिमूरच्या संग्रही होते. असं काय वैशिष्ट्य होतं त्याचं ?

ते रत्न अशुभ मानलं जाई. अमूल्य असलं तरी ग्त्पात घडविणारं अशी त्याची ख्याती होती. वंशतज्ज्ञ असलेल्या गेरासिमो ह्ला तुर्क मंगोल या टोळ्या इतक्या क्रूर का झाल्या हे जाणून घ्यायचं ह तं. रशियापासून स्पेनपर्यंतच्या भूप्रदेशात घोडदौड करीत ही रानटी माणसे कुठल्याही शहरात घुसत. कापाकापी, बलात्कार, गुरेढोरे पळवणे, त्यांना कसलाच विधिनिषेध नव्हता. शहरे लुटणे, स्त्रियांना पळवून बलात्कार केल्यावर त्यांना कुठेही सोडून वा मारून ही रानटी माणसे आली तशी दौडत निघून जात. ते अशुभ रत्न जवळ बाळगल्यामुळे ती क्रूर आणि रक्तपिसाट झाली का ? हे मायकेलला शोधून काढायचे होते. त्या रत्नानं जणू काही त्याला झपाटून टाकलं. ते रत्न तिमूरने त्याच्या कबरीत लपवलं असावं अशी त्याची समजूत म्हणा, खात्री म्हणा, दिवसेंदिवस मायकेल बेचैन झाला. तिमूररूबी मिळाला तर त्याची किंमत किती होईल हा विचारही त्याला सतावत होताच. एकदाचा तो तिथं जाऊन पोहोचला.

तिमूरच्या कबरीच्या आसपास चिटपाखरूही नव्हतं. दुपार उलटून गेली होती. त्यानं कबरीत प्रवेश केला. बऱ्याच दिवसात कोणी फिरकलं नसावं. काही वेळात तो काळ्या रंगाच्या शवपेटीजवळ पोहोचला. इतर शवपेट्यांहून ही पेटी लांब, रूंद होती. बऱ्याच प्रयत्नांनी तिचं झाकणं त्यानं उघडलं.

सर्वसाधारण माणसाच्या हाडपेर उंचीहून दुप्पट त्या सांगाड्याची लांबीरूंदी असावी. झाकणाच्या आतल्या अंगावर तिमूरलेन (तैमूरलंग)

अशी अक्षरे लिहिली होती. एकाग्र मनाने मायकेलनं त्याची छायाचित्रे काढली. काम मनासारखं झाल्याने तो स्वत:वर खूश झाला. त्यानं त्या दालनातले कोनेकोपरे विजेरीच्या प्रकाशात तपासले. तिमूरच्या कबरीत आसपास कोनाड्यात वरच्या मजल्यावर जाणाऱ्या जिन्याच्या खिडक्या, तावदाने काही म्हणून शोधायचं त्यानं बाकी ठेवलं नाही.

तिमूरनं ज्यावेळी पहिल्यांदा तिमूररूबी पाहिला त्यावेळी त्याची दृष्टी त्या रत्नावरून त्याला दूर करता येईना. तिमूरच्या प्रचंड शरीरात काही बदल घडतोय याची जाणीव त्याला झाली होती. डोळे ताठ झाले. घसा कोरडा पडला. गळा आवळला जातोय असा भास त्याला झाला. 'पाणी' कसाबसा तो ओरडला. काही घोट घेतल्यावर त्याला बोलायला जराशी शक्ती आली. 'या खुदा क्या देन है तेरी, मै जरूर रखुंगा' सर्वांचा विरोध असतानाही तिमूरने तिमूररूबी ठेवून घेतला. मायकेलला हे सारं आठवलं. एव्हाना तो पार थकून गेला होता. इतक्या दूर आलो. हात हलवत परत कसं जायचं ? परत शवपेटी उघडून बघूया या विचाराने त्याला बळ आलं. शवपेटीच्या मध्यावर काही ओळी लिहिल्या होत्या. मगाशी त्याचं लक्ष गेलं नव्हतं. त्याचा अर्थ असा होता, 'मी परत येणार आहे. त्यावेळी मी याहून मोठा उत्पात घडवीन.'

त्या ओळी विजेरीच्या प्रकाशात त्याच्या डोळ्यांसमोर आल्या. त्याचे पाय आणि शरीर घामानं आधीच भिजले होते. त्याचा घसा कोरडा पडला. लक्ष कवटीवर गेलं. तिमूरचा अस्थिपंजर जागा तर होत नाही ? त्याची कवटी मायकेलकडे बघून हसतेय असा भास त्याला झाला. इथे थांबलो तर तिमूरचा बलदंड हात आपल्याला आत खेचील. शवपेटी बंद करील ही जीवघेणी जाणीव झाली आणि सारं बळ एकवटून मायकेल गेरासिमोव्ह जीवाच्या कराराने पळत सुटला. तिथे कधीही परत न येण्यासाठी. तिमूररूबीचे नंतर काय झालं कधी उजेडात आलं नाही. पण मायकेलनं काढलेल्या छायाचित्रे व मापांवरून तिमूरचे रूपचित्रण मात्र करता आले असं म्हणतात की, व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणप्रसंगी लाल रत्नाचा एक नेकलेस बनवला गेला. पण आयत्या वेळी राणीने तो गळ्यात घालण्यास नापसंती दर्शविली.

आज तिमूररूबी वा तो नेकलेस कुठे आहे हे कुणाला ठाऊक नाही. त्यात तिमूररूबी ओवला होता की नाही किंवा त्यामुळेच राणी व्हिक्टोरिया त्या नेकलेसला घाबरली का ? उत्तर नाही.

***

ताजमहाल वाचविण्यासाठी

अलीकडच्या काळात झालेल्या बीबीसीच्या ताजविषयीच्या संशोधनात व त्यानंतरच्या लेखांतून काही महत्त्वपूर्ण मुद्दे पुढे आले. ताजमहाल आगामी पाच वर्षांत यमुना नदीत ढासळण्याचा धोका निर्माण झाला आहे. ताजमहाल का वाचवला पाहिजे, यावर संशोधक, केंद्र व राज्यातील पुरातत्त्व, भूगर्भशास्त्र, इस्रो, मरीन आर्किऑलॉजी, बी. ए. आर. सी. आदी संबंधित खात्यांकडून केंद्र शासनाने नव्याने त्वरित सर्वेक्षण करून घेतले पाहिजे. सुप्रीम कोर्टाने त्यासाठी दिलेली सहा आठवड्यांची मुदत कधीच मागे पडली. पुरातत्त्वाचे अधिकारी अजूनही म्हणतात, ताजला तसा काही धोका नाही. १९४२ पासून ताजला धोका आहे याची जाणीव झाली. पण आजतागायत केंद्राने मूळ पायाखालील संरक्षण भिंतीची वरील खात्यांचे संशोधक पाठवून खात्री केलेली नाही. ही अनास्था का ?

ताजमहलची जलवहन यंत्रणा ३५० वर्षांपासून वा त्याहून कितीही प्राचीन असो, तिचे साम्य सरस्वती, सिंधू नद्यांच्या काठी वसलेल्या इ. स. पू. ३००० वर्षांपूर्वीच्या जलवहन व्यवस्थेशी नाते सांगणारी आहे. मोहेनजोदडो, कालिबंगा, रूपार, हरप्पा, लोथल आदी वसाहतींच्या पाणी वाटपात नदीतून स्वच्छ पाणी पाटाने घरांमध्ये कसे आणावे, शेतीकडे कसे वळवावे व सांडपाणी घरातून दूर नदीकडे कसे वळवावे वा जमिनीत त्याचा निचरा कसा करावा याचे नियंत्रण केले जात असे. ताजच्या अंतर्गत जी जलवहन यंत्रणा वापरली त्यात १८ फूट खोल पाया माती, दगड, वीट यांनी पूर्ण भरल्यावर जो समांतर भूभाग मिळाला त्यावर नलिका, चर, नावा आतबाहेर काढण्यासाठीची भुयारे बांधली गेली. काही विहिरी परत खोदून त्यात दगडविटांचा भराव टाकल्यावर ताजचा पाया व वरचे सात मजले बांधले गेल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

ताजचे संपूर्ण बांधकाम इतके जाणीवपूर्वक भूमितीचा योग्य उपयोग करून बांधले गेले. याचा विचार संबंधितांनी केला पाहिजे.

ताजमध्ये असलेली शेकडो दालने, बागा (चार बाग), सात मजली खजिना, कोठी, कारंजी याच्या खाली २४ तास पाणी खेळविण्यासाठी खापराचे नळ, तांब्याचे नळ व पाणी साठवण्याचे कुंभ

यांचे फार मोठे जाळे पाणी वरखाली खेचण्यासाठी बैलांनी ओढल्या जाणाऱ्या बालड्यांचा उपयोग होई. ॲक्वाडक्ट पद्धतीने साठवणुकीच्या कमी जास्त उंचीवर असलेल्या टाक्यातून पाणी वरखाली फिरे.

रामसेतूचे डॉ. बद्रीनारायण व डॉ. पी. के. बॅनर्जी या भूगर्भशास्त्रज्ञांनी ठरवलेले वय ७३०० वर्षे (इ. स. पू.) आहे. ताजचे नाते सरस्वती, सिंधूशी जवळीक साधणारे आहे का, ही खरे तर नव्या संशोधनाची दिशा असणे योग्य ठरेल.

ताजची अंतर्गत जलवहन यंत्रणा १९७२ सालच्या यमुनेच्या पुरापर्यंत कार्यान्वित होती. त्यावेळी यमुनेच्या पुराचे पाणी ताजच्या पांढऱ्या संगमरवरी प्लॅटफॉर्मपर्यंत जितक्या झटपट चढले तितक्याच वेगाने पूर सरताक्षणी ओसरून गेले. त्यावेळी ताजचे खापरी व तांब्याचे पाईप यमुनेच्या दिशेने पाणी ओतून टाकत होते हे शास्त्रज्ञांना समजले. शाहजहानचे वा एकूण मोगलशाहीचे अस्तित्व असताना व नंतरच्या ब्रिटिश काळात ही जलयंत्रणा कार्यान्वित राहील याची काळजी घेतली जाई. याचा अर्थ ती एकतर यमुनेच्या भयंकर प्रदूषणामुळे व काठ बुजत गेल्याने बंद पडली वा पूर्णतया निकामी झाली. ताज का कलतोय याचे कारण ताजचा पाया भुसभुशीत झाला आहे. त्याखालील मातीची धारणाशक्ती संपली आहे. एबनी वृक्षाचे सुरक्षा आच्छादन यमुना कोरडी पडत चालल्याने व एबनीच्या फळ्यांना लागणारा ओलसर दमटपणा संपल्याने घट्ट चिखलाचे वजन व सततचा दाब सहन करू शकत नाही.

यमुना नदी व ताज यामध्ये असलेली घाण व घट्ट चिखलाचे खडक फोडणारी व दूर करणारी ड्रेजर्स वापरून हा दाब नाहीसा करता येईल. आवश्यक तेवढ्या अंतरावर दगडी भिंत बांधून यमुनेच्या मुख्य प्रवाहापासून हा भाग अलग करता येईल व सक्शन पंप वापरून कोरड्या केलेल्या पट्ट्यात नव्या माती दगडांचा भराव टाकून ताजच्या दक्षिण परिसराला स्थैर्य देता येईल.

ओएनजीसी, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्याकडे गाळ काढणारी, खडक फोडणारी यंत्रणा आहे. केंद्राने या व इतर खासगी संस्थांचे सहकार्य घेऊन तज्ज्ञांकरवी यमुनेचा तळ, ताजची मागची बाजू, सातव्या मजल्याच्या तळभागाची तपासणी त्वरित करणे गरजेचे आहे. हे काम खरोखर युद्धपातळीवरून करून घेणारी यंत्रणा नव्याने उभी करणे ही काळाची गरज आहे.

***

स्यमंतक ऊर्फ कोहिनूर

३० एप्रिल १५२६. राजपुत्र हुमायून रामपूरच्या नवाबाच्या हवेलीकडे मोजक्या अधिकाऱ्यांसह निघाला. रामपूरचा नवाब इब्राहिमखान लोदीच्या बाजूने बाबरविरूद्ध लढला आणि मारला गेला. त्याच्याकडे सामंत मणी (स्यमंतक) नावाचा महाभारतकालीन हिरा आहे अशी कुणकुण बाबरला लागली होती. कुठल्याही परिस्थितीत तो हिरा राज्याभिषेकाचा ' खुदबा ' दरबारात वाचण्याअगोदर बाबरला हवा होता.

५ मे १५२६ या दिवशी बाबर हिंदुस्थानचा बादशाह म्हणून सिंहासनावर बसणार होता. रामपूरच्या नवाबाची राजमाता, त्याच्या अनेक स्त्रिया शोकाकुल अवस्थेत दिवाण ई खासमध्ये नको असलेल्या पाहुण्याची वाट पाहात बसल्या होत्या. मोगल राजपुत्र हुमायून कुठल्याही क्षणी प्रवेश करील अशी शुभ (अशुभ) वार्ता घेऊन एक अधिकारी राजमातेजवळ आला. पाठोपाठ राजपुत्र हुमायून आत आला. त्याने अतिशय शांतपणे पुढे येत राजमातेला अभिवादन केले. काहीशा अविश्वासाने त्याच्याकडे पाहाणारी राजमाता व इतर स्त्रिया यांच्या डोळ्यांतून अश्रूंना वाट फुटली. राजपुत्रापाठोपाठ एक म्हातारा सरदार आला. बहुधा बाबरचा वजीर असावा. हुमायूनच्या कानाशी काहीतरी पुटपुटताना त्या दरबारी दिवाणखान्यात दिसला. मग हुमायून बोलू लागला. ' घाबरू नका. आम्ही तुमची बेअदबी करणार नाही. हिंदुस्थानचे पदपादशाह बाबर यांच्या सदिच्छा तुम्हाला देण्यासाठीच मी इथे आलो आहे. ' तो काही काळ तसाच उभा राहिला आणि वळून आल्यामार्गे बाहेर कधी गेला त्या स्त्रियांच्या लक्षातही आलं नाही.

पण जाताना एक जाळीदार आच्छादनात रूमालात गुंडाळलेली लंब वर्तुळाकार सोन्याची डबी वजीराच्या हातात कधी आली, कुणी ठेवली हे कुणालाच कळलं नाही.

५ मे १५२६. खुदबा वाचून झाल्यावर बाबरानं त्या डबीचं झाकण हलकेच उघडलं. एक मंद गुलाबी छटा पांढऱ्या अस्तरावर पडलेली त्याला दिसली. एक अंडाकृती हिरा ती प्रकाश किरणं बाहेर टाकीत होता. त्यावेळी त्याचं वजन आठ मिशेल्स म्हणजे १८६ कॅरट भरलं. बाबरानं गुडघे टेकून

अल्लाचे आभार मानले व त्या रत्नाचे नाव ठेवलं ' बाबर ' किंवा दि ग्रेट मुघल. टॅव्हर्निएने औरंगजेबाच्या सांगण्यावरून आग्रा व दिल्लीमधल्या अनेक गुप्त ठिकाणांना भेटी दिल्या. टॅव्हर्निए हा फ्रेंच सम्राट १४ वा लुई याच्या दरबारी एक निष्णात जवाहिऱ्या होता व त्याला शहाजहान बादशाहने सम्राट लुईच्या परवानगीने आपल्या संपत्तीची मोजदाद करण्यासाठी बोलाविले होते. त्यात कोहिनूर हिराही होता. त्याचे वर्णन स्यमंतक वा नंतरच्या आणखी एका हिऱ्याचं रंगरूप, आकार यात विलक्षण साम्य होते.

स्मयंतक हा ७००० वर्षांपूर्वीचा हिरा म्हणजे कोहिनूर असेल तर प्रत्यक्ष कोहिनूरचा शोध गोवळकोंडा किल्ल्याच्या खाणीत १५ व्या शतकात लागल्याची नोंदही आहे. दि मोगल वा बाबर नावाचा जो हिरा हुमायूनने रामपूरहून आणला त्याला एक किंचित निळी झांक असल्याचीही नोंद आहे. १७३९ पर्यंत टॅव्हर्निएने वर्णन केलेल्या हिऱ्याची स्थापना आधी मयुरासनाच्या मध्यावर केली गेली. मयुरासन नादिरशाहने १७३९ मध्ये इराणात नेले. कोहिनूर हिंदुस्थानात महाराणा रणजीतसिंगकडे आला व महाराणी व्हिक्टोरियाच्या मुकुटात १९१२ साली जाऊन बसला.

१८५९ पासून तो टॉवर ऑफ लंडनमध्ये ब्रिटिश घराण्याच्या जडजवाहिराबरोबर कडेकोट बंदिस्त आहे.

***

ताजमहाल

ताजमहाल पाहाणाऱ्या प्रेक्षकांची संख्या आकड्यांवर अवलंबून नाही. दर्शनी कबरी (शाहजहान-मुमताज) ज्या चवथ्या मजल्यावर आहेत त्यांचे उडत उडत दर्शन होण्यापलीकडे ताज या वास्तूत कुठेही जाता येत नाही.

ताज हे खरोखरीचे आश्चर्य आहे. केंद्र शासनाला ते पर्यटकांना संख्या वाढण्यासाठी कसे दाखविता येईल हे फार महत्त्वाचे आहे व ते कठीण नाही. ताजच्या अंतरंगात अशी काय जादू आहे ?

१९३६ च्या पुरातत्व खात्याच्या अहवालात ताजच्या तळमजल्याखाली अनेक प्रशस्त दालने आहेत जी आजही कुलूपबंद आहेत. ताजची निर्मिती अनेक विहिरी बुजवून व काही तशाच ठेवून त्यावर केली गेली. म्हणजेच कधीकाळी ताज बांधताना आधीच एक प्लॅटफार्म तयार होऊन त्यावर वरचे ६ वा ७ मजले बांधले गेले. डॉ. पु. ना. ओकांनी ताजच्या अंतरंगाची ५० छायाचित्रे प्रसिद्धही केलेली आहेत. त्यांच्या परीक्षणानुसार ताजच्या भोवतालच्या भिंतीमध्ये खजिना कोठी या ७ मजली विहिरीभोवती (२८+२२) अशी ५० दालने आहेत. ज्यात शाहजहानच्या काळात त्याला येणारे खजिने, भेटवस्तू, मौल्यवान किमती चिजा (हुक्के, कट्यारी, तलवारी, संदुका इ.) ठेवल्या जात. ताज अनेक वेळा लुटला गेला म्हणजेच तिथे आज काही शिल्लक असेल असं सांगता येणार नाही. ताजची अंतर्गत रचनाकारी ३ ऱ्या मजल्यापासून खालपर्यंत पर्यटकांना आवश्यक तेथे वीज, वातानुकूलित व्यवस्था करून दाखवणे सहज शक्य आहे. ताजला १२ प्रवेशमार्ग आहेत. असे सांगतात काही उघडे ठेवले तर काय बिघडणार आहे ?

ताज हे तेजोमहल असू द्या किंवा दर्गा असू द्या तो देशाची शान आहे. ताजला दोन घुमट आहेत. तिथेही दालने आहेत. पीटर मंडी, टॅव्हर्निए, बर्निए, डेव्हिड केरॉल अशा कैक परदेशियांनी ताज आतून पाहिल्याच्या नोंदी आहेत. मला नेहमीच प्रश्न पडतो. ताजची आतून झाडलोट, स्वच्छता केंद्राची खाती ठेवत असतील काय ? यमुनेच्या त्याच किनाऱ्याला समोर आग्रा किल्ला दिसतो. तिथंपर्यंत भुयार खणल्याचे उल्लेख आहेत. शत्रूने

खजिन्यांवर डल्ला मारायचं ठरवलं तर अचानक तो हलविण्याचीही व्यवस्था असेलही. चवथ्या मजल्यावर व आग्रा किल्ल्यातील मुस्मन बुरूजावर जमिनीलगतच्या दरवाजाआड संगमरवरी पायऱ्या खाली जाताना आजही दिसतात. कुठे जातात ही भुयारे ? औरंगजेबाने टॅव्हर्निएला १६५८ मध्ये ज्या खजिन्यांची मोजदाद करायला बोलावले तो ताजच्या खाली होता. टॅव्हर्निए आग्र्याला त्यासाठी गेला व बराच काळ त्याचे वास्तव्य तिथे होते. त्यानं मोजलं काय ? केंद्र शासनाला गोव्याच्या मरीन आर्किऑलॉजी वा नेव्हीकडून पाणबुडे मागवून ताजचे अंतर्गत जल व्यवस्थापन, यमुना नदीतळे, भुयार वा जलमार्ग याचा शोध घेता येईल. सीस्मॉलॉजी, लॅण्डसॅट-इमेजरी फोटोग्राफीद्वारा याचे नव्याने कंम्प्युटर संकलन चित्रफिती तयार करता येईल. या गोष्टी केंद्राला करून घेता येतील व जनजागृती करता येईल. तज्ज्ञांनी व सुजाण वाचकांनी या विषयावर आपापल्या प्रतिक्रिया दिल्यास नव्याने एका प्रेक्षणीय स्थळाला न्याय मिळेल.

***

ताजची मृत्युघंटा

> छोटया होडया ज्या मार्गाने ताजमहालच्या आत-बाहेर करीत, आज हा मार्ग ढासळलेल्या अवस्थेत आहे. ताजची मागची दालने जोडणारा, पण सध्या बुजवलेला दरवाजा उघडला तर अनेक रहस्ये उघड होतील.

ब्रिटिश मीडिया रिपोर्ट ऑक्टोबर २०११ ने जागतिक आश्चर्य असलेला शहाजहान व मुमताजच्या प्रेमाचे प्रतीक असलेला ताजमहाल येत्या पाच वर्षांत यमुना नदीकडे अधिकाधिक खचत चालला असल्याचा निष्कर्ष काढला आहे. मुख्य वास्तू व मनोरे यांचे हे झुकणे ताजच्या मृत्यूची घंटा आहे.

मुघल इतिहासाचे तज्ज्ञ म्हणून विख्यात असलेले आर. नाथ यांनी ताजचा पाया, मनोरे, यमुनेमध्ये वाढत चाललेले प्रदूषण, अक्षम्य शासकीय हेळसांड या विषयांवर वारंवार जनजागृती केली आहे. सर्व संशोधने आणि इतिहास, पुरातत्व, भूगर्भ क्षेत्रातील हिंदुस्थानी व पाश्चात्त्य वास्तुतज्ज्ञांच्या मते ताज ही वास्तू व यमुना नदी यांना वाचविण्याचे प्रयत्न ज्या पोटतिडकीने व्हायला हवे होते तसे गेल्या ३० ते ४० वर्षांत झाले नाहीत.

ताजची जी सर्वेक्षणे झाली त्यात शुभ्र रंगाच्या उत्कृष्ट मकराना, संगमरवराला चढलेली धुरकट पिवळसर पुटे हा मथुरा रिफायनरीने व तिच्यावर अवलंबून असणाऱ्या असंख्य उद्योगांनी यमुनेत ओतलेल्या सांडपाण्याचा व दूषित वायूचा एकत्रित परिणाम आहे. या परिणामाचे वैज्ञानिक दृश्यस्वरूप आहे तरी कसे ? वाळवी लागल्यामुळे पुस्तकांना जशी छिद्रे ताजच्या एकेकाळच्या मजबूत शुभ्र संगमरवराला पडली आहेत. मथुरा रिफायनरी उभारण्यापूर्वी, उभारताना व आजपर्यंत अनेक सभा, निदर्शने झाली. पण शासनाने रिफायनरी का हलवली नाही ?

ताजच्या मूळ पायाखाली १८ फूट खोलीपर्यंत एबनी व साग वृक्षांच्या फळ्यांची संरक्षक भिंत आहे. तिला मागच्या ३०० वर्षांच्या

कालावधीत काही झाले नव्हते. यमुना कोरडी पडत चालल्याने या वृक्षांना मजबुतीसाठी हवा असणारा दमट ओलसरपणा नाहीसा झाला व चिखलाचा घट्ट थर चहूबाजूंनी भिंतीला आवळत गेल्याने लाकूड कमकुवत बनले. फळ्या व आतील माती आक्रसत गेली हे ताजची वास्तू व मनोरे यमुनेकडे कलंडत जाण्याचे कारण आहे. विमान वा हेलिकॉप्टरने चक्कर टाकली की यमुनेची वासलात कशी लागली, दक्षिण काठ कसा ढासळत गेला, धूर, वायू यांचे पट्टे परिसर कसा आक्रमून टाकतात हे साध्या डोळ्यांनीही दिसते.

बीबीसीने स्वत:चे वार्ताहर पाठवून ताज परिसराची पाहणी केली. ' डेली मेल 'ने जेम्स टॅपर (James Tapper) यांनी लेख लिहिल्यावर केंद्र शासनाने संबंधित खात्यांकडून त्वरित कारवाई करणार असल्याचे सर्व प्रसिद्धी माध्यमातून जाहीर केले. नाथराम (Immortal Taj Mahal) कोह (कोश) एब्बा (The complete Taj Mahal) बेग्ले वायने (Myth of the Taj, 2) The Illuminated Tomb) अशा विद्वानाना त्यांच्या ताज संशोधनात काय आढळलं ?

ताजच्या अंतर्गत पाणी वाहून नेणारी व्यवस्था स्वच्छ पाणी आत घेणारी व सांडपाणी बाहेर काढणारी अशा स्वरूपात विभागली गेली. त्यानुसार यमुना नदीत कमीअधिक उंची व योग्य अंतर राखून पाणी आत-बाहेर करता येई. त्यासाठी खणलेले चर, नाल्या, आतली भुयारे यांचा पत्ता आता लागला आहे. या सर्वांची तजवीज मुख्य इमारत व इतर इमारती बांधण्याअगोदर केल्याचे स्पष्ट झाले आहे. असे मातीचे तळ ०.२५ मी. व्यासाचे व जमिनीखाली १.८ मी. खोल बसविलेले आढळले आहेत. ब्रिटिशांच्या काळात ही जलवाटप व्यवस्था चालू होती. ताजची नियमित स्वच्छता, केरकचरा सफाई, आतले सर्व मजले, पॅसेजेस्, जिने धरून केली जाई. १९७२ साली यमुनेला पूर आला तेव्हा ताजच्या पांढऱ्या प्लॅटफॉर्मपर्यंत पाणी चढले व नंतर काही तासांनी ते ओसरत गेले. तुंबले नाही याचे एक कारण ताजची अंतर्गत जलवाहक यंत्रणा काम देत होती. परंतु १९७१ नंतर पुरातत्व खात्याने ताजमधील मजले, पॅसेजस, मार्ग, जिने यांना कुलूपे ठोकली. झरिनाज व्हायलेट या रशियन कथेसारखी ही अवस्था आहे. ताज व्यवस्थापनातील कुणीही या अनास्थेबद्दल बोलत नाही. आपल्याला ठाऊक नसल्याचे म्हणतो. ताजच्या अंतर्बाह्य साफसफाईची काय व्यवस्था आहे, कसे कळणार ? यमुनेच्या दक्षिणेची ढासळलेली अवस्था असे सांगते की कधीकाळी पाणी आत-बाहेर करणारी मूळ यंत्रणा

प्रदूषण चिखलमाती याखाली बुजली वा मोडली गेली. परंतु तळाखाली साठलेली घाण व पाणी ताजच्या अंतर्गत कुठे ना कुठे साठत असावे. त्यामुळेच ताज परिसरात नदीच्या बाजूला दुर्गंधी येत राहाते. यावर काय उपाय आहेत ? हिंदुस्थानी शासनाने देश-विदेशातल्या तज्ज्ञांना पाचारण करून ताजचा तळ, संरक्षण एबनी वृक्षांच्या फळ्यांच्या भिंतीची त्वरित पाहणी करून तिथल्या साठलेल्या चिखलाचा वेढा, गाळ, घाण उपसली पाहिजे. ओएनजीसी, बीपीटी, बीएमसी यांच्याकडे ही यंत्रणा उपलब्ध आहे. संरक्षक भिंतीच्या फळ्या काढून नव्या एबनी वृक्षाच्या फळ्यांचे नवे कवच बसविले पाहिजे.

ताजच्या तळाखाली वा वरच्या मजल्यांवर जिथे जिथे घाणपाण्याची डबकी साठली असतील त्याचा सक्शन पंप लावून उपसा करून घेतला पाहिजे. जुनी पाणी वहन व्यवस्था बुजली वा मोडली गेल्याचे आढळले आहे. ती नव्याने आधुनिक यंत्रणेद्वारे नीट करणे गरजेचे आहे. ताज अंतर्गत सर्व पॅसेजेस, मजले, जिने, भुयारे कुलूपबंद असल्याने तिथे नोकर मंडळी जात असतील की नाही, साफसफाई होत असेल की नाही हे कळणे कठीण आहे. ताजच्या बुडापासून घुमटापर्यंत आवश्यक तिथे वीज, वातानुकूलित आधुनिक यंत्रणा वापरात येणे गरजेचे आहे. सध्याच्या प्रशासनातील अकार्यक्षम नोकर मंडळीने घातलेला गोंधळ दूर झाला. त्यांची जागा प्रशिक्षित-सुशिक्षित तरूणांनी घेतली तरच ताज वाचेल अन्यथा ताजची मृत्यूघंटा आताच वाजली आहे असेच म्हणावे लागेल.

***

ताजचं आता काही खरं नाही

ताजचे वास्तव स्वरूप ब्रिटिश म्युझियम बीबीसी व डेली मेलच्या प्रयत्नांमुळे जगासमोर आले. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने हिंदुस्थानच्या केंद्र शासनाला सहा आठवड्यात ताजच्या दुर्दशेवर अहवाल देण्यास सांगितले. याचं मुख्य कारण ताजचा पाया. त्याची धारणाशक्ती संपल्यामुळे कमकुवत झाल्याचे संशोधकांच्या लक्षात आले. त्यांच्या अहवालानुसार त्वरित दुरूस्ती न केल्यास ताज एकतर यमुना नदीत आगामी पाच वर्षांत केव्हाही कोसळेल वा खचून नष्ट होईल. अहवाल मागवल्यालाच आता दीड वर्ष झाले.

'ताज' हे हिंदुस्थानचे व जगाचे एक नंबरचे आश्चर्य आहे असे आम्ही कोणत्या तोंडाने पर्यटकांना सांगायचे ? तिथे आजही दाखवण्यासारखं आहे काय ? चौथ्या मजल्यावरच्या दर्शनी कबरी ? हिंदुस्थानचे व राज्यांची पर्यटन खाती याव्यतिरिक्त देशी व परदेशी पर्यटकांना काहीही दाखवीत नाहीत. जास्तीत जास्त १५ ते २० मिनिटांपुरतीच ही यातायात असते. सुप्रीम कोर्टाने स्वत:चे प्रतिनिधी स्वतंत्रपणे व नंतर संबंधित खात्यांच्या प्रमुखांसह जाणून घेणे योग्य ठरेल तरच ताजचे वास्तव स्वरूप समोर येईल.

खरे तर असे संकलन हिंदुस्थानी शासनाने स्वत:च करणे योग्य ठरेल. त्यासाठी ताजच्या तळमजल्याखाली असलेली गटारे, नाली व भुयारे स्वच्छ करून सिमेंटने व विटांनी नीट बांधून घ्यायला हवीत. ही यंत्रणा नामशेष झाल्यामुळे ताजच्या मजल्यांवर जिथे पाण्याची डबकी तयार झाल्याचे आढळले तिथे साफसफाई व डागडुजी होणे अत्यंत गरजेचे आहे.

यमुना नदीचा ताजला लागून असलेला दक्षिण काठ ढासळलेला आहे. तिथे ३०० वर्षांपूर्वी असलेले बैलजोड्यांकरवी यमुनेचे पाणी ताज परिसरात आणणारे मोटेचे चढ-उतार आता भग्न स्वरूपात कुठे कुठे आहेत. ॲक्वाडक्टच्या भग्न कमानी (पाणी वर चढविणाऱ्या) अशाच कुठे कुठे दिसतात. पाण्याचे खापरी नळ, तांब्याचे नळ, ताजच्या मधोमध असलेल्या कारंज्यापर्यंत आलेली, ताजच्या अंतर्गत सर्व दालने व खजिना कोठी भोवतालची २४ दालने जोडणारी जलयंत्रणा अलीकडील ब्रिटिश

संशोधनात समजलेली आहे. ताज व आग्र्याच्या किल्ल्याला जोडणारे ताजखालील भुयार, ज्यातून एक छोटी होडी सहज जाऊ शकेल. (आज भग्नावस्थेत) हिंदुस्थानच्या केंद्र शासनाने या सर्वांचे छायाचित्रण करून घ्यावे.

सुप्रीम कोर्टाने ताजच्या तळाखालील १८ फूट खोल भरावाला संरक्षण देणाऱ्या एबनी वृक्षांच्या फळ्यांच्या भिंतीचे आजचे स्वरूप कॉम्प्युटर चित्रणाद्वारे जाणून घ्यावे म्हणजे नव्याने संरक्षण कवच कसे तयार करता येऊ शकेल हे स्पष्ट होईल. असं केलं तरच संरक्षणासाठी व नव्या तंदुरूस्तीसाठीच्या निधीची तरतूद करणे केंद्राला आवश्यक ठरेल.

आज हिमालयात यमुना नदीला भयानक पूर आल्याचे आम्ही रोज पाहतो आहोत. ताजला खेटून वाहणाऱ्या यमुना नदीने १९७२ साली आग्रा शहरात काय हाहाकार उडवला होता याची पूर्ण कल्पना केंद्राला आहे. त्याची पुनरावृत्ती वारंवार होत राहिल्यास ताजचं काही खरं नाही.

***

राणा दिल !

बर्निए (Barnier) हा फ्रेंच प्रवासी ज्यावेळी आग्रा शहरात पोहोचला त्यावेळी दारा शुकोह या राजबिंड्या राजपुत्राची मुघल दरबारी शाहजहान बादशाहाचा पुढील वारस म्हणून जिकडे तिकडे ऊठबस होत होती. सरदार दरकदार मंडळीत त्याच्या आवडीनिवडी जपण्याची अहमहमिका लागलेली असे. दारा शाहजहानचा सर्वात मोठा पुत्र त्यावेळी पंडितांकडून संस्कृत शिकून उपनिषदे, रामायण, महाभारत यावर चर्चा करीत असे. इस्लाम आणि हिंदू धर्म यात काय साम्य आहे हे जाणून घेण्याचा त्याचा उद्देश होता. वेदांनी सांगितलेला धर्म म्हणजे आचरण ! कुठली पंथप्रणाली नव्हे ही त्याची विचारसरणी आणि इस्लाममधला सुफी संप्रदाय त्याच्या तत्त्वनिष्ठेचा आधार बनला. हिंदू धर्माला त्याच्या काळात एकंदरीत बरे दिवस आले. देवळातून पूजाअर्चा, घंटानाद होऊ लागला. सर्व सुरळीत झाले असते तर दारा शुकोह हिंदुस्थानचा सम्राट झाला असता व आज दोन्ही धर्मियात जी तेढ व कडवटपणा आढळतो त्याला कदाचित वाटही फुटली नसती. दाराने पुढे उपनिषदे व रामायणाचे पर्शियन भाषांतर केले. दारा शुकोहला हिंदू संस्कृतीच्या जिव्हाळ्याची प्रेरणा मिळाली कुठून ?

राणा दिल ही सौंदर्यवती त्याच्या आयुष्यात याच काळात आली. ती प्रेयसी की नर्तकी की त्याची राणी होती याबद्दल विद्वानात एकवाक्यता नाही. परंतु ती नुसती तवायफ निश्चितच नव्हती. बाजीरावाची मस्तानी ही जशी छत्रसाल बुंदेल्याची सुसंस्कृत पण, अनौरस कन्या होती त्याचप्रमाणे राणा दिल ही एखाद्या पंजाबी वा राजपूत राजाची कन्या असावी असा समज आहे. तिचे जे वर्णन आहे त्यात तिचे टपोरे डोळे, लांब केशसंभार आणि आदबशीर वागणूक, नाच, गायन आणि वीणा वादनातले नैपुण्य कारणीभूत ठरले. दारा शुकोहला तिच्याशी लग्न करायचे होते. परंतु शाहजहानने त्याला संमती दिली नाही. शाहजहानच्या आयुष्यात नियतीने आणून दिलेली संधी त्यानं स्वत:हून वाया दवडली. हिंदू-मुस्लिमांचे संबंध त्याच्या काळात सौहार्दाचे राहिले. दारा शुकोहच्या सौजन्यशील व्यक्तिमत्त्वामध्ये हे संबंध राजपूत अमीर उमरावांकरवी सर्व समाजात रूळण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. परंतु राणा दिलला सून करून घेण्याची

कल्पना राजघराण्यातील स्वयंमन्य मंडळींच्या विरोधामुळे व मुल्लामौलवींच्या प्रेरणेने उखडली गेली.

त्यामुळे दोघांचे व तत्कालीन समाजाचे काही बिघडले नाही. दाराने राणा दिलला एक महाल दिल्लीजवळ बांधून दिला. त्याचे भग्नावशेष आता सापडले आहेत. दोघांचे दिवस सुखात जात होते. परंतु अचानक दाराचे नशीब फिरले. शाहजहान अचानक आजारी पडला. राजवैद्यांनी तो वाचणार नाही अशी बातमी कुणाला तरी सांगितल्याची कंडी उठली. दाराचे तीन भाऊ, मुराद गुजरातेत, शुजा बंगालला, औरंगजेब दक्षिणेत असे राजधानीपासून दूर ठिकाणी कार्यरत होते. त्यांच्यापर्यंत ही बातमी पोहोचलीच व आपापली सैन्ये घेऊन ते वेगाने राजधानीकडे निघाले, सत्तास्पर्धेचा शेवट आपले सर्व भाऊ, त्यांचे हितचिंतक, सरदार नातेवाईक यांची कपटी औरंगजेबाने विजयी होताच हत्या घडवून आणली. बादशाह शाहजहानला त्याने उमरकैद (मरेपर्यंत) दिली व आग्र्याच्या किल्ल्यात १६६६ पर्यंत कडक बंदोबस्तात ठेवले.

औरंगजेबाचा एक दूत एक खत घेऊन राणा दिलच्या महाली रवाना झाला. त्यातला मजकूर असा होता -

' भारताचे सम्राट आलमगीर औरंगजेब तुझे सौंदर्य, टपोरे डोळे आणि केशसंभार यांची यथायोग्य कदर करू इच्छितात. खाविंदाची कृपादृष्टी तुझ्यावर कायम राहावी, असा मनोदय त्यांनी व्यक्त केला आहे. तरी त्वरित त्यांच्या भेटीची संधी घ्यावीस. '

राणा दिलने निरोप्यास दिवाणखान्यात बसवून ती आतल्या खोलीत गेली. स्वत:च्या कट्यारीने तिने तिचा केशसंभार कापून एका तबकात ठेवला. त्याच कट्यारीने तिने आपली दोन्ही बुबुळे कापून तबकात ठेवली. ते तबक घेऊन ती तशीच त्या दूतासमोर हजर झाली. ' दे हे तबक तुझ्या खाविंदाना.' त्यांना सांग, ' तुम्हाला प्रिय असणारे नेत्र आणि केशसंभार पाठवला आहे. ' एवढे बोलून राणा दिलने तीच कट्यार स्वत:च्या पोटात खुपसून स्वत:चा अंत करून घेतला. तिचे अंत्यसंस्कार औरंगजेब वा इतर कुणी केल्याची नोंद मुघल इतिहासात नाही.

***

सम्राज्ञीचे दफन

अरजुमंद बानू बेगम ऊर्फ मुमताज (महल) ही शाहजहान बादशहाची पट्टराणी त्यावेळची जगातली सर्वात सुंदर सम्राज्ञी समजली जाई. वयाच्या ३८ व्या वर्षी ती मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर येथे मृत्यू पावली. तिच्या मृत्यूनंतर सहा महिन्यांनी तिला ताजमहलमध्ये परत दफन केले गेले.

आजपर्यंत जगामध्ये शाहजहान-मुमताज व ताजमहलबद्दल अनेक संशोधकांनी वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून संशोधन केले. मुमताज नक्की कशी दिसे ? तिच्या पश्चात तिचे दफन कुठे, किती वेळा झाले ? तिचे पार्थिव शेवटी म्हणजे सहा महिन्यांनी ताजमध्ये पुरले तोपर्यंत ते कसे जतन केले गेले ? तिचे जे चित्र उपलब्ध आहे तशीच ती खरोखर दिसे असं कुठल्या विज्ञानाद्वारे आज जाणता येऊ शकेल हे ते प्रश्न आहेत.

तुतनखामन (खामुन, खामेन) या इजिप्शियन सम्राटाची ममी (मृत शरीर) सापडल्यानंतर (१९२२) तिची व रॅमसेस दे सेकंड या दुसऱ्या सम्राटाची रूपरेषा फ्रेंच शास्त्रज्ञांनी अनेक वैज्ञानिक चाचण्या घेऊन निश्चित केली. त्यांचे कंम्प्यूटर विश्लेषण करून चेहऱ्याची व शरीराची परिमाणे ठरवली गेली व त्यानुसार जी रूपनिर्मिती कंम्प्यूटरवर झाली तसे हे दोन्ही खरोखर दिसत असे शास्त्रीय निदान झाले. मुमताजचे असे रूपसंकलन होऊ शकते. ते अधिक सोपे आहे याचं कारण तिचे तिच्या हयातीत बनवलेले चित्र उपलब्ध आहे. त्यामुळे कंम्प्यूटर संकलनामध्ये तिच्या अस्थिरचनेच्या, चेहऱ्याच्या ठेवणीचे वैशिष्ट्य कळेल. रूपवैशिष्ट्यात तिचा रंग, अस्थीवर कातडी असतानाचे मिळालेले रूपसंकलन त्या चित्राशी ८५ टक्के (वा अधिक) जुळले तर मुमताज तशीच दिसे असं वैज्ञानिक परीक्षणात दिसून येईल.

डॉ. आर. सी. शर्मा व केंद्रीय पुरातत्वज्ञ के. के. महम्मद यांच्या मते मुमताजचे पहिले दफन तापी नदीच्या तीरावर अहवाखाना या ठिकाणी झाले. मुघल इतिहासाचे गाढे अभ्यासक अफसर अहमद व जामिया हमदर्द विश्व विद्यालयाचे क्युरेटर अरमानुल हक् असं म्हणतात की, मुमताजचे शरीर युनानी पद्धतीने जतन केले गेले. अन्यथा ते सहा महिने टिकू शकले

नसते. काही विद्वानांना तिचे दफन बऱ्हाणपूर येथेच झाले व आजही अहवाखाना या ठिकाणी तिचे शव आहे असे वाटते. मुघल इतिहास मात्र असे सांगतो की, ताजमहालाचे बांधकाम चालू असताना मधला काही काळ ते ताजजवळच्या परिसरात बंदिस्त जागी ठेवले गेले. अहमद यांच्या म्हणण्यानुसार ती बंदिस्त जागा म्हणजे धातूची एक शवपेटी असावी. तिच्यात औषधी वनस्पती बाभूळ वृक्षाची लाकडे जाळून मुद्दाम तयार केलेली वस्त्रगाळ रक्षा, कापूर व चंदनाच्या वृक्षाची राख यांचे मिश्रण होते. जे शवपेटीत मुमताजचे शव ठेवण्याआधी पसरून ठेवले गेले. त्यामुळे तिचे शव टिकून राहिले.

***

ब्रिटिशांचा हिंदुस्थानातील चंचुप्रवेश

इंग्लंडमध्ये ३१ डिसेंबर १५९९ रोजी ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना राणी एलिझाबेथच्या कृपाछत्राखाली झाली ती केवळ व्यापारी उद्दिष्टाने. या कंपनीचा कारभार एका बोर्डातर्फे चालावा व स्वायत्त स्वरूपात त्याचे नियंत्रण सरकारी अनुमतीने नेमलेल्या डायरेक्टर्सनी करावे ही संकल्पना सर्वप्रथम इंग्लंडमध्ये जन्माला आली व ती पुढील काळात यशस्वी ठरली. आजचे बँकिंग व अर्थव्यवस्थेचे स्वरूप हे मूलत: ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यवस्थापनावर आधारित आहे. स्पेनच्या आरमाराचा पराभव १० वर्षांपूर्वीच झाला होता. पोर्तुगीज व स्पॅनिश व्यापाऱ्यांनी चीन व हिंदुस्थान व्यापाराला सुरूवात ब्रिटिशांच्या आधी केली. डचांनी त्यांचेच अनुकरण केले. तेव्हा सुवेझ कालवा नव्हता. आफ्रिकेला वळसा घालून हिंदुस्थानकडे जहाजे वळत. स्पेन हा इंग्लंडचा मोठा व्यापारी प्रतिस्पर्धी संपला व एक संधी नियतीने आणून दिली.

चीन ही अफू व चहाची मोठी पेठ होती. हिंदुस्थानातून आसाम व दार्जिलिंगच्या चहाचे ब्रिटिशांनी उत्पादन व निर्यात करण्यास सुरूवात केली. मुळातली ब्रिटिशांची कल्पना वेगळी होती. औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंडच्या उद्योगांना हिंदुस्थान व चीनच्या स्वरूपात फार मोठे गिऱ्हाईक मिळाले. ईस्ट इंडिया कंपनीकडे हा व्यापार व मक्तेदारी आपोआप आली व चहा हे पेय जगात लोकप्रिय होण्याचे सत्र ईस्ट इंडिया कंपनीने राजनैतिक व व्यापारी प्रतिनिधित्व मिळवून केले. कंपनीची कार्यालये जिथे उघडली जात तिथे या व मसाल्याच्या जिन्नसांची मक्तेदारी ब्रिटिशांना मिळे.

मँचेस्टरच्या सूतगिरण्यांसाठी हिंदुस्थानात गिऱ्हाईके मिळविण्याचे ब्रिटिश प्रयत्न तेवढे यशस्वी झाले नाहीत. हिंदुस्थान सिल्क व कापड निर्मितीत एक अग्रेसर देश म्हणून तेव्हा जगात प्रसिद्ध होता. मोगल बादशाह जहांगीर अफूचा शौकीन होता. कॅप्टन विल्यम हॉकिन्स या पाताळयंत्री माणसाने जहांगीर बादशहाचे अफूचे नशाप्रेम लक्षात घेऊन चीनची अफू व चहा आणि पक्क्या मालाचे हिंदुस्थानी गिऱ्हाईक पटकावण्याचा घाट घातला. तो बादशहाला वारंवार उंची मद्य, अफू भेट देई. त्याला जहांगीरने सर्वप्रथम आपल्या घोडदळाचा प्रमुख केले व नंतर सुरत या सर्वात मोठ्या

मोगली बंदरात एक वखार उघडण्याचा परवाना दिला.

त्यावेळी जहांगीरने व्यापाराची सनद जर दिली नसती तर ब्रिटिश साम्राज्याला हिंदुस्थानात पाय रोवणे कठीण झाले असते वा शक्यच झाले नसते. याचे कारण ईस्ट इंडिया कंपनीने सर्वप्रथम वखारीच्या संरक्षणासाठी व नंतर व्यापाराच्या संरक्षणासाठी सैन्याच्या कवायती पलटणी नेमण्यास सुरूवात केली. मोगलांच्या ढिसाळ कारभाराला यातला धोका ओळखता आला नाही हे हिंदुस्थानचे दुर्दैव होते. मोगली अधिकाऱ्यांना वारंवार लाच, उंची मद्य पुरवून कंपनीने आपले ईप्सित साध्य केलेच, परंतु सैन्याच्या मदतीने इथल्या कसबी कलाकार, कारागीर व पिढीजात उद्योगांची वासलात लावली. सुरत येथे इ. स. १६१२ मध्ये ब्रिटिशांनी हिंदुस्थानातील पहिली सूत गिरणी उभारली. या सूतगिरणीपासून ब्रिटिशांनी आपले केवळ व्यापाराचे धोरण बदलून सैन्याच्या पलटणी व त्यांच्या साहाय्याने एतद्देशीय उद्योग, अर्थव्यवस्था, गावागावातला कसबी पूरक स्वयंरोजगार, शेती, उद्योगव्यवस्था खिळखिळी करण्याचे धोरण अवलंबिले. मोगली अधिकारी, व्यापारी, दरबारी अशा हडेलहप्पीकडे एकतर जाणूनबुजून वा अजाणता दुर्लक्ष करीत.

जहांगीर बादशहाच्या व्यसनी, गलथान कारभारामुळे हिंदुस्थानचे पारतंत्र्य जवळ येत गेले.

***

तिमुररूबीचा झटका

तिमुररूबी नावाचे लाल रंगाचे एक रत्न इ. स. १३९८ मध्ये तैमुरलंगाजवळ आले आणि त्याच्या संकट परंपरेला सुरूवात झाली. तिमुररूबी हा ३५२.५० कॅरेट वजनाचा रक्ताप्रमाणे लाल रंगाचा हिरा अशुभ आहे हे तैमुरला ठाऊक होते. चंगीझखानाचा नातेवाईक असलेला तैमुरलंग क्रौर्य, कपट, निधडेपणा यात त्याच्या सवाई होता. ते लाल रत्न पाहताक्षणी त्याला आपल्याला काही बदल होतो आहे अशी जाणीव होऊ लागली. क्षणभर डोके बधीर होतंय असा भास त्याला होऊ लागला. अंगाला कंप सुटला. डोळे ताठ झाले. त्याला आवंढाही गिळता येईना. ' पाणी ' कसंबसं तो उद्गारला. एक घोट घेतल्यावर तो एवढंच म्हणाला, ' या खुदा, क्या देन है तेरी, मैं जरूर रखूंगा ! '

त्याला नको म्हणण्याची प्राज्ञा कुणालाही झाली नाही.

तैमुरनं आपल्या हयातीतल एक कोटी ७० लाख माणसांची हत्या केली. शेकडो शहरे जाळली. लाखो स्त्रियांचे अपहरण केले. तो व त्याच्या सैनिकांनी बलात्कार केले. सततची घोडदौड करीत हजारो किलोमीटरचा भूप्रदेश त्याने पायदळी तुडवला. तुर्कमंगोलिया ते युरोपातील स्पेन देशापर्यंत असं कुठलंही शहर शिल्लक राहिलं नाही, जिथे त्याची टोळधाड पडली नाही. चांगल्या दिसणाऱ्या कुठल्याही नगरीत शिरावं, यथेच्छ कापाकापी करावी. स्त्रियांना उचलावं, उपभोगावं आणि सोडून वा मारून टाकावं. भूक लागली की, मिळतील ती गुरेढोरे कापावीत. झोप वा विश्रांतीची गरज भासली की, कुठल्याही हवेली वा आडोशाला ताणून द्यावे. स्वत:च्या सैनिकांना कसं पोसावं याची त्याला कधी फिकीर पडलीच नाही. असा सर्वत्र हाहाकार माजला आणि रक्तपात झाला याचं कारण त्याच्याजवळचा तैमुररूबी असं समजलं जाऊ लागलं. तैमुररूबीचं काय झालं हे कोडं काही सुटलं नाही.

रशियन वंशतज्ज्ञ मायकेल गेरासिमोव्ह (Anthro pologist) याला या गोष्टीचं खूप कुतूहल होतं. तैमुरलंग एवढा क्रूर का झाला व त्याच्या जवळचा तैमुररूबी कदाचित त्याच्या थडग्यात लपवला असेल या धारणेने त्याने १९४१ मध्ये तैमुरचे थडगे उघडले. त्याचा अस्थिपंजर चांगलाच उंच, धडधाकट, खांदे व छातीचा घेर याची मापे घेऊन त्याने त्याचे रूपचित्र

तयार केले. त्याची शवपेटी, खजिना लपविण्याच्या जागा यांचा मायकेलनं कसून शोध घेतला. तैमुररूबी कुठेही मिळाला नाही. त्याच्या शवपेटीवरची विचित्र वाणी त्याला चक्रावून गेली. ती वाणी काय सांगत होती ?

'मी परत येईन तेव्हा जगाची झोप उडवीन.'

त्यानं तैमुरच्या सांगाड्याकडे एक वेळ पाहिलं. पेशानं शास्त्रज्ञ असलेल्या मायकेल गेरासिमोव्हला तैमुर जिवंत झाला तर अशी भीती वाटू लागली. कशीबशी ती शवपेटी बंद करून तो थडग्याबाहेर पडला तो परत न येण्याचा निश्चय करून. कुठल्याशा म्युझियममध्ये तैमुररूबी कडेकोट बंदोबस्तात आहे असा समज आहे. परंतु असं कुठलंही म्युझियम अजूनही पुढे आलेलं नाही.

***

परकीयांनी पाहिलेले शिवाजी महाराज

थेवनॉट या फ्रेंच प्रवाशाने छत्रपती शिवाजी महाराजांना जवळून पाहिले. ६ ते ९ जानेवारी १६६४ या तीन दिवसात महाराजांनी सुरतेवर धाड टाकली. त्या धावपळीच्या काळात थेवनॉट सुरत शहरात नुकताच आला होता व इकडे तिकडे रमत गमत चालला असताना त्याला घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकू आला. घोडेस्वारांचा एक जथ्था कुठेतरी मोहिमेवर निघाल्यासारखा चालला होता. त्याचे वर्णन व दोन वर्षांनी सुरतला भेट देणाऱ्या एस्कॅलिऑट या ब्रिटिश माणसाचे वर्णन यात साम्य आहे. त्यावरून शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येते.

शिवाजी महाराज गौरवर्णाचे, लहान चणीचे, परंतु अत्यंत सावध, चपळ व्यक्तिमत्त्वाचे होते. त्यांचे डोळे बोलके होते. त्यांच्या चेहऱ्यावर कायमचे स्मित असे. समोरच्या माणसाच्या हृदयाचा ठाव त्यांचे डोळे एखाद्या शिकाऱ्यासारखे घेत. सुरतेच्या धाडीत त्यांनी एक कोटीची लूट केली. ती फार काटेकोर पद्धतशीर नियोजनाने. थेवनॉट म्हणतो, ' त्यांच्या चेहऱ्यावर कसलेही दडपण वा चिंता दिसत नव्हती. '

हेन्री ऑक्झेंडेन दि. ६ जून १६७४ रोजी सुरतेच्या प्रेसिडेंटच्या वतीने शिवप्रभूंच्या राज्याभिषेकप्रसंगी रायगडावर हजर झाला. त्याने महाराजांना नजराणा पेश केला व त्याला अत्यंत जवळून महाराजांचे दर्शन झाले. तो लिहितो -

' शिवाजी महाराज ४७ वर्षांचे असून अत्यंत देखणे आहेत. त्यांच्या चर्चेवरून त्यांची बुद्धिमत्ता व चाणाक्ष वृत्ती लक्षात येते. त्यांची दृष्टी तीक्ष्ण असून नाक सरळ व टोकाशी बाकदार आहे. त्यांचा चेहरा निमुळता, दाढी व मिशी बारीक आहे. '

प्रत्येक प्रसंगाचे नीट आकलन व नियोजन शिवाजी महाराजांनी आधी कित्येक दिवस वा महिने केले. असे काही प्रसंग शिवाजी महाराजांच्या जीवनात नोंदले गेले.

सुरतेहून इंग्रजांचे एक पत्र कारवारच्या त्यांच्या कचेरीत गेले. त्यात त्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या वा तिसऱ्या ठिकाणी असे हवेतून उडण्याची गुप्त विद्या ठाऊक असावी असे म्हटलंय. त्याशिवाय एकाच वेळी ५/७

ठिकाणी दरोडे, लुटालूट कशी करता येईल ? असा प्रश्न विचारलाय ?

शाहिस्तेखान लाल महालात १ लाख सैन्याच्या गराड्यात सुरक्षित बसला असताना शिवाजी महाराजांनी त्याच्या शयनमंदिरात शिरून त्याला पळता भुई थोडी करून त्याची तीन बोटे कापून काढली. आग्र्याहून पलायन करताना आपल्या ७०० मंडळींचे परवाने काढले. आजाराच्या निमित्ताने मिठाई वाटण्याच्या बहाण्याने फौलाद खानाच्या कडक पहाऱ्यातून स्वत:चा एकही माणूस न गमावता ते सुखरूप आले. त्यांची ७०० माणसे परत आली. शेवटी हिरोजी फर्जंद व मदारी मेहतर यांनाही त्यांनी सुखरूप परत आणले. त्यांच्या १६०० कि. मी. एवढ्या दीर्घ प्रवासात त्यांनी वेळ न गमावता ठिकठिकाणी जी केंद्रे निर्माण केली त्यात ताज्या दमाचे बळकट घोडे, त्यांची चंदी व आवश्यक तेवढी माणसे आधीच सर्व तजवीज झाली म्हणून कुठेही अडचण झाली नाही. त्यांना स्वत:साठी असे सुमारे ३५ ते ४० घोडे वापरावे लागले असावेत. ६ ते ९ जानेवारी १६६४ या काळात त्यांनी सुरत लुटले. ते कल्याण, भिवंडी सुभ्यातून १०,००० सैन्यासह नरदुर्ग-माहुली-कोहज मार्गाने सुरतेकडे जाताना वा परत येताना मोगली ठाणी टाळण्याची त्यांची युक्ती सर्वत्र सफल झाली. विशेषत: अशा चौक्या त्यांच्या मार्गापासून फार लांब नव्हत्या. त्यांनी महाराज व त्यांच्या सैन्याची दखल कशी घेतली नाही ? बहुधा तिथल्या पहारेकऱ्यांना शिवाजी महाराजांनी योग्य मोबदल्यात आधीच खिशात टाकले असावे.

कॅरे या फ्रेंच प्रवाशाने शिवाजी महाराज महामानव असल्याचा उल्लेख केला आहे. पॉन्डिचरीचा (पदुचेरी) गव्हर्नर मार्दिन याने शिवाजी महाराजांसारखा दुसरा नेता त्या काळी झाला नाही अशी नोंद आपल्या पत्रव्यवहारात केली आहे.

***

आखरी खत

औरंगजेबाचे ' आखरी खत ' त्याने आझम या पुत्राला लिहिले. यदुनाथ सरकार यांच्या Anecdotes of Aorangjeb यात त्याविषयी सविस्तर माहिती आहे. औरंगजेब जगातला एक सर्वात श्रीमंत सम्राट असल्याचे टॅन्हर्निए, मनुची यांनी आपल्या नोंदीमध्ये लिहिलेय. औरंगजेबाची संपत्ती, जडजवाहिर यांचे तत्कालीन मूल्य करण्यासाठी टॅव्हर्निएला त्याने मुद्दाम बोलावून घेतले. त्याची संपत्ती होती तरी किती ? ३८,६२४६८० पौंड (३०९ कोटी रूपये त्यावेळचे) औरंगजेबाच्या साम्राज्याची व्याप्ती १२.५० लाख स्क्वे. माइल्स.

त्याच्या आयुष्याचा आलेख अत्यंत भीषण, करूण आणि दुर्दैवी आहे असे त्यानेच स्वत: लिहिलेय. त्याच्या आयुष्याची गोळाबेरीज म्हणण्यापेक्षा वजाबाकी त्याने मृत्यूपूर्वी फक्त काही महिने एका पत्रात लिहिली आहे. आपला तिसरा मुलगा आझम याला त्याने फार विस्तृत स्वरूपात जे सांगितलेय त्यातला फक्त थोडासा भाग इथे घेतला आहे. औरंगजेब ३ मार्च १७०७ रोजी मृत्यू पावला. त्यावेळी त्याचे शरीर व मन आणि असंख्य विचारांचे काहूर यांनी तो पूर्णपणे खचून गेला होता. छत्रपती शिवरायांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्राचे स्वराज्य बुडविण्याच्या दुर्दम्य इच्छेने प्रचंड सैन्य व खजिना घेऊन तो महाराष्ट्रात आला खरा, पण महाराष्ट्रात त्याची फक्त पळापळ आणि परवड झाली. कुठलाही विजय, नवा मुलूख त्याला मिळवता आला नाही. दीर्घकाळ दिल्लीपासून दूर राहावे लागल्याने राज्य कारभारावरची पकड ढिली झाली. शरीर साथ देत नव्हते. मन थकले होते. परत जाता येत नव्हते अशा कात्रीत सापडलेला हा सर्वात श्रीमंत सम्राट शेवटचे काही महिने अंथरूणाला खिळला होता. हे सारे त्याने आपल्या पत्रात लिहिलेय. तो म्हणतो, ' खुदानं जगातल्या अत्यंत मोठ्या देशाचा सम्राट होण्याची संधी दिली, पण मी आयुष्यात फक्त पापच केलं. अल्लाची मी पर्वा केली नाही. मृत्यूपश्चात तो मला काय शिक्षा देईल या विचारानेच माझा प्राण कासावीस होतो आहे. स्वत:च्या अहंकारापायी मी कित्येकांना दुखावले. कित्येकांना ठार मारले. त्यात माझे भाऊ, मुले, नातू व त्यांचे नातेवाईक यांची यादी संपता संपत नाही. गेली कित्येक वर्षे

माझी झोप उडाली आहे. कारण मी केलेली दुष्कृत्ये माझी पाठ सोडत नाहीत. खुदा एकदाच संधी देतो. मी त्याचं चीज केलं नाही. गेले कित्येक महिने मी सैन्याचा पगार देऊ शकलो नाही. माझे अनेक अधिकारी व सैन्य मला सोडून गेले. मला बिछान्यावर हलता येत नाही. माझा नोकर नियामतअली माझ्या बिछान्याची साफसफाई करतो व मला स्नान घालून स्वच्छता राखतो. पगाराअभावी तो माझी सेवा कशी करतोय याचंच मला नवल वाटतंय. याक्षणी माझ्याएवढा गरीब मीच असेन.' शेवटचे काही महिने तो कुराणाच्या प्रती स्वहस्ते लिहीत असे. त्यांची विक्री करून मिळालेल्या स्वकष्टार्जित रूपयातून स्वत:ची कबर बांधली जावी, ती उघड्या आकाशाखाली असावी. जी शिल्लक उरेल त्या संपत्तीचे गोरगरीबांना वाटप करावे, अशी इच्छा त्या पत्राच्या शेवटी त्याने व्यक्त केली होती. मृत्यूपश्चात कसलेही सोपस्कार त्याला नको होते. त्याची ही आखरी इच्छा मात्र नियतीने पूर्ण केली.

***

नादिरशाहची शोकांतिका

मोगल सम्राट महंमदशाहचा पराभव करून नादिरशाह अमाप लूट घेऊन परत गेला.(१७३९). त्यापैकी मयुरासनाची किंमत त्याकाळी कित्येक कोटी होती तर कोहिनूरचीही तशीच. नादिरशाहचे हिंदुस्थानातील ४८ दिवसांचे वास्तव्य रक्तरंजित आहे. संपत्तीचा लोभी असल्याने त्याने मोगलांच्या खजिन्यापासून सरदार दरकदार, त्यांचे नातेवाईक, श्रीमंत व्यापारी यांचे गुप्त खजिने व पत्ते मिळविणसाठी जंग जंग पछाडले. रोजची तोडफोड, हवेल्या, वास्तू, इमारती, दर्गे, मशिदी काही म्हणून त्याने निषिद्ध मानले नाही. त्याने किती हवेल्या जाळल्या, माणसे मारली याचा थांगपत्ता कधी लागला नाही. परंतु या लुटीने नादिरशाहची पार शोकांतिका झाली. ज्या त्वरेने त्याने ही लूट मिळवली ती त्याच्या पचनी पडली नाही.. याचे मुख्य कारण मोगलांसारखी खजिने साठविण्याची योजना त्याने लुटीपूर्वी आखलीच नव्हती. एवढे अमाप धन लुटीत मिळेल असं बहुधा स्वप्नातही त्याला वाटलं नसावं.

हिंदुस्थानातून काबूलमार्गे शेकडो बैल वा घोडागाड्यांतून ही लूट नेली जात असता तिच्यावरचे पहारेकरी व त्यांच्यावरचे हेर, कुठे कुठे मुक्काम यात दिवसरात्री झोपेविना जात होत्या. संपत्ती लुटणे सोपे, परंतु ती बंदोबस्तात वाहून नेणे किती धोकादायक आहे हे त्याला कळून चुकले. सरदार, नोकरचाकर, सैनिक अशा सर्वांच्याच नजरेला हा खजिना रोज पडे आणि त्यांचे डोळे फाटून जात. इतकी संपत्ती आपण वाहून नेतो खरी, पण आपल्या वाट्याला यातलं सहजासहजी काहीही येणार नाही हा बोचरा विचार त्या सैनिकांना रोज सतावी. हिंदुस्थानात स्वत:चे साम्राज्य स्थापन करण्याची एक सुसंधी बाबरानंतर त्याच्याकडे चालून आली होती. ती या संपत्तीच्या मोहापायी त्याने वाया दवडली. इतका दूरचा विचार त्या रांगड्या शिपायाला सुचणार तरी कसा ? त्याच्या मायदेशीही त्याचे प्रशासन स्थिर नव्हते. त्याच्या आधी, पश्चात बंडाळ्या नित्याच्याच असत. त्याचे राज्य शासन कसे टिकले असेल तोच जाणे, परंतु तो या बंडाळ्यांना पुरून उरला व त्यात त्याने शेजारच्या तुर्क राष्ट्रावर आल्या आल्या हल्ला करून तिथल्या शाहचा पराभवही केला. परत लूट, परत तसाच संपत्ती ओघ, परत तीच

जीवघेणी वंचना, तोच अविश्वास, त्याच बुभुक्षित नजरा या दुष्टचक्रात नादिरशाह बहुधा अडकून पडला. त्यात त्याचा बराच शक्तिपात झाला. त्याचे मन:स्वास्थ्य बिघडून गेले असावे. १७४६ साली एका बंडाळीचे पारिपत्य करताना नादिरशाहचा खून झाल्याची नोंद इतिहासात झाली. हिंदुस्थानातील अमाप लूट हे त्याचं एक कारण असावं.

***

दोन राष्ट्रगीतांचा जनक !

रवींद्रनाथ टागोर यांनी केवळ हिंदुस्थानचे जनगणमन हे राष्ट्रगीत लिहिलेले नाही तर बांगलादेशचे ' अमार सोनार बांगला ' हे बंगाली राष्ट्रगीतही त्यांनीच लिहिले आहे. जगातल्या दोन स्वतंत्र राष्ट्रांची राष्ट्रगीते लिहिणारे रवींद्रनाथ टागोर हे एकमेव आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कवी, चित्रकार, संगीतकार व्यक्तिमत्त्व हिमालयाच्या उंचीचे आहे. त्यांच्या गीतांना राष्ट्रगीत म्हणून बहुमान स्वीकार हा त्यांच्या निधनानंतर (१९४१) वरील राष्ट्रांनी अधिकृत म्हणून दिला.

सध्याचा काळ मोठा कठीण आहे. हिंदुस्थानचा इतिहास व पाठोपाठ भूगोलही बदलण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक होताना आपण पाहत आहोत. अरूणाचल गायब. अफझलखान इतिहासातून गायब. हिंदुस्थानचा इतिहास आणि भूगोल आतापर्यंत चीन व पाकिस्तान नकाशात बदलत होता, पण स्वदेशात कोणाला माहीतही नसलेली मंडळी कुठल्याही अधिकृत मंडळातून मग तो इतिहास असो, साहित्य असो, भूगोल असो. संस्कृती असो. धिटाईने बदलू लागली आहेत.

' जनगणमन ' हे गीत रवींद्रनाथ टागोरांना १९११ साली स्फुरलं. त्यावेळी भारतवर्ष अखंड देश म्हणून सर्व परिचित होता. कवीला हिंदुस्थानातील विविध प्रदेशांचे सांस्कृतिक महत्त्व सांगायचे असल्याने पंजाब सिंध गुजरात मराठा द्राविड उत्कल वंग या ओळी स्फुरल्या. तेव्हा पाकिस्तानचा जन्मही झाला नव्हता. स्वातंत्र्यानंतर उर्वरित हिंदुस्थानने राष्ट्रगीत म्हणून कायदेशीरपणे जनगणमन या गीताची निवड केली. सिंध आता हिंदुस्थानचा भाग नाही म्हणून त्याऐवजी सिंधू असा बदल करण्याची उठाठेव कोर्टाचा हवाला देऊन झाली. सुप्रीम कोर्ट व मुंबई हायकोर्टाच्या तत्कालीन खंडपीठाच्या न्यायमूर्तींनी (रंजना देसाई व आर. जी. केतकर) योग्य तारतम्य दाखवून वेळीच चुकीचा शब्दच्छल व त्यायोगे होणारी रवींद्रनाथ टागोर व त्यांच्या गीताची संभाव्य परवड थांबवली. न्यायसंस्था जागृत असेल तर असंही होऊ शकतं.

***

युनियन जॅकचे अधोवदन

ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नसे असे १८५७ नंतर हिंदुस्थानात स्थिरस्थावर झालेले ब्रिटिश राज्यकर्ते म्हणत. रावबहादूर, आयसीएस, कलेक्टर, प्रांत, मामलतदार या शिडीवर चढत गेलेले नेटिव्ह अधिकारी नेकीने मिळेल तेथे गोऱ्या कातडीच्या माणसाच्या पुढे-मागे करण्यात धन्यता मानीत.

१८५७ मध्ये ब्रिटिशांनी लखनौ रेसिडन्सी या त्यांच्या कार्यालयावर युनियन जॅक रीतसर फडकवून त्यांच्या साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली. १५ ऑगस्टला (१९४७) सत्तांतर होण्यापूर्वी काही राजनैतिक गोष्टींचे पालन होणे आवश्यक होते. त्या प्रथेनुसार १३ ऑगस्ट रोजी ;नियन जॅक जिथे प्रथम फडकला त्या लखनौ रेसिडन्सीवरून तो खाली : तरवण्याचे ठरले. ब्रिटिशांनी या प्रसंगाबद्दल अत्यंत गुप्तता पाळली. ध्वज उतरवणे म्हणजे साम्राज्याचा अस्त पाहणे आणि अनुभवणे. ब्रिटिशांच्या सर्वच गोष्टींना ब्रिटिशांचाच चष्मा लागत असल्याने काही मोजक्याच ब्रिटिश मंडळींना आदल्या रात्रीच्या वेळी खास निमंत्रण गेले. १३ ऑगस्ट १९४७ रोजी दुपारी युनायटेड प्रॉव्हिन्सचे (त्यावेळचा संयुक्त प्रांत म्हणजे उत्तर प्रदेश) गव्हर्नर सर फ्रान्सिस वायली यांनी मोठ्या जड अंत:करणाने युनियन जॅक खाली उतरवला. आयुष्यातून एखादी व्यक्ती निघून जावी इतक्या गूढ शांततेत वायली तेथून निघून गेले आणि नंतर त्यांचे सहकारीही. हिंदुस्थानचा तिरंगा (चरखा असलेला) दिल्लीतील लाल किल्ल्यावर सरोजिनी नायडू यांनी सूर्याला साक्षी ठेवून ध्वजारोहण व वंदन केले. स्वतंत्र हिंदुस्थानचे पहिले ध्वजारोहण व वंदन. त्यानंतर अनेक ध्वजवंदने अनेक ठिकाणी शाही इतमामात पार पडली.

***

स्वातंत्र्याच्या सीमेवर

१५ ऑगस्ट १९४७ च्या स्वातंत्र्याची पहाट कशी उगवली ? कोण होते साक्षीदार ? काय पाहिलं त्यांनी. राजकीय, सामाजिक कला अशा विविध क्षेत्रात कोण मंडळी काय करीत होती. ६५ वर्षांनी त्याची एक झलक पाहणे मनोरंजक आहे.

स्वातंत्र्याच्या पहिल्याच दिवशी ' शहनाई ' व ' मेरा गीत ' हे दोन चित्रपट प्रकाशित झाले. शहनाईत रेहाना व नासीर खान ही त्यावेळची नुकतीच चित्रसृष्टीत पाऊल टाकलेली जोडी होती. सी. रामचंद्र यांची गाणी बॉक्स ऑफिसवर जबरदस्त हिट झाली. ' जब दिल को सताए गम तू छेड सखी सरगम ', ' बाजे शहनाई हमारे अंगना ' या गाण्यांनी पुढे वर्षभर अनेक सभासंमेलने रस्तोरस्ती तरूण-तरूणींवर भुरळ घातली. कथानकापेक्षा गाण्यांवर चित्रपट कसा हेलावून टाकतो हे सी. रामचंद्रांनी दाखवून दिले. सुरैया आणि बेगम पारा, करण दिवाण, नसीम या चित्रचंद्रिका आणि तारे स्वातंत्र्याच्या सीमेवर आपली नावे कोरून गेले.

महात्माजींनी नाइलाजाने विघटित स्वातंत्र्याला अखेर मान्यता दिली. पंतप्रधानपदासाठी निवड होण्यायोग्य ठरलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांचं नाव बाजूला पडलं व पंडित जवाहरलाल नेहरूंचे नाव शेवटच्या क्षणी महात्माजींनी पसंत केले व १५ ऑगस्ट १९४७ रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंनी हिंदुस्थानचे पहिले पंतप्रधान म्हणून सत्ताग्रहण केले. सरदार पटेल गृहमंत्री झाले. त्यांनी ५६२ संस्थाने मोठ्या मुत्सद्दीपणाने हिंदुस्थानात विलीन करून आपले गृहमंत्रीपद सार्थकी लावले. ते पंतप्रधान झाले असते तर ? नियती त्यांच्या का आड आली ? हा विचार आजही सतावतो. आजच्या हिंदुस्थानचा भूगोल आहे त्याहून वेगळा असता का ?

***

धारवाडी लुगडी

महाराष्ट्रात कोणे एकेकाळी धारवाडी लुगडी सर्वच घरातील बायका वापरीत. आम्ही तेव्हा कोल्हापूरला होतो. कधी कधी आम्ही मुंबईला यायचो. माझ्या काकांकडे हिंदू कॉलनीत आमचा महिना जायचा. वडिलांच्या नोकरीमुळे आम्ही विजयदुर्ग, कोल्हापूर, पुणे, पनवेल, मुंबई गाठली. परिसर म्हणाल तर काही मोठासा नाही. धारवाडी लुगडी, पाटे-वरवंटे, दोरवा मणीपासून पेशवेकालीन उच्च कुलीन, मध्यमवर्गातील स्त्रियांमध्येही सारखीच प्रिय होती हे आज मला सांगावसं वाटतं वा लागतंय. तुम्ही ' रामशास्त्री ' सिनेमा बघितला असेल तर राघोबाच्या आनंदीबाईची भूमिका करणाऱ्या ललिता पवार यांनी धारवाडीत आनंदीबाई साकारली होती. ' माणूस ' सिनेमात पोलिसाच्या आईने धारवाडीत ' सोड सोड हे नरा व्यर्थ न हो काळ वेळ ' हे भजन म्हटलंय. पोलीस होते शाहू मोडक. नायिका होत्या शांता हुबळीकर.

जंगम लुगडीवाले मिरची गल्लीच्या टोकाशी असलेल्या छोटेखानी दुकानात मध्येच एक पाटी लटकावीत ' धारवाडी खण लुगडी आली आहेत' मग त्यावेळची आपटे, पटवर्धन, आगाशे, लोंढे मंडळी स्टॉक संपेपर्यंत हुज्जत घालत; पण एखादा नग खरेदी करत. जंगम धारवाडचे लिंगायत स्वच्छ आंघोळ, करवती काठाचे धोतर, झब्बा, कपाळावर लाल, पिवळसर काजूच्या आकाराचे गंध लावून त्यांच्या वळचणीतल्या दुकान लुगड्यांचे नग (साडी म्हणू नका) उघडून दाखवीत. कोनफळी, मोरपिशी, केळफुली गर्द हिरव्या, काळ्या, निळ्या खडीच्या लुगड्यांची शान काही वेगळीच असे. सर्व दुकानभर त्या लुगड्यांचा पायरव आणि कोरा वास दरवळत असे.

साठ वर्षापूर्वीची खडीदार, धारवाडी रूंद काठाची लुगडी, ठसठशीत लाल कुंकू प्रसाधनाची शान वाढवीत. तालेवार घराण्यावरील स्त्रिया लाकडी पेटीतला आरसा उभा करून स्वत:ला न्याहाळत असत. आज मुंबईतच काय कोल्हापूर, निपाणी, बेळगाव यासारख्या धारवाडी साड्यांच्या जन्मगावीही त्या कुठे दिसत नाहीत. आताच्या जमान्यात त्या कुणाला माहीतही नाहीत.

***

रणगाड्यांचे कब्रस्तान

पाकिस्तानच्या रणगाडा दलात १९६५ मध्ये पॅटन टँक या अमेरिकेच्या अत्याधुनिक रणगाड्याची भर पडली. त्यावेळी हिंदुस्थानकडे दुसऱ्या महायुद्धातील सेंच्युरियन रणगाडे होते. पाकिस्तान हिंदुस्थानची काहीना काही कांगाळी करून हे नवे अद्यापि न वापरलेले, पण संहारक रणगाडे निश्चित वापरणार हे सैन्य दलाला ठाऊक होतं. पाकिस्तानचा अपेक्षित ' रणगाडा हल्ला ' खेमकरण क्षेत्रातूनच होईल याची खात्री होती. खेमकरण-भिकिविंड-अमृतसर-चीमा रस्त्याच्या आजूबाजूला ऊस व कापूस याचे गच्च पीक क्षेत्र होते.

शत्रूला फसवण्यासाठी काहीतरी योजना त्वरित आखणे गरजेचे होते. लाहोर शहराला इच्छोगील कालव्याचे पूर्ण संरक्षण होते. पाकिस्तानने तिथे अभेद्य पिल बॉकसेसचा कडेकोट बंदोबस्त केला होता. हिंदुस्थानचे जुने सेंच्युरियन रणगाडे दोन्ही क्षेत्रात कुचकामाचे ठरतील अशी पाकिस्तानची कल्पना होती. पाकिस्तानच्या दृष्टीने रणगाडे घुसविण्यासाठी खेमकरण भिकिविंडची निवड झाल्याची गुप्त बातमी आली आणि अस्सल उत्तर व चीमा या ऊस शेतीच्या क्षेत्रात भारतीय सेना दलाने आपले रणगाडे आधीच आणून उभे केले. उसाच्या उंचीमुळे रणगाड्यांचे अस्तित्व पाकिस्तानला एकतर कळले नाही वा भारतीय सेनादलाकडून अशी कारवाई त्वरित होईल याची कल्पना त्या क्षेत्रातील पाकिस्तानी मेजर जनरल नासीर अहमदखान याला नव्हती. त्याच्याजवळ ३०० हून अधिक पॅटन रणगाडे होते. त्याने अतिउत्साहाच्या भरात आपल्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पाठवलेले संदेश (गुप्त संदेश) पकडण्याची व्यवस्था हिंदुस्थानच्या संरक्षण यंत्रणेने आधीच केल्याने पाकिस्तानचे सैन्य कुठे घुसेल याची अचूक कल्पना हिंदुस्थानला आली. त्याप्रमाणे तोफखाना रिकॉइललेस गन्सधारी जीप्स आजूबाजूच्या रस्त्यालगत शेतात लपून बसल्या. युद्ध तयारीच्या थोड्या आधी आजूबाजूचे पाणी वाहणारे कालवे मुद्दाम तोडण्यात आले. चिखल व पाण्यामुळे त्या क्षेत्रात शिरणारे पाकिस्तानी रणगाडे अडकून पुढे जाऊ शकणार नाहीत याची व्यवस्था झाली. फसलेले रणगाडे नीट मारगिरी करू शकणार नाहीत व आयतेच भक्ष्यस्थानी पडतील हा डाव यशस्वी झाला.

सप्टेंबर ८, १९६५ ते सप्टेंबर १० या दोन दिवसात तुंबळ युद्ध झाले. क्वार्टर मास्टर अब्दुल हमीद या हिंदुस्थानी जवानाने एकट्याने ३ पॅटन टँक्स उद्ध्वस्त केले. त्याच्या सहकाऱ्यांनी ४ पॅटन टँक्सचा फडशा पाडला. अब्दुल हमीदचा चौथा टँक उडविण्याच्या प्रयत्नात गोळी लागून मृत्यू झाला. त्याला मरणोत्तर परमवीर चक्र देऊन गौरविण्यात आले. पाकिस्तानचे १०० रणगाडे दोन दिवसात नाकाम झाले. आज या ठिकाणाला पॅटन नगर किंवा टँकोका कब्रस्तान हे नाव आहे. इथे खलास केलेले पाकिस्तानी रणगाडे व क्वार्टर मास्टर अब्दुल हमीदचे स्मारक त्याच्या पराक्रमाची स्मृती जागवीत आहेत.

***

वाघा सीमा

वाघा नावाचं गाव कधीकाळी एक सुंदर हिरवंगार टुमदार घरांचं गाव होतं. रॅडक्लिफ कमिशनवर हिंदुस्थान-पाकिस्तानची सीमा निश्चित करण्याची जबाबदारी ब्रिटिश शासनाने १९४७ साली सोपवली. अमृतसर व लाहोर या दोन्ही शहरात शेती, महसूल, आठवड्याचा बाजार, जनावरांची खरेदी-विक्री, शेतीची अवजारे, काम करणारे मजूर, शासकीय अधिकारी, व्यापारी यांची जी काही वर्दळ होई त्यात वाघा येथून जाणारी कच्ची सडक हा एक रस्ता व आजूबाजूची सटरफटर दुकाने व २/४ धाबे यात गरम रोटी, पराठे आणि लज्जतदार मटण व फुल ग्लास लस्सीसाठी ये-जा करणाऱ्या माणसांची दिवसाचे बाराही तास गर्दी असे. नुसतं रेंगाळत उभं राहाणारी माणसं घोळक्यानं दिसत असे. फार प्रसन्न वाटे.

रॅडक्लिफ कमिशनने या गोष्टी लक्षात घेऊन वाघाची आंतरराष्ट्रीय सीमा ठाणे म्हणून निवड केली. लाकडी चेकपोस्ट आणि कुंपणाच्या लाकडी फळ्या बसवण्यासाठी परकी माणसे व वाहने हिंदुस्थानच्या व पाकच्या बाजूने अचानक वाघाच्या उत्तर व दक्षिण दिशेकडून येताना लोकांना दिसू लागली. सीमा ओलांडण्यासाठी प्रशासकीय व्यवस्थापनासाठी शिक्के मारून घेणे क्रमप्राप्त झालं. लष्करी वाहने व पोलीस व्हॅन्स दिसू लागल्या. १९५९ साली या तात्पुरत्या व्यवस्थेला आंतरराष्ट्रीय सीमा संबंधाचे अधिकृत स्वरूप दिले गेले. त्यामुळे वाघा हे ठिकाण दोन देशांतील जमीन वाहतुकीचे खुले द्वार व ठाणे ठरवले गेले व हिंदुस्थानच्या बाजूने बॉर्डर सिक्युरिटी फोर्स व पाकच्या बाजूने पाकिस्तान रेंजर्सचे सैनिक आपापल्या सीमा क्षेत्रात कवायत करीत जाताना दिसू लागले. इमिग्रेशन आणि कस्टम्सची पक्क्या बांधणीची कार्यालये उघडली गेली. काही महिन्यांपूर्वीची भुरळ पाडणारी मटन-लस्सीची चव, टपऱ्या, धाबे, दुकाने आणि इकडे तिकडे रेंगाळणारी माणसे कुठे आणि कधी नाहीशी झाली कळलंच नाही.

दोन्ही बाजूंच्या सैनिकांनी महाद्वार उघडताना ध्वजारोहण व संध्याकाळी ते बंद करताना जॉइंट ड्रील करण्याचा नियम केला गेला. त्याला रिट्रीट सेरिमनी हे नाव दिले गेले (१९५९). या समारंभाचे उभयपक्षी

पाळण्यात येणारे वैशिष्ट्य असे की दोन्ही देशांचे २ सैनिक विरूद्ध बाजूने एकमेकांसमोर लष्करी पद्धतीने मार्च करीत येतात. त्यांच्या चेहऱ्यांवर व हालचालीत वीरश्रीचा जोश व गांभीर्य असते. जमिनीवर लत्ताप्रहार केला जातो. याचा अर्थ आक्रमणाला चोख उत्तर दिले जाईल असा आहे. हा रिट्रीट पाहणे हा एक थरारक अनुभव आहे. महाद्वार बंद करताना दारावरही लत्ताप्रहार करतात. दर दिवशी सुमारे १५००० नागरिक दोन्ही सीमेवर हे दृश्य पाहण्यासाठी जमतात.

वाघा सीमेपुरते वीरश्रीचे प्रात्यक्षिक आम्ही करतो. बाकीच्या सीमेचे काय ? रणांगणावर हिंदुस्थान-पाकमध्ये चार अधिकृत युद्धे झाली. छोट्या-मोठ्या गोळीबाराच्या शेकडो घटना झाल्या. या गोळीबारांना युद्ध म्हणता येत नाही. याचा फायदा फक्त पाकिस्तानला होतो. कसाबसारखे शेकडो आतंकवादी पाकिस्तानने हिंदुस्थानात गेल्या साठ वर्षात घुसवले. सीमेवरचे त्यांचे ट्रेनिंग कॅम्पवरील सर्व युद्धप्रसंगी संधी असूनही हिंदुस्थानाने नेस्तनाबूद केले नाहीत. युद्धात तीन वेळा आम्ही कारगील पाकिस्तानच्या ताब्यातून खेचून घेतले. हजारो सैनिक हिंदुस्थानने गमावले. पाकिस्तानची मनुष्यहानी त्यामानाने काहीच नाही. युद्ध जिंकायचं आणि तहात हमखास हरायचं. काय म्हणावं हिंदुस्थानी राजकारण्यांच्या निष्क्रियतेला ?

***

दौलतबेग ओल्डी

अलीकडेच लडाखमध्ये दौलतबेग ओल्डी सेक्टरमध्ये १७ कि. मी. आत शिरलेल्या चिनी सैनिकांची संख्या होती सुमारे ५०. जसे १९६२ साली आले तसेच. त्यावेळी ते संख्येने जास्त होते. युद्धाच्या तयारीनेच आले होते. पंचशीलचा नारा ताजा असताना ' भाई भाई 'च्या घोषणा, आणाभाकाच त्यावेळी सर्वत्र ऐकू येत. १९५९ सालापासून चिनी लष्करी माणसे दिसायला लागली होती. चीन त्या भागात लष्करी वाहतुकीयोग्य रस्ते बांधू लागला होता. त्याही बातम्या वर्तमानपत्रांतून येत. आमचे शास्ते म्हणत, ' जिथे गवतसुद्धा उगवत नाही त्याची चिंता कशाला ? ' व्हायचं तेच झालं. १९६२ मध्ये अक्साई चीन आमच्या हातून कधी गेला जनतेला कळलंच नाही. त्यावेळी कुमाऊ रेजिमेंटच्या मेजर शैतान (सैतान) सिंगजवळ १२३ जवान होते. अपुरी शस्त्रे, तीही जुनाट, लष्करी वाहतुकी योग्य रस्ते नव्हते (आजही नाहीत.) कडाक्याची थंडी, अंग गोठवणारे हवामान, अन्नपुरवठा अपुरा. अशा हवामानात लढण्याची प्राथमिक पूर्वतयारी, कपडे, बूट, औषधांचा साठा याकडे झालेले राजकीय आणि प्रशासकीय दुर्लक्ष भोवले. मेजर शैतान सिंगने रेझांगला पास या दुर्गम ठिकाणी १००० चिनी सैनिकांना कंठस्नान घातले. तो स्वत: व १०९ सैनिक हुतात्मा झाले. ९ जखमी पकडले गेले. त्यातले किती परत मायदेशी आले ठाऊक नाही.

ही दुसरी वेळ आहे दौलतबेग ओल्डीची. १९६२ साली चिनी राजकर्त्यांचे ईप्सित एक महिन्यात साध्य झाल्यावर त्यांनी माघार, तीही एकतर्फी घेतली. यावेळी त्यांच्या छोट्या तुकडीने १५ दिवस मुक्काम केला गवत नसलेल्या दौलतबेग ओल्डीत. आम्ही पूर्वानुभवावरूनसुद्धा बेसावधच होतो. त्या सेक्टरमध्ये ते आणखी २० कि. मी. आत शिरले. ६० वर्षांनंतरही दौलतबेग ओल्डीच्या डोंगरकपारीत गवत उगवत नाही. आमच्याच प्रदेशात आमची कायमस्वरूपी लष्करी ठाणी मागे हटवायची, की ठेवू द्यायची हे चीन व पाकिस्तान ठरवणार. ब्रह्मपुत्रेवर सहा धरणं चीन बांधतोय. आम्ही ढिम्म. निषेध नाही. युनो नाही. पाकिस्तान रोजच आमचा रक्तपात घडवतोय. ओसामाला खतम करताना अमेरिकेने जगाला विचारलं का ? आम्ही कुणाची का पर्वा करावी ?

***

पाकिस्तानचे पाणी बंद करा

डब्ल्यू. इमरझील नेदरलॅण्डस् यांचा एक अहवाल वॉशिंग्टनहून प्रसिद्ध झाला आहे. पाकिस्तानने नुकतेच आमचे पाच जवान पूछ सेक्टरमध्ये घुसून ठार मारले. पाकिस्तानच्या या औचित्याला आम्ही काय उत्तर देणार यावर वृत्तपत्रे व दूरचित्रवाणीवरच्या सर्वपक्षीय चर्चा सत्रांतून हिंदुस्थानने निश्चित काय पाऊल उचलावे याबद्दलच संभ्रम आहे. कुणीही हे सांगत नाही.

वरील अहवालातून आपण काय त्वरित करू शकतो याची स्पष्ट रूपरेषा मिळते.

पाकिस्तान आजही शेतकऱ्याला धान्य पिकविण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध करून देत नाही. जलव्यवस्थापन सदोष असल्याने शेतीसाठी उपलब्ध होणारे पाणी फक्त ४० टक्केच वापरले जाते. पाकिस्तानात लोकशाही कधीही बळकट झाली नाही. ती व्हावी अशी इथल्या राजकारणी वा लष्करशहांची इच्छा नसल्याने समाजजीवन ठप्प झाले आहे. तो अहवाल म्हणतो,

Of all available water only 50% is utilized for drinking and sanitation of 180 million people of Pakistan. More than 55 million Pakistanis have no access to clean water.

आपल्या शेतकऱ्यांची पर्वा पाकिस्तानला नसल्याने पाकिस्तानच्या नकाशातील सिंध, बलुचिस्तान आणि वायव्य सरहद्द प्रांत फुटून स्वतंत्र होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. स्वात हा प्रांत पाकपासून फुटून निघाला आहे. आणखी काही वर्षांत पाकिस्तान नावाचे अस्तित्वात आलेले राष्ट्र एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून किती वर्षे तग धरील हे सांगता येणार नाही. दुसऱ्याच्या जीवावर उठलेल्या पाकिस्तानच्या अस्तित्वाकडे आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेच्या कर्जावर जगणारे दिवाळखोर राष्ट्र इतकीच किंमत राहिली आहे. ओसामाला अमेरिकेने अबोटाबादला स्वत:चे लष्कर पाठवून ठार मारले. त्यावेळी पाकिस्तानचे राजकारणी, लष्करशहा व तालिबानी अमेरिकेचे काहीही वाकडे करू शकले नाहीत.

पाकिस्तानकडे १०० ॲटमबॉम्ब आहेत व अफगाणिस्तानातून

अमेरिका पुढल्या वर्षी बाहेर पडल्यावर तालिबानी व दीड लाख पाक लष्कर मोकळे होऊन ते हिंदुस्थानवर चालून येतील असे राजकारण्यांनी वा विचारवंतांनी टी. व्ही. वर सांगून चर्चेचे न संपणारे गुऱ्हाळ चालू ठेवावे हे कशासाठी सांगता ? तुम्हाला याहून वेगळं काही का सुचत नाही ? पाकिस्तानला स्वत:च्या अस्तित्वाची काळजी नाही. आम्ही त्यांना फुकटचे रोज ५५,००० क्युसेक्स पाणी १९६० च्या करारानुसार देण्याचा एकतर्फी चांगुलपणा का करीत आहोत ? तुम्ही निधर्मी अहिंसावादी (भित्रे ?) आहात का ?

कुठल्याही राष्ट्राच्या दडपणाला न घाबरता, सिंधू व तिच्या उपनद्यांचे (झेलम, चिनाब) कालवे व पाटबंधाऱ्याचे पाणी बंद करा. नाक दाबल्याखेरीज त्यांचे तोंड उघडणार नाही. त्यांच्या मर्कटचेष्टा थांबतील. पाणी हे जीवन आहे. पाकिस्तानला जाणाऱ्या पाण्याचे मूलस्रोत हिंदुस्थानच्या हिमालयात आहेत. अमेरिका वा चीन आमचं काही वाकडं करू शकणार नाही असं स्वत:ला सांगून कृती करा, तयारीत रहा.

***

पाकिस्तानचे पाणी थांबवा !

शिशुपालाची १०० पापे भरली. श्रीकृष्णाने त्याला तोपर्यंत आपण काही कृती करणार नसल्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर मात्र श्रीकृष्णाने त्याला दयामाया न दाखवता सुदर्शन चक्र सोडून त्याचा वध करण्यात कचुराई केली नाही. पाकिस्तानची पापे भरली आहेत. पाकिस्तानात सैन्य घुसवून त्याचे परत एकदा विघटन करण्याची वेळ आली आहे. ते विघटन कसे व का होईल यावर खरे तर वृत्तपत्रे व प्रसिद्धी माध्यमे यावर जबाबदार केंद्रीय व राज्यपातळीवरील राजकारणी व्यक्ती, टीकाकारांनी भाष्य करणे आवश्यक होते. पाकिस्तानशी हिंदुस्थान युद्ध करणार नाही ही तबकडी पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्र्यांनी इतक्या वेळा वाजवली आहे की, बस झाला तुमचा नाकर्तेपणा हे सांगण्याची वेळ आली आहे. अर्थात, युद्धाव्यतिरिक्त इतर पर्यायांचा तुम्ही विचार केला आहे ते सांगा.

वॉशिंग्टनचा अहवाल म्हणतो -

' Pakistan has some of the lowest per capita water availability in Asia. go to 95% of available water is used for agriculture that of other developing contries is between 70% and 75% (Maria Otero). This leave's only 50% of water for drinking and sanitation of 180 million people of Pakistan. More than 55 million Pakistanis have no access to clean water. '

पाकिस्तानचे जलव्यवस्थापन सदोष असल्याने शेतीसाठी मिळणारे व इतर असे फक्त ४०% पाणीच पाकिस्तान प्रत्यक्ष वापरू शकतो. बाकीचे पाणी योजनांचा अभाव असल्याने वाया जाते. वा जमिनीत झिरपून फुकट जाते. अलीकडचे हवामान सिंधूचा जलस्रोत पूर्वीसारखा राहिलेला नाही. हिमालयाच्या पाण्यावर अवलंबून राहणाऱ्या सर्व देशांना पाण्याचे दुर्भिक्ष यापुढे जाणवणार आहे. (W. Immerzeel Nedarlands)

पाकिस्तानने स्वत:ची आर्थिक उन्नत्ती करण्यावर गेल्या ६० वर्षांत लक्ष न दिल्याने मूलत: शेतीप्रधान असलेल्या या राष्ट्रामध्ये आज वाईट

स्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानात लोकशाही कधी बळकट झाली नाही. आजही व पूर्वीही लष्कराचेच वर्चस्व पाकिस्तानच्या देश-विदेश नीतीमध्ये कायम राहिले.

ओसामाला अमेरिकेत ओबोटाबादला स्वत:चे लष्कर पाठवून ठार मारले व समुद्र समाधी दिली. त्यावेळी पाकिस्तानचे राजकारणी व लष्करशहा व तालिबानी अमेरिकेचे काहीही वाकडे करू शकले नाहीत वा पाकिस्तानची मित्र असलेली अरब राष्ट्रे व चीन त्याच्या मदतीला धावून आले नाही. अमेरिकेला स्वहित जपण्यामध्ये कुठलीही आंतरराष्ट्रीय बंधने, करार आडवे आले नाहीत. अशा वेळी १९४८ ते १९६० चा ' इंडस वॉटर ट्रीटी करार ' एकतर्फी पाळण्याची बंधने हिंदुस्थानने का कुरवाळीत बसावीत? पाकिस्तानने सिमला करार मोडीत काढला. त्या आधीचे सर्व करार व नंतरचे लवाद यांना पाकिस्तानने वाटाण्याच्या अक्षता लावल्या. मंगला तारबेला या धरणांच्या पाणी साठवण्यात कमी पाऊस, कमी जलस्रोत यामुळे पंजाब सोडून सिंध, बलुचिस्तान व वायव्य सरहद्द प्रांत या राज्यांना शेतीलाही पाणी पुरविण्यात राजकीय हस्तक्षेपांमुळे अडचणी येत आहेत. या तिन्ही राज्यांतील शेतकऱ्यांना त्यांच्या वाट्याचे पाणीही पाकिस्तानी राजकारणी व लष्करशहा मिळवून देऊ शकत नाहीत. समाजजीवन ठप्प झाले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात पाकिस्तान हे फक्त अमेरिकेच्या कर्जावर जगणारे एक दिवाळखोर राष्ट्र म्हणून ओळखले जाते. सिंध, बलुचिस्तान आणि वायव्य सरहद्द प्रांत कधीही फुटून स्वतंत्र होतील याची भीती तिथल्या लष्करशहांना वाटते. पण स्वत:चे स्थान टिकविण्यासाठी हिंदुस्थानच्या कुरापती काढत, काश्मीरचे होमकुंड चालू ठेवणे व हिंदुस्थानात आतंकवादी घुसवून तिथल्या गरीब जनतेचे लक्ष व क्षोभ दुसरीकडे वळविण्याखेरीज दुसरा कुठलाही पर्याय पाकिस्तानकडे नाही.

पाकिस्तानला स्वत:च्याच शेतकऱ्यांची पर्वा नाही. स्वात हा पाक प्रांत आज फुटून स्वतंत्र झाल्यासारखाच आहे. आणखी काही वर्षात पाकिस्तान हे राष्ट्र म्हणून कदाचित उरणारही नाही. त्याचं काय होईल वा व्हावं हा हिंदुस्थानचा दृष्टिकोन असण्यास वा काळजी असण्याचं वा अमेरिका म्हणते म्हणून आमचा धाकटा भाऊ म्हणून गोंजारत बसण्याचे आम्हाला कारण नाही. पाकिस्तानचे विघटन ही काळाची गरज आहे. तरच हिंदुस्थानला जगता येईल.

पाकिस्तानला जाणाऱ्या पाण्याचे मूलस्रोत हिंदुस्थानात

हिमालयात आहेत. सिंधूचे पाणी अडवले व तिच्या उपनद्या असलेल्या झेलम व चिनाब यांचे कालवे व पाटबंधारे यांचे पाणी काश्मीरकडे वळविले तर पाकिस्तानचे प्राण कंठाशी येतील. युद्धाची पाकिस्तानची खुमखुमी जिरून जाईल.

***

आम्ही प्रकाशित केलेली शैक्षणिक पुस्तके

✡ कृ. भा. परांजपे
आयुष्याचे गणित अचूक
कसे सोडवाल ?
अथर्वशीर्षातून व्यक्तिमत्त्व-
विकासाचे नऊ संस्कार

✡ सौ. विद्या फडके
साधे सोपे शालेय निबंध
(इ. १ व २)
साधे सोपे शालेय निबंध
(इ. ३ व ४)
शालेय वाक्प्रचार आणि म्हणी

✡ द्वारकानाथ राघोबा तर्खडकर
मनोरमा-तर्खडकर
भाषांतर पाठमाला

✡ डॉ. अरुण देशमुख
शालेय योगासने
ज्युदो
खोखा
जागतिक कीर्तीचे १५५ खेळाडू

✡ बाळ सडवेलकर
१०वी, १२वी नंतरचे कोर्सेस
डोके लढवा ... पैसे कमवा !

✡ अवधूत वि. शेंड्ये
आता सभा गाजवा !

✡ सौ. उमा बापट
शालेय भाषणे

✡ डॉ. अिन्दुभूषण बडे
संपूर्ण चाणक्यनीती
शुक्रनीती
विदूरनीती

✡ सौ. वि. सी. गुर्जर
मराठी व्याकरण एकदम सोपे
(इ. ५ वी ते १० वी व
११ वी, १२ वी करिता)
इंग्रजी-मराठी आदर्श
पत्रलेखनाचा महामंत्र
निबंधलेखनाचा कानमंत्र

✡ वि. र. काळे
इसेन्शिअल इंग्लिश ग्रामर
(इ. ४ थी ते ६ वी)
इसेन्शिअल इंग्लिश ग्रामर
(इ. ७ वी ते ८ वी)
इसेन्शिअल इंग्लिश ग्रामर
(इ. ९ वी ते १० वी)
संस्कृत पाठ्येतर *(इंग्रजी)*
संस्कृत पाठ्येतर *(मराठी)*
ईझी इंग्लिश एसेज
(५ वी ते ८ वी)
Easy English
Essays
ईझी इंग्लिश एसेज
(९ वी ते १० वी)
English Essays for
College Students

मनोरमा प्रकाशन
मनोरमा प्रकाशन
१०२/सी, माधववाडी, पहिला मजला, दादर मध्य रेल्वे
स्टेशनसमोर, दादर पूर्व, मुंबई - ४०० ०१४

स्वातंत्र्यवीर सावरकर
यांची आम्ही प्रकाशित केलेली ग्रंथसंपदा

हिंदुपदपादशाही

हिंदुत्व

हिंदुराष्ट्रदर्शन

सहा सोनेरी पाने

जोसेफ मॅझिनी

१८५७ चे स्वातंत्र्यसमर

क्रांतिघोष

काळेपाणी

मोपल्यांचे बंड (अर्थात मला काय त्यांचे?)

जातिभेद

मनोरमा प्रकाशन
१०२/सी, माधववाडी, पहिला मजला,
दादर मध्य रेल्वे स्टेशनसमोर, दादर (पूर्व)
मुंबई - ४०० ०१४, दूरध्वनी : २४१४८२९९

शोध अज्ञाताचा ❖ अरुण निगुडकर ❖ मनोरमा प्रकाशन